902

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
नाटक

संख्या क्रमांक
३३

लेखक गोंडिराम नामदेव पंडितराव

पुस्तकाचें नांव बेटाचोर

सन
१८९९

902

SATYA SHODHAKA SAMAJ

# VFDACHAR.

*by*

*S. S. Pundit Dhondiram Namdev Swami of Jest Shrengeri Kudalgi and S. S. of S. Shunkaracharyh's state, and printed and published by Laxuman Rao Gopall Rao Savant for the information of the back word class.*

# वेदाचार.

रा० रा० स० शो० स०

"पंडितराव धोंडीराम नामदेव"

जेष्ठ शृंगेरिचे स्वामी जगद्गुरु "श्रीशंकराचार्य" यांच्या संस्थानचे " सरसुभे " यांनीं हा ग्रंथ रचला तो मी रा. रा. " लक्ष्मणराव गोपाळराव सांवत देसाइ " लोक हितार्थ कुलाभिमान व जात्याभिमान बाळगून छापून प्रसिद्ध करितो.

माहे नोवेंबर सन १८९६ इ०

किंमत ८ आणे.

PRINTED AT THE "ISRAELITE PRINTING PRESS"

नि.
नि. नं. ८७८

# वेदाचार.

## रा० रा० शिवराम गोपाळराव सांवत देसाइ, यांचा व पंडितराव धोंडिराम नामदेव यांचा संवाद.

सांवत—काहो पंडित वेद हे परमेश्वर प्रित्यर्थ आहेत तर त्यांत व त्यांतील दैवतात इश्वरी लक्षण असलेच पाहिजे. व परमेश्वरी दयाही त्यांत असलीच पाहिजे. परमेश्वराचे निरगूण, पवित्रता, न्याय, प्रेम, कृपाळूपणा व सत्यता हे आहेत, तर हे सर्व गुण वेदांत पाहिजेच. तर हे कांहीं वेदांत आहे काय ?

पं० धों०—काय सांगू ही तर लक्षणे त्यांत नमून उलट अपवित्रता, अन्याय, निर्दयता, व्यभिचार, हिंसा, मद्यपान वगैरे हेच फार भरलें आहे.

सांवत०—वेदांत व्यभिचार कसा येईल. वैदीक दैवते काय व्यभिचारी होते.

पं० धों०—होय व्यभिचारी, चोर, लबाडही होते. पहा इंद्रानें सगर राजाचा घोडा चोरला, कृष्णाच्या गाया चोरल्या, तसेच “ रामायण बाळकांड ३८–३९ वा अध्याय पहा. त्यांत इंद्राने आपला गुरू गौतम त्याची स्त्री आइला इच्याशी व्यभिचार केला. यामुळें त्याचे अंगार १००० भगे पतगच पडली। लिंग पतन पावले

तेव्हां ऋष्यांनीं त्यास बकऱ्याचे लींग लावले. सूर्यानें कुंतोनामे कन्येसी लग्नाचे आधींच जबरदस्तीनें संग केला त्याचा कर्ण झाला. असे महा भारतात सांगितले आहे. चंद्रानी गुरू ब्रहस्पतीची स्त्री घरांत घातली. तिचे पासून बूध झाला. वायु कृष्णाच्या १०० लेकीवर मोहित झाला. केशरी वानराची स्त्री इच्याशी कूकर्म केले. वरूणानें उर्वशीशी कूकर्म केले, व अगस्तीस उर्वशी पासून जन्मविले. यमानें आपले आईस मारले. स्वतःची बहीन यमुना इजवरपाप दृष्ट ठेवली. असे महा भारथात लेख आहे. अग्नेचा ६ ऋषी कन्येवर डोळा होता; परंतु बायकोच्या धाकानें विलाज चालला नाहीं. ब्रहस्पतीनें थोरला बंधु "ओतथत्या" याचे स्त्रीशी ऋतुप्राप्तीचे आधींच संभोग केला. अशा प्रकारें कोठवर अनितीचा प्रकार मी वर्णन करावा. जेव्हां देव असे तर भक्त कसे असावेत? याचा विचार श्रोत्यानीच करावा.

सांवत—हे तर त्यांतील दैवते झाली परंतु वेदांत कांहीं अन्याय दर्शविला आहे काय ? आणि असल्यास तो कोणता ?

पं० धों०—वेदांत असा एकादा भाग सांपडणार नाहीं कीं, त्यांत यज्ञमिशे हींसा नाहीं. मुळींच ऋग्वेद ऐतरेय ब्राह्मण ग्रंथांतील अग्निची स्थापना व ऋत्विजाचे वर्णन केले आहे. तेथून सविस्तर हकीकत कळविती.

अहवनियाग्नि, गार्हपताग्नि, दक्षिणाग्नि व शामित्राग्नि असे चार अग्नि वर्णिले आहेत.

अध्वर्यू, प्रतिप्रस्थात्ता, अग्निध्र, उन्नेता, होता, वैतावरूण, ब्राह्मणाछंसी, नेष्टा, पोता, आछावाक, उद्गाता, प्रस्तोता, प्रतिहर्ता, सूब्रह्मण्य, ग्रावस्तोता, ब्रह्म, सदस्य, शमिथा आणि सोमक्रयी असे १९ भेद पुरोहितांचे आहेत.

इध्मा, वर्ही, धृष्णी, स्त्रचा, चमस, श्रावण, स्त्ररू, उपवर, द्रोण, कलश, वायव्यकलश, ग्रह, इडसुनु, स्त्रधिती, पुरोडाश आणि पुतभृता अशी १९ पात्रे व स्थाने असतात.

यज्ञशाळा, महावेदी, अंतर्वेदी बहिर्वेदी, शमित्र, शाळा, चत्वाळ, संचार, प्राग्वंश, सद, मार्जालिया-आग्निधीयागार, पत्नी शाळा, द्वार, प्रतिश्वर, धूप, हविर्धान, शालामुखी आणि धर्म असे १८ यज्ञशाळेचे प्रकार आहेत.

दक्षिणिय इष्टी, प्रामाणिय इष्टी, अतिथ्य इष्टी, धर्म, अग्निषोमिया, पशू, सुत्या, प्रातःसवन, माध्यानस, वन, तृतियसवन, सोमपान, आश्विनपशू, ऐंद्रग्नपशू-अवभृत, वरूणेष्ठी, वपायाग, पशुउपाकरण आणि पश्वालंभनं अशी १८ अनुष्ठानें आहेत.

ही वरील सर्व यज्ञ क्रिया व सामुग्री अशा प्रकारची आहे.

ही सर्व यज्ञविधी खुलासेवार कळविल्या शिवाय आमची समजूत कधी होणार ?

पंडित—ऐका.

॥ यज्ञेन वै देवा उर्ध्वाः स्वर्गं लोक मायं स्ते विभ युरि मन नो दृष्ट्वा मनुष्याश्च ऋषयश्चानु प्रज्ञा स्यंतीति ॥ पंचिका २ खंड १ ऐतरेय ब्राह्मण.

अर्थ.—सर्व देव यज्ञ करून स्वर्गी गेले यास्तव सर्व ऋष्यांनीं यज्ञ करावे, आणि यज्ञाचा पशु बांधण्यास यूप ( स्तंब ) रोवावा.

सांवत—यज्ञ करतेवेळीं ब्राह्मण लोक प्रथम काय करित.

पं० धों०—

॥ दैव्याः शमितार अरभद्रमुत मनुष्या इत्याह० अन्वेन माता मन्यतः मनुपितानु भ्राता सगर्भ्योनुसरवा सयुथ्य इति जनित्रे रे वैनंतत्स मनुमत मालंभत उदीचिनां अस्य पदो निधतात्सुर्यं चक्षुर्ग मयता द्वांत प्राणमन्नव सृजता दंतरिक्ष मुसुंदिशः श्रोत्रं पृथिवीं शरीरं० ॥ ऐतरेय ब्राह्मण पंचिका २ खंड ६.

या मंत्रानें पशुच्या मातापित्यांची प्रार्थना करित आणि मग " अध्वर्यु " ( मुख्य पुरोहित ) त्यां पशुंस " शमित्र शाळेंत " ( पशु वधण्याचे जागीं )

नेऊन त्याचे उत्तरेस पाय करून पाडीतों. पशूस पाडल्या नंतर "शमिता" ( पशूस वधणारा खाटिक उर्फ कसाब ) हा त्या पशूचा गळा दाबून व मुष्ठी प्रहरे करून मोठ्या क्रुरतेनें प्राण घेतो.

यावरून सांवत आपणच विचार करा कीं हे असे निर्दयपणाचे कृत्य करतें "शमिता" ह्मणवून घेणारा कसाबा या पेक्षां मुसलमान कसाब बरें कीं पहा "शमिता" कसाब पशुचा गळा दाबून मुष्टी प्रहरानें त्याचे हालहाल करून प्राण घेतों व मुसलमान कसाब पशूंचे हाल न करतां सुरिनें त्याचा एकदम गळा सोडवितों आणि त्यांस हलाल झाले, अशी संज्ञा देतों. यावरून वाचकांनींच विचार करावा कीं अधिक दुष्ट, क्रुर, निर्दय जात या उभयतात कोणाची ती शमिता भट कसाबाची किंवा मुसलमान कसाबाची मीच सांगावे असे कांहीं नको.

पुढें ह्या पशूचा शमिता भट कसाबानें प्राण घेतल्यांवर "इडासुनुवर" ( पशु फाडण्याचा लांकडी कुंद्यावर ) पशूस टाकून हातात "स्वधिती" ( सुरा ) घेऊन त्यानें पशूस फाडितात. व त्याचे मांस काढून त्याचा होम करितात. ( भाजीतात ) त्यांतून कांहीं जळूनही जाते, शेष राहिलेले मांस पुरोहित व सर्व ब्राह्मण मंडळी वाटून घेतात. यांस शृतिचे प्रमाण.

॥ अथातः पशोर्विभक्तिस्तस्य विभागं वक्षमोहनसा जिन्हे मस्तोतुः ॥ ई०

ऋग्वेद एतरेव ब्राह्मण पंचिका ७ खंड १ ला.

**अर्थ**—" **प्रस्तोता** " हा मांस काढून जिभेसह आपला वांटा घेतो, कंठककूट संयुक्त " **प्रतिहर्तता** " घेतो, श्येन व वक्ष " उद्गाता " घेतो, पासव ".पुरोहित " घेतो, सास " **अध्वर्यू** " घेतो, डावा भाग " **उपगाता** " घेतो, खवा " **प्रस्थाना** " घेतो, कटिचा विभाग " ब्राह्मण स्त्री " घेते, ऊर " पोता " घेतो, डावी श्रोणी " होता " घेतो, सक्य " **मैत्र व वरूण** " यांचे नावें घेतात, उरू "आच्छाका " घेतो, दक्षिण बाहू " नेष्टा " घेतो, अशाप्रमाणें आपापला वाटून वाटा घेतात असे ऐतरेय गोपथ ब्राह्मणांत सांगितलें आहे.

**सांवत**—आहो पंडित काय ! ह्मणता काय ! अहो हे पवित्र ब्राह्मणानां ? अहो ज्यांस आह्मी सर्व लोक आजपर्यंत पूज्य मानित आलोत, व त्यांची कृती अशी विलक्षण आहे काय ? धिक्कार असो आह्मी कोणत्याही गोष्टीचा शोध न करतां एकदम एकाद्याच्या मागें जातो. विचार तरी करावा कसा ज्या वेदांत यांचे गुह्य कळणार तें तर आह्मांस ऐकण्याचीही मनाई, ऐकले कीं, आमचे कानठळ्या बसून आह्मी भैरे होणार. असो यावर तुमचें काय ह्मणणें आहे ?

**पं० धों०**—या सर्व कांहीं त्यांच्या पोकळ डुरक्यास भिऊन जर कदापि कोणी बसले असतें तर या गोष्टी

कळल्यांच नसत्यां. पहा जैन लोकांनीं, बौध्य लोकांनीं, इंग्लीश लोकांनीं यांचे पाचि वेद वांचून त्यांचे प्राकृतात, इंग्रेर्जीत तर्जुमेही केलेत, तर त्या तर्जुमे करणाऱ्या पैकीं एकाच्या तरी कानठळ्या बसलेल्या कोणाच्या ऐकिवांत आल्यात काय ? तसेंच मागें रावण राजानें सर्व वेदांचे खंडही केले त्या उपरांत जैन,बौध्य, इंग्लीश, जर्मन लोकांनीं त्यांचा तर्जुमा केला. व आतां शेवटीं मी सत्य शोधक समाजियन पांडित धोंडीराम नामदेव तर त्याचे खंडनच काय परंतु खंडन करून वरती मुंडण ही करण्यास सिद्ध झालो आहे, आता माझ्या कानठळ्या बसल्या तर बसुद्या, परंतु माझे ह्मणणें असें आहे कीं, आजपर्यंत त्या वेदाने तर काणठळ्या बसल्या नाहींत तरत्यांच्या पोकळ डुरक्यांनीं मात्र तुमच्यासर्वांच्या काणठळ्या बसल्या त्या उघडा. त्यांत ह्मणूनच मी या वेदांचे खंडण करून वरती मुंडणही करीतों. व जगापुढें ठेवितों जेणेंकडून या सर्वांच्या कानठळ्या बसलेल्या उघडून त्यांस वेद ऐकूं यावेंत.

हा वेदांत यांचा अमंगळ धर्म लिहिलेला आहे. गुह्य छिद्र लोकांस ( इत्रांस ) दिसूं नये ह्मणूनच ब्राह्मण लोकांनीं ब्राह्मणेत्रांस वेद वाचण्याची व ऐकण्याची बंदी केली. कारण या गोष्टी जर कदाचित् इतर वर्णास कळल्या असत्या तर त्यांचे मागेच सर्व भांडवल फुटून त्यांचा जो सर्वावर धर्म पगडा बसलेला आहे तो

सहज उडला जाणार व धर्म मिषे आपणा लोकांच्या जिवावर आपणास धर्म मिषें फसऊन आजपर्यंत घृत-कुल्या, मधुकुल्या, करित आलेले त्या कुलुल्या बंद पडून यांचे हातीं उदर निर्वाहास्तव कुणब्यांच्या आसुडांचा दांडा किंवा साळ्या कोष्टयांचा धोटा, अथवा चांभारांचा इंगाच आला असतां परंतु ब्राह्मण वर्ग किती हुषार पूर्वी पासून, ते या धाकानेच आपल्या याती कुळीच्या रीतिभाती बाहेर करूं नये. व आपल्या या अशा अंमगळ कुळींची कोणासही ओळख पटूं नये ह्मणून वेद शूद्रानें ऐकूच नयेत, ऐकलें तर कान जातात, कानठळ्यां बसतात. अशा प्रकारच्या थापा देऊन हा एक धर्म शास्त्रांत नियमच लिहून ठेवला. वा जिवः ! बहार करून दिली या वरूनच यांचे खरें स्वरूप मला माझ्या ब्राह्मणेत्तर बांधवापुढें ठेवणें भाग पडलें.

**सावत**—यांच्या जिभेच्या रूचिकरितां बिचाऱ्या अनाथ प्राण्यांचा मात्र जीव जातो ( प्राण्यांचा जातो जीव व खाणाराच्या कुलुल्या. )

**पं० धों०**—काय सांवत आपल्या बोलण्याकडून मला मोठे आश्चर्य वाटतें अहो महाराज असे तुह्मा सारख्या बोलणाऱ्यांचे तोंड बंद व्हावे ह्मणून त्यांनीं ( ब्राह्मणांनीं ) बोलणाऱ्यांच्या आधींच आपली हुशारी दाखविली ऋग्वेदांतील ऐतरेय ब्राह्मणाची पंचिका २ रीचे खंड ६ पहा.

**पशुर्वै नियमानः स मृत्युं प्रापश्यात् सदे-
वान्नान्य कामय तै तुं तुं देवा अब्रु वन्ने हि
स्वर्ग वै त्वा लोकं गम यिष्यामि इति ॥**

**अर्थ**—या मंत्र सामर्थे करून यज्ञांतील वधलेले पशू स्वर्गी जातात.

यावरून सांवत आपणच विचार करा कीं मनुष्यांस फसवितात ते फसवितात परंतु पशूंसही फसवितात. खरें आहे, हें ब्राह्मण लोक असे फसवनुकिची श्लोके न रचून ठेवतील तर इत्रांची श्रद्धा ब्राह्मणांवरतीं कशी बसेल. व त्यांच्या या अशा अमंगळ धर्म कृत्यावर झांकण कसें पडेल. मनुष्य या अशा श्लोकांवरती भुलून ह्मणणारच कीं यज्ञांत वधलेले पशु पक्षीं स्वर्गी जातात. तर आपण यज्ञ करविणारे स्वर्गी का न जाऊं? या अंशा ब्राह्मणांच्या गुलझार थापेस भुलून, पूर्वी **वर्दी** नांवाचे राजानें अनेक जीव मारून अनेक यज्ञे करऊन या खादाड ब्राह्मणांना यथेच्छ मांस चारलें. भरत राजानें पंचावन अश्वमेध करविलें त्यांत कोट्यावधी प्राणी व ९९ अश्व ( घोडे ) वधले जाऊन या खादाड ब्रह्मराक्षसांच्या नरड्यांत उतरले. या ब्राह्मणांनीं दसरथ, रामचंद्र, पांडव यांचे घरीही अश्वमेध करून लक्षावधी प्राण्यासह घोडे खाले. भडोचांतील **बली** राज्याचे घरींही या ब्राह्मणांनीं दहा वेळ अश्वमेध करून १० घोडे व हजारो पशु स्वः केले. जयपुरात **सवाइ–जयसिंह** राजा घरीं अश्वमेध केला. उ-

स्कंठ महादेवाजवळ जाबाल्य ऋष्यानीं यज्ञ केला. त्या महादेवास आतां " खैरनाथ " ह्मणतात. व सध्यां त्या जागेंतून भस्महीं निघते. असेच पूर्वीं ८८००० ब्राह्मणांनीं धर्मराजास माठून नव्यान्नव यज्ञे करऊन नव्यान्नव वेळीं खूप चांपचांपून शेंडीवर व दोंदीवर हात फिरफिरवून दारूच्या हौदावर हौदे व अनेक जातिच्या पशुपक्षांच्या मांसावर यथेच्छ हात मारला. परंतु धर्मराजाची जी कांहीं कामना होते ती कांहीं यां मद्यपी व मांसाहारी ८८००० ऋष्यांचे ९९ यज्ञें करूनही पूर्ण झाली नाहीं. शेवटी धर्मराजास आपली कामना पूर्ण करून घेण्याकरितां **कुल्लाळ** ( कुंभार ) " **कुंभ** " नावाच्या ऋष्यांस आणून त्याजकडून त्याचे डाक मालिच्या साहाय्यानें आपली कामना पूर्ण करून घेणें भाग पडले.

कुल्लाळ शास्त्र अध्याय १२ श्लो० ४९ आणि ५० पहा.

तेथूनच क्षत्रिय घराण्यांत कुल्लाळ ब्राह्मणाची माळ ( कुल्लाळ क्रिया ) सुरू झाली. व ऋषी ब्राह्मणांचा हक्क उडाला. कोंकणांत तर ब्राह्मणापासून तो महारापर्यंत सर्वच वर्णांत कोठकोठें मृतिकेत, लग्नकार्यांत कुंभारास पूज्य मानून त्याच्या डाकेची पूजा करितात.

तसेच बडोदेकर गोपाळराव मैराळ यांचा पुतण्या नारायणराव पांडुरंग यानेंही ब्राह्मणांच्या थापेस भुलून नर्मदेच्या काठी बेलु ग्रामे गावांत सात वेळ सात यज्ञ

करऊन सात वेळीं मद्य मांसाकडून या मद्यपीव मांसाहारी भटांची इच्छा तृप्त केली. कित्येक वेळ या पुण्यांत यज्ञमिशे बकरे मारून खाताहित वगैरे असे पुरावे देत बसल्यास ग्रंथ व्यर्थ वाढणार. व वाचकांचाही वेळ व्यर्थ जाणार. पहा आमचे ब्राह्मण लोक यज्ञातच हाडे फोडते वेळीं मद्य पिऊन त्या निशेंत नित्य स्वर्गी जाऊन येत होते. परंतु आतां तर हॅाटेला हॅाटेलानें हजारों ऋषी बाळें आह्मा सत्रा वर्णाचे भूदेव ब्राह्मण आंडे, मटन, बीफ झोडते वेळीं व हाडे फोडते वेळीं चंपिन, वाइन, ब्रांडीचे लहरित नित्य रोज स्वर्गी जाऊन आपले पूर्वजांस ( मागील ऋषांस ) कडकडून भेटून येत असतील नाहीं बरें. व आपल्या पूर्वजांस ( वरील ऋषांस ) आपली शिफारस सांगत असतील कीं तुह्मापेक्षां आह्मी बरें कीं नाहीं, तुह्मा राणव्यांला तर यज्ञांतच स्वर्ग नजरेस पडत होते, आणि आह्मी गावात राहिल्यामुळें आह्मांस तर या हॅाटेल देवतेचे देवळातील बुटलेर बवर्ची देवाच्या प्रसादे आह्मी नित्यशः स्वर्गीं येऊन आपणास भेटतों. या दयाळू राजानें तर आमच्या भूदेव ब्राह्मणाकरितां स्वर्गाची वाट अगदीं मोकळी करून दिली आहे. इश्वर हें राज्य आम्हांवर चिरायु ठेवों कीं त्यानें आमच्या वरील या खादाड याज्ञिक भट्टी धाडींचें ओझे आपल्या शिरावर घेऊन आह्मांस मोकळें केलें. नाहीं तर आजपर्यंत या खादाडांच्या नरड्यांत मद्य ओतण्यांस व मांस चारण्यास

आमच्या लोकांस किती हो यज्ञ करावीं लागली असती.

सांवत–पूर्वीं यांची पशु फाडण्याची रीत कशी होती ? जसे मुसलमान कसाब फाडीतात त्याप्रमाणें च " शमिता " भट कसाब फाडीत होते कीं, त्याची निराळी रीत होती ती मला सविस्तर कळविल्यास मी आपले फार आभार मानीन.

पं० धों०–तुमची इच्छा आहेच तर पशु फाडण्याची ही श्रुति सांगतो ऐका.

अतेर वेस्ष्माणं वार यथ्वादिति पशुश्च वेतत्प्राणान्दधाति शैन मस्य वक्षः कृणु तात् प्रशसा वाहू शला दोषणी कश्यपे वांसाच्छिद्रे श्रोणी कवशोरू, स्रेकपर्णाष्ठीवंता, षड विंपं तिरस्य वंक्रयस्ता अनुष्टयोच्या वय ताद्, गात्रं गात्रम स्यानूनं ॥

ऋग्वेद ऐतरेय ब्राह्मण पंचिका २ खंड ६.

अर्थ—छातींतून श्येनवत मांस खंडून काढितात, कोहवाडीप्रमाणें मागिल पायांतील दोन तुकडे काढितात. पुढील दोन्हीं पायांतील तीराप्रमाणें मांसाचे दोन तुकडे काढितात. खव्यांतील दोन्हीं समान तुकडे काढितात. पाठ संपूर्ण काढितात. जानुतील ढालीप्रमाणें मांसाचे दोन तुकडें काढितात. आणि फासोळ्यांतील २६ फांसाळ्या काढितात. ॥ ऊध्व गोहं

पार्थिवं ॥ "एतरेय ब्रा० पं० २ खंड ६" ही श्रुती ( हा मंत्र ) ह्मणून मळमूत्रजमिनींत पुरतात. पशु मारतेवेळीं "पुरोहित" ह्मणतो ॥ अधि गोष मिध्वं सुश मिश मिध्वं, शमि ध्वम धिगा, ऊईत्ति त्रिर्ब्रुयात, ॥ "ए० ब्रा० पं. २ खंड ७ अर्थ—मारामारा चांगले मारा, मारण्यास कसर करूं नका. ॥ अस्ना रक्षः संसृजतादित्याह॥या मंत्रानें रक्त ब्रह्म राक्षसास देतात. ॥ तस्य वपामुत्खिद्या हरंतिता मध्वर्युः स्रुवेणाभिधार येन्नाह ॥ "ऐ० ब्रा० पं० २ खं० १२" या मंत्रानें काळजाचा होम करतात. ( काळीज भाजितात. ) ॥ सर्व मायु रेतिय येवं वेद ॥ ऐ० ब्रा० पं० २ खं० ७ अर्थ—असे केल्यानें आयुष्य वृद्धि होते ॥ व पायामे हुतायां स्वर्गों लोकः प्राख्यायत् सोत्मेर्देव योन्यां आहुतिभ्याः संभूय हिरण्य शरीर ऊर्ध्वः स्वर्ग लोकमेति ॥ अर्थ—काळजाचा होम केल्याची ही फळश्रुति जाणावी. ॥ तत् स्वर्गाश्च लोकानान्धुवंती प्राणेपु चैवतत्स्वर्गेषु प्राति तिष्ठं तोयी १ एतां पशोर्विभक्तीं श्रोतऋषीर्देवभागोविदांच कार गिरिजाय बाभ्रव्यायत्मनुष्यः प्रोवाच ॥ ऐ० ब्रा० पं० ७ खं० १. अर्थ—पशुचे ३६ विभाग करावे असे केल्यानें स्वर्ग लोक प्राप्त होते. आणखी उक्तप्रमाण विभाग केल्याची रीत "देवभाग" ऋष्यानें ठराविली होती पुढें तो मेल्या मागें कोणा एका

"दैवागेर्जा" नामें ऋच्यास दाखविली कीं या ऋचेचा अभ्यास नित्य करावा.

## अश्वमेध वर्णन.

सांवत—काहो पंडितराव आपण मागें ह्मणालात कीं, यांच्या नादानें राज्यांनीं मागें अश्वमेध करऊन ब्राह्मणांनां घोडे चारले ते त्यांनीं कोणत्या शास्त्रांच्या अधारानें व कसकसे कोणत्या प्रकारें खाल्ले या विषयीं मला खुलासेवार कळवाल तर बरें होईल माझी फार इच्छा आहे कीं ते प्रकर्ण तुमच्या मुखानें प्राकृत अर्था सहित ऐकावे.

पं० धों०—बरें आहे सांवत जशी तृशाक्रांताची तहान भागविणें, क्षुधितांची क्षुधा भागविणें. तद्वत आपली इच्छा तृप्त करणें आहे. ऐका "ऋग्वेद संहिता अष्टक २ अध्याय ३" वर्ग ७, ८, ९, १०, ११, १२, १३,

॥ अश्वमेध दीर्घतमा ओचथ्यः त्रिष्टुप् ॥ एष छाग पुरो अश्वेन वाजिना पुष्णो भागो नियतोविश्वदेव्यः ॥ यदश्वस्यक्र विषो मक्षिका शपद्रा स्वरौ स्वधेतौ रिप्तमस्ति ॥ यद्धस्तयोः शमितुर्यन्न खेषु सर्वांताते आपि देवेश्वस्तु ॥ यदुवध्य मुदरस्या पवातिय अमस्यक्रविषोगंधो आस्ति ॥ सुकृतातच्छमि-

तारः कृण्वं तुत मेधं श्रुक पोकं पत्रंतु ॥ चतुस्त्रींशद्वाजिनो देव वंधोर्वंक्रीरश्वस्य स्वधितीः समेति ॥ अछिद्रा गात्रा वयुना कृणोत परूष्परूरनुधुष्याविशस्त ॥ सुगव्यं नोवाजिस्वश्व्यं पुंसः पुत्रां उत विश्वा पुषं रयी ॥ अनागास्त्वं नो अदितिः कृष्णो तू क्षत्रं नो अश्वो वनतां हविश्मान ॥ अजः पुरो नियते नाभिरस्यानुपश्चात्कवयोयंतिरेभाः ॥ उपप्रागात्परमं यत्सधस्तमर्वा अँच्छा पितरं मातरं च ॥ आद्यादेवाज्जुष्टतमोहिगम्या अथाशास्ते दाशुषे वार्याणी ॥

अर्थ—या यज्ञाचे घोड्याचे पुढें पुषा ( मेंढा ) हा अन्यदेवतेंकरितां आणिला आहे. या अश्वमेधांतील घोड्याचे मांस खाणाऱ्या माशा व घोडा कापते वेळीं ज्या शस्त्रानें घोडा कापला तो सुरा आणि त्याचे तुकडे करते वेळीं तुकडे करणाऱ्याच्या नखांत मांस शिरल्यामुळें घोड्याचे मांस छेदन करणारा ब्राह्मण उर्फ " घोडे कसाब " हे त्रीवर्ग घोड्यासंगे स्वर्गास जातात.

यावर मला अशी शंका उद्भवली कीं, असा कांहीं कोठें पुरावा आहे काय ? कीं त्या माशा व तो सुरा आणि तो घोडे कसाब भटजी हे त्या घोड्यासंगें तावडतोब स्वर्गास गेले. असे तर नाहींच परंतु त्यांच माशा तेथून उठून कोणाच्या तरी विष्टेंवर, मुतारींत वगैरें

घाणेरड्यां स्थळीं जाऊन बसत असतील. व हेही घोडे कसाब भटजीबुवा घोड्याचे मांस यथेच्छ झोडून पोट फुगल्यामुळें स्वेच्छेंस जात असतीलच, तर तेंच स्थळ यांचे स्वर्ग कीं काय ? असो पहा बकर कसाब, गाय कसाब आणि घोडे कसाब या जाति ब्राह्मणांतच सांपडतात यावरून श्रोत्यांनीं विचार करावा कीं, जसे इतर कसाबांशीं आपण सहवास ठेवित नाहीं तद्वत या भट कसाब ब्राह्मण जातींशीं तरी आपण का संबंध ठेवावा. माझी सर्वांस हीच विनंती आहे कीं हे वाचून तरी या ब्राह्मण जातीचा संबंध सोडा.

त्या घोड्याचे पोटांतील गवत व हिरवे मांस चांगले स्वच्छ धुवा. व उत्तम प्रकारें मसाला घालून शिजवा. घोड्याच्या ३४ फांसोळ्यां चांगल्या प्रकारें सोडवा. वाया जाऊ देऊ नका. त्याचे अंग व शरीर निरनिराळें काढा. हा अश्वमेध केल्यानें आह्मांस धन, गाया, घोडे, अरोग्य आणि संतान प्राप्त होवो. असा वरील श्रुतीचा अर्थ आहे.

घोड्याचे पुढें मेंढा बांधून त्याचे मागे मंत्र ह्मणनारा भटजी उर्फ मुलाना उभा राहतो. हा घोडा मारल्यानें घोड्याचे आईबाप देवस्थानां जवळ जातात व होम कर्त्यांस लाभ होतो.

यावरून या ग्रंथाचे वाचक व श्रोतेजनच विचार करोत कीं यां ब्राह्मण लोकांवर कोणताही प्रसंग नसून यज्ञ मिशे गरीब बापड्या अनाथ महारमागांप्रमाणें

पशूंचे वांटे घालून खात होते. व यज्ञ पशूचा मोठ्या क्रूरतेनें प्राण घेत होते. तेव्हां या ब्राह्मणांना महार मांग जाणावेत? किंवा विचारे प्रसंगास अनुसरून पोटाच्या आगीमुळें मारूनही नाहीं तर मेलेल्या पशुचे वांटे घालून वाटून घेत आलेल्यास महार मांग ह्मणावेत. अहो आपल्या हिंदुलोकांत न्याय तरी राहिला आहे काय? जे महारमांग आपले खरे क्षत्रियबंधू असून या देशाचे वतनदार असून ते पोटामुळें तीही मेलेली गुरें ढोरे खातात. त्यांनां आपण दूर शिर करितों व हे ब्राह्मण घडघडीत परकिय आर्य, ( इराणी ) ज्युइष ( ज्युइ ) इजिप्त देशांतील यहूद, परशु असे असून यांना मोठें पवित्र मानून यांचे पायांचे मग ते एकाद्या अमंगळ जागेंतून का चालून आलेले असेनात, तसें घाणेरडे पाय धूऊन पितो, व तेणेंकडून आपण आपल्या मनास मोठें पवित्र झालों असें मानून घेतो. या भ्रष्ट कुळीच्या ऋषी वंषास देवावत मानितों तो येथपर्यंत कीं परमात्मा जो परमेश्वर सर्व सृष्टीचा उत्पन्न कर्ता त्या शिवाय या जगाचा मालक कोणीच नसून त्याचा मान यांना देतो, व त्याचे जागीं या भ्रष्टांलांच पूज्य मानितो. तेव्हां असे करते वेळीं आपले ज्ञान आणि विचार जातात तरी कोठें; मला वाटतें कीं त्या वेळेस आपली विचार शक्ति व ज्ञाण हें झोंपी तर जात नाहींत आणि अनाथ बापडे महार मांग यांचा काठीचा ठोंका ऐकला कीं त्या ठोक्याचे आवाजानें लगेच

दचकून जागे होतो कोण जाणे व त्या अनाथ झालेल्या आपल्या खरोखरच क्षत्रिय बांधवास पहातांच तळव्याची आग मस्तकिं जातें. मग त्यांना शिवणें तर लांबच राहिलें.

यज्ञांत वाटे घालते वेळीं हे ब्राह्मण लोक त्या वांच्या भोंवती आमच्या महारमांगाप्रमाणें मिटक्या मारित बसत असतील तेव्हां त्याची स्थिती महारमांगाप्रमाणें त्या वेळेस होत नसेल काय ? आणि ती स्थिती यज्ञ करविणाऱ्या क्षत्रियांच्या दृष्टीस पडत नसेल काय ? परंतु त्यांनां या गोष्टीवर विचार होत्यावेळेस कसें सूचत नाहींत. धिक्कार असो त्या यज्ञ करवून या खादाडांचे खळगे भरणारावर.

**सांवत**—काहो या महार मांगावर असा प्रसंग तरी कधीं पासून व कोणी आणला.

**पं० धों०**—या खादाड घाणेरड्या ऋषी वंष, कायदे उर्फ ग्रंथ कर्त्यांनीं.

**सांवत**—त्या विषयीं सविस्तर हकीकत मला कळवाल काय ?

**पं० धों०**—त्या विषयीं मी मागेच एक पद केले होते ते दिनबंधु पत्रांत छापूनही प्रसिद्ध झाले होते व तेच पद सन १८९६ सालीं पुण्यांत चतरशिंगीचे मैदानांत परिषद भरली होती. त्या ठिकाणीं एका वलंगकर नामे महार गोसाव्यानीं ते पद ह्मणून दाऊन म-

हारमांगाविषयीं दाद मागितली व त्या पदावरून त्या सभेत ठराव पास झाले ते.

**दहावा ठराव**—वरिष्ट हिंदुज्ञातिकडून अति शूद्रादिकांची जी अहेळनां होत असतें त्यामुळें ह्यां पैकीं पुष्कळ लोक धर्मांतर करीत आहेत; व त्यांच्या दुःस्थितीकडे मद्रासेकडे सरकारचे व लोकांचेही विशेष लक्ष लागले आहे. ही समाधानाची गोष्ट होय. ज्यांच्या मनांतून आपल्या देशाचे चिरकालिक कल्याण व्हावें अशी इच्छा असेल, त्यांनीं सर्व देशांतील अति शूद्रांस शिक्षण मिळून त्यांची सामाजिक स्थिती सुधरेल अशा वद्दल प्रयत्न केले पाहिजे.

हा ठराव सभे पुढें मांडतांना मि० वलंगकर ( महार ) यांनी अति शूद्रांची स्थिती ज्यांत गणिली आहे तें पद ह्मणून दाखविलें कीं, जे पद मी वरती वर्णन केलेले आहे ते.

**सांवत**—ते मलाही ह्मणून दाखवा ह्मणजे माझीच काय परंतु आपल्या क्षत्रिय बांधवांनांहीं ओळख होईल.

**पं० धों०**—बरें आहे तें मीच केलेले आणि मला आपणासमोर ठेवण्यास कांहीं श्रम पडणार.

पद.

( रामचंद्र नाहीं घरीं काय मी करूं ).

या पदाचे चालीवर.

हरहर हे इश्वरा या हिंदुस्थानीं ॥
संकटांत कठिला काळ अति शूद्रानीं ॥ धृ० ॥
धर्म ग्रंथ मनु संहिता अध्याय दहा ॥

बावन्नावे व त्रेपन्नावे श्लोक तें पहा ॥
कैसा जुलूम अति शूद्रावरती अहा ॥
गांवाबाहेर बांधुनियां झोपडे राहा ॥
ऐसा लेख केला ग्रंथीं या ब्राह्मणांनीं ॥ ध्रु. ॥ १ ।
तांबे पितळ कासें त्यांना वर्ज अगदी ॥
ऐसी दिली फिरऊनि द्वाहीं वर्दी ॥
धर्म मिशे केली पहा कैशी गर्दी ॥
सत्येच्या बळें झालें होते बेदर्दी ॥
भोजन सारावे अति शूद्र लोहपात्रांनीं ॥ ध्रु. ॥ २ ।
अति शूद्रें पाळूं नयें गाई व म्हशीं ॥
हत्ती घोड्यां चितर वाघ मिळतील कशीं ॥
यांचे धन गर्दभ श्वान उंदिर घुशी ॥
उवांचा बुचबुचांट बायकांचे केशी ॥
काळा दोरा खुणेंस्तव रहावें घालुनि ॥ ध्रु. ॥ ३ ॥
शव वस्त्रे धारण यांनीं करूनि रहावे ॥
नूतन वस्त्र जन्मांत त्यां त्यां नसे ठावे ॥
फुटक्या पात्रि अति शूद्रे भोजन सारावें ॥
लोह अलंकार घालुनिया नटावे ॥
रहावे यांनीं रानीं वनीं भ्रमण करूनीं ॥ ४ ॥
यांनां अन्न देण्याची पद्धत ब्राह्मणांत ॥
चाकराकडूनि वाढित फुटक्यां पात्रांत ॥
तेहीं अमलें चिमलेलें पडलेलें गोळ्यांत ॥
गुरें ढोरें कोणीही तोंड तया लाविणांत ॥
तशालाही झाले होतें मुजऱ्यावाणीं ॥ ५ ॥

नागवी उघडी मुलें कित्येक मातींत ॥
कित्येक तर लोळतांत पहा उकड्यांत ॥
तेल फणीं नसें माहित त्या स्वप्नांत ॥
मोकळें तें केश सदा माती नखांत ॥
अंगि राख डोके पिचकीं चिंध्या ढुंगणीं ॥ ६ ॥
पोट खपाटी सदां तें क्षुधाक्रांत ॥
मेलेल्या गुरांचे जेथें वांटे होतात ॥
जमून तेथे सर्व बसती मिटक्या मारीत ॥
हीनकळा तोंडावर त्यांच्या सदोदित ॥
विद्यें नावें बोंब मग ज्ञान कोठुनी ॥ ७ ॥
धर्मा नावें सटवि, जाखाई, मेसाई ॥
वेताळ ह्मस्या बहिरी भादवि मरिआई ॥
ब्रह्मा, विष्णु, महेष, कृष्ण, राही, रूखमाई ॥
राम, सिता, लक्ष्मण, ओळखच्च नाहीं ॥
आर्य दैवतेंहीं माहीत नाहींत स्वप्नीं ॥ ८ ॥
तीन सहस्र वर्षें यांनीं ऐशा दुःखांत ॥
काळ कंठीला या ब्राह्मणांच्या अमलांत ॥
इश कृपें आतां या इंग्लिश राज्यांत ॥
स्वातंत्र्याचे सुख यांनां थोडेंबहूत ॥
सरत चालली मागिल भटशाई ब्राह्मणीं ॥ ९ ॥
विद्यादानांची फळें अति शूद्र वाड्यांत ॥
श्रोतेजन शोध करा कैशी येतात ॥
झाले कवी बिभच्छ लावण्या बसले गात ॥
नटऊनि पोरें नाचविती तमाशांत ॥

भ्रष्ठ मनीं पहा किती पाऊल दुर्गुणीं ॥ १० ॥
तमाशगिरावरती तान झाले गोसावी ॥
या पोषे वेश्यांचे कारटे कोणीं पोसावीं ॥
या दीड शहाण्यांनां का अक्कल नसावी ॥
अज्ञ नां धड यांची बुद्धि हीनच असावी ॥
ज्ञान हीन जोगडे बनतीं ट फ शिकूनीं ॥ ११ ॥
सुधारणांतीं करणें एकीकडे ठेवितीं ॥
दुर्जन भट्टी ग्रंथ घरोघर फिरविती ॥
अज्ञाण्याचे फुंकती कान गुरू ह्मणविती ॥
भस्म टिळें माळा सोंग मुद्रा लाविती ॥
दावी चाव जाती पूर्वस्थिती विसरूनीं ॥ १२ ॥
पोटे जळेनांतरसोद्यांनों काटें भरा ॥
पूर्वांपार दुःखाची मनी आठवण करा ॥
मानवप्राणीं दिसतां अभिमान धरा जरा ॥
जाळा खोटीं शास्त्रें सत्योपदेश करा ॥
दिली सूचना तुम्हां पंडित **धोंडीरामांनीं** ॥ १३ ॥

यांवर मद्रास स्टँडर्डचे एडिटर मि. परमेश्वरं पिले, मि. वळी वेलु ( बंगलोर ) मि. शिवरतन सिंह, मि. केतकर ( नाशिककर ) मि. मोती बुलांसा वगैरे अनेक गृहस्थांची अनुमति दाखल भाषणें होऊन तो ( वरील ) ठराव सर्वानुमतें पास झाला कीं ब्राह्मणांस पाषाणांत ही जर प्राणप्रतिष्टा करतां येतें व भ्रष्ट रत्नागसाला- ही जर आपल्या मंत्रांच्या जोरांवर शुद्ध करून घेतां येते, तर त्यांनीं मनांत आणल्यास महारमांग वगैरें या

प्रांतांतील अतिशूद्र व पारिया या नांवांखालीं मोडणारे मद्रासेकडील अतिशूद्र यांस स्पर्शाई करून सोडणें मुळींच अशक्य नाहीं. महाराचा ख्रिस्ती झाल्यांस त्याचा स्पर्श आह्मांस चालावा; पण तो हिंदु राहिल्यानें मात्र स्पर्श बाह्य व्हावा यांतील असंबद्धता वास्तविक पहातां एकाद्या चार वर्षाच्या पोरासही कळण्यासारखी आहे. हा त्यांचा मोह सुटून ते मानसासारखे वागू लागतील तो सुदीनच जाणावा.

**सांवत**—कांहा पंडित ऋग्वेदी ब्राह्मणांत जशी हिंसा सांगितली अहे तशी कांहीं यजुर्वेदांत नसेल.

**पं० धों०**—अहे सांवत यजुर्वेदाचा तैतरेय ब्राह्मण ग्रंथ वांचून पहा ह्मणजे कळेल. अहो सांवत यजुर्वेदांत तर यज्ञ व यजनाची क्रांति तर अतिशय वाढलेली आहे. पहा यज्ञानुष्टानांत तर चारी वेदांची गरज लागते. यजुर्वेद ह्मणालेल्यास " अध्वर्यु " ह्मणतात.

तैतरेय यजुर्वेद ब्राह्मणांत लिहिलेली शृती.

**॥ दैव्याः शमितारउत मनुष्याआरभध्वं ॥**

तैतरेय ब्रा० कां० ३ अ० ६ अनुवाक ६.

**अर्थ**—ऋग्वेद ऐतरेय ब्राह्मणाप्रमाणें या यजुर्वेदांतही पशुवधाची आज्ञा आहे.

यावर सायनाचार्य ह्मणतात. पशुवध हे निर्दयपणाचे काम आहे तरि याची उपेक्षा करूं नये. अवश्य पशुवध करावाच, याप्रमाणें शृतीत तीन सुचनां आहे

याचे शेष वचन ४ थ्या श्रुतिपासून १७ श्रुतीपर्यंत आपणापुढें ठेवितो.

**॥ द्यावा पृथिव्यां धेनुमालभन्ते वायव्यं वत्समालभन्ते ॥** कां० १ अ० २ अ० ९

अर्थ—द्यावा पृथिव्यस्तव यज्ञांत धेनु ( गाय ) वधावी व वायुसाठीं वत्स वधावा

**॥ एष गोसवः ॥** त्या प्रकारें गाइचा यज्ञ होय त्यासच गोवत्स नांव आहे.

**॥ प्रजापतिः पशून सृजत एतेन वै देवा जत्वा नि जित्वायं कामम् कामयन्तं मान्युवन् ॥** " कां. २ अ० ७ अ० १४ " ( प्रजापतिने पशु उत्पन्न केले त्या पशूंचे अन्यदेवतांनीं यज्ञ केले. तेणेंकरून त्यांची कामनां पूर्ण झाली. )

**॥ प्रजापत्योवा अश्वः ॥ यस्यायों देवता याः आलभ्यते ॥ तयै वेन १ समर्धयति ॥** " कांड २ अध्याय ८ अनुवाक ३ " ( प्रजापतिस यज्ञांत घोडा मारल्यानें समृद्धि होते.)

**॥ यदेत एकादशिनाः पशवा आलभ्यन्ते ॥** " कांड ३ अध्याय ९ अनुवाक २ ( ११ पशूंचा यज्ञ करावा ).

**॥ नाना देवत्याः पशवो भवन्ति अरण्यान् लोकादशिन अलभ्यन्ते अस्मै वै लोकाय ग्राम्य**

**पशव अलभ्यन्ते** " कां० ३ अ० ९ अ० ३ ( अनेक प्रकारचे देवास अनेक प्रकारचे पशूचे यज्ञ करावेत त्यांत रानपशू व ग्रामपशू अगत्य वधावे )

**॥ ग्राम्या ९ श्चारण्या ९ श्च उभयान्पशुना लभ्यते ॥** " कां० ३ अ० ९ अ० ३ ( ग्रामपशू व रानपशू यज्ञांत वधणें पवित्र आहे )

**यद्जाव यश्चारणश्च ते वै सर्वे पशवः यद्गव्या इति गव्यान पशुनुत मेहत्वा लभ्यते ॥** " कां० ३ अ० ९ अ० ९ " ( रानपशूंचे यज्ञ करतेवेळीं त्या यज्ञांत गाईचा वध करावा )

**॥ शुनः श्चतुरक्षस्य प्रहिन्त सैध्रक मुसल भवति ॥** कां० ३. ८. ४ ( कुत्र्यास काठीनें मारून घोड्याचे पायाखालीं अश्वमेध करते वेळीं टाकील तर त्याचे घरात पशूंची वृद्धि होईल. )

**॥ पशूभिर्वा एष व्यृधते ॥ यो अश्वं मेधेन यजते ॥** छगलं कल्मापं कि कि दिवं विदिगय मिति ॥ **त्वाष्ट्रान्पशुना लभते** ॥ ३, ९, ९. ( शेरडांचे करडूं, तितर पक्षी, स्वेथ बगळा व काळ्या ठिपक्यांचा मेंढा हें सर्व त्वष्टा देवा नांवें यज्ञांत मारावेत ) कारण " तानै वो भयान प्रीणाति " या यज्ञानें इह्य व परलोकीं सुख मिळतें )

**॥ ब्राह्मणे ब्राह्मणमा लभ्यते ॥** कांड ३ अध्याय ९ अनुवाक १. ( ब्रह्मदेवाकरितां यज्ञांत ब्राह्मण वधावा ).

॥ यदृष्टा दर्शीन अलभ्यते ॥ ३. ९. १. ( या यज्ञांत १८ पशू वधावेंत )

**सांवत**—काय ह्मणालांत पंडित ब्रह्मदेवाकरितां यज्ञांत ब्राह्मण वधावा तर पूर्वीं ब्राह्मणांस ही पशु तुल्य मानित होते काय ? जेव्हां ब्राह्मणांस पूर्वीं पशु प्रमाणें वधित होते, तर ब्राह्मण व पशू एकच की काय ? आणि आतांच्या काळांत तर त्यांच ब्राह्मणाचे वंशज आपल्या जीवाला कितीहो खातात आतां तर ते दुसऱ्यांस पशू समजतात. असो ब्रह्म यज्ञांत ब्राह्मण वधल्यापासून कांहीं तरी यज्ञ कर्त्यांचे त्यांत अधिकच हीत असेल. तर आताचे ब्राह्मण लोक जेव्हां जेव्हां यज्ञ करितात, त्यांत गरीब बिचाऱ्या पशूचा प्राण घेण्या ऐवजीं एखादा कूकर्मी, त्रासदायक, कलम कसाब, भल्या पाहून, त्यांस काहो हे वधिनांत? ह्मा मते ही अशी दुष्ट ब्राम्हणे जगांतून जितकी नाहींशीं होतील तितकी बरी.

**पं० धों०**—सांवत ब्राम्हण कोणास म्हणावें, याचा तरी विचार केलात ? आहो " ब्रम्हजाणस्य ब्राम्हण:" अहो ज्यानें ब्रम्ह जाणलें त्यांत कांहींच भेद राहिला नाहीं. ब्राम्हण कोणते पहा पैठणचे एकनाथ महाराज ज्यानें या आइतगव्हु पोपे भटाच्या आधीं गरीब बिचाऱ्या महारांचा आत्मा व आपला आत्मा समसमान जाणून महारांना जेऊं घातलें, व त्यांचा आत्मा शांत केला. ज्ञानेश्वर ज्यानें या गर्विष्ट ब्राम्हणांचे गर्व हरण्यास्तव स्वर्गाहून पितर बोलावले, ब्राम्हण तुकाराम,

नामदेव, चोखा, कबीर, कमाल, गोरा, सेना, सांवतां, वगैरें जे रात्रंदिन ईश्वर सेवेंत व जगकल्याणांत निमग्न राहिले, तेंच ब्राम्हण व त्यांनींच ब्रम्ह जाणलें. असे जें हे ब्राम्हण, यांना पाहून या हिंसक मद्यपि, खादांड ब्राम्हणाना लाज वाटून, तशाला नाहींसें करण्यांकरितां कांहीं श्रृति वेदांत खुपसून ठेवली नसेल कशावरून ?

सांवत—याची ह्या आशा अमंगलपणाच्या यज्ञ विध्यांतरी किती आहेत ?

पं० धों०—यजूर्वेदाचे ब्राम्हणांची अनुक्रमणिका पाहिली असतां त्यांत अनेक प्रकारची विधी आहे. त्यांतून कांहीं प्रकर्ण आपणास कळवितो.

" **सौत्रामणी** " ( मदिरापान ) " **सुराग्रहमंत्र** " ( दारू पिण्याचा मंत्र ) " ऐंद्र पशू " ( इंद्रा नावे बकरा मारून खाणें ) " गोसव " ( गाय मारून यज्ञ करणें ) " अत्युर्याम " ( एक प्रकारचे यज्ञ ) " वायविश्वेत पशू " ( वायु नावें आजा मारून खाणें ) " काम्य पशू " ( मनोरथ पूर्ण होण्यास्तव बोकड मारून खाणें ) " व सोपा करण " ( वासरू मारून यज्ञात खाणें ) " पोर्णीमा सेष्टि " ( पोर्णिमेचा यज्ञ ) " नक्षत्रेष्टि " ( नक्षत्रा नावें बकऱ्याचा यज्ञ करणें ) " पुरुष यज्ञ " ( यज्ञांत मनुष्य वधनें ) " वैष्णव पशू " ( विष्णुसाठीं यज्ञांत बकरें मारणें ) " ऐंद्राग्न पशू " ( इंद्राग्निसाठीं यज्ञात बकरें मारणें ) " सावित्रा पशू " ( सूर्या नावें यज्ञांत बकरें मारणें ) " अश्वमेध " ( यज्ञांत घोडा मारून खाणें ) " रोहितादि-

पश्वालंभनं " ( लाल मेंढा किंवा लाल पशूंचा यज्ञ ) " अष्टदश पशू विधान " ( यज्ञांत १८ पशू मारून खाणें ) " चातुरमांस पशू " ( चातुरमासी यज्ञांत बकरें मारणें ) " एकादशिन पशू विधान " ( ११ पशूंचा यज्ञ ) " ग्रामारण्य पशू प्रशंसा " ( गांवातील व जंगली पशू वधून खाणें ) " उपा करण मंत्र " ( पशूंचे संस्कार मंत्र ) " गव्य पशू विधान " ( यज्ञांत गाय मारून खाणें ) " सत्र " ( फार दिवस चालणारा यज्ञ ) " वृषभा लंभन विधान " ( बैल मारण्याची विधी ) " अदित्य देवता क पशू " ( सूर्या नांवें पशू यज्ञ ) " सोमसव " ( सोमा नांवें यज्ञ ) " बृहस्पति सव " ( बृहस्पतिचा यज्ञ ) येणें प्रमाणें " यज्ञ, याग, इष्टी, मख, क्रतु, उत्तर क्रतु, सव " वगैरे अनेक प्रकारचे याग आहेत. व या सर्वांत ही हिंसा, मांस भक्षण, मद्यपानाचे प्रकार आहेतच.

पहा सांवत जो दयाघन, परमात्मा, परमेश्वर तो या जगास असे वाइट, क्रूर निर्दयपणाचे वेदशास्त्र देऊन आपले दयाळूपणांस बाध आणील काय ? तर असें होणें असंभव्य जाणावें. यावरूनच वेद कांहीं इश्वरदत्त ठरत नाहींत. पहा वेदांतून असा एखादा भाग सांपडणें कठीण कीं, ज्यांत हिंसा मुळींच नाहीं तर हा असा क्रुरतेचा, छाकटा वेदोक्त धर्म आम्हा सत्य शोधक समाजाच्या काय उपयोगी. हा वैदिक धर्म इतका दुष्ट आहे हे जाणूनच बौद्ध, जैन, लिंगाईत धर्मी आमचेच देशबंधु या वेदांत्याचा सहवास टाकून

निरनिराळे पंथ करून यांशी दूर झाले. बाकी राहिलेल्या खप्पीचें दांत त्यांच्या उष्टच्या कात्रिव पोळ्या व सोजिव तुपाने रंगलेले, हे त्यांच्यांतच राहून त्यांचे धर्म गुलाम बनून त्यांचे दास्यत्व करीत बसलेत. यांना या अशा अमंगळ खादाडांच्या वंषजांचे पाय धुऊन पिताना चिळस सुद्धां येईना.

**सांवत**—हे आपण जे पुरावे दिले, ते तर कृष्ण यजुर्वेदाच्या तैतरेय ब्राम्हण ग्रंथांतील परंतु आजकाल कांहीं ब्राम्हण शुक्ल यजुर्वेदाविषयीं मोठी घमेंड मारित असतात कीं आमच्या शतपथ ब्राम्हण ग्रंथा सारखा पवित्र ग्रंथ एकही नाहीं. तर ही गोष्ट खरी असावी कीं काय ? व शुक्ल आणि कृष्ण हे दोन यजुर्वेद आहेत कीं काय ?

**पं० धों०**—शुक्लयजुर्वेदी फार गोमा करतात तर आपण तिकडे वळू

अहो सांवत माध्यांदिनी शाखेच्या संहितेचे ४० अध्याय आहेत त्यांतील १४ वा अध्यायाचा शतपथ ब्राह्मणच शुक्ल यजुर्वेद्यांनीं पहावा, कीं त्यांत काय लिहिलें आहे तें. असे असून " रच कपोल कल्पित वेद भाष्य भूमिकादित " जागजागीं शतपथ ब्राह्मण ग्रंथांचा पुरावा देतात. बरें तेही करून येईल कीं शतपथ ब्राह्मणांत ही कृष्ण यजुर्वेदाप्रमाणें हिंसा आहे कीं नाहीं तीं.

या यजुर्वेदाच्या दोन भागाविषयीं आपण माहिती मागितली, तर त्या दुसऱ्या भागाची माहिती अशी

कांहीं लागते कीं, व्यासानें सर्व ऋष्यांनां ( कविनां ) जमऊन सर्वांची मंत्रें एकत्र करून त्याचे तीन ग्रंथ केले. एकाचे नांव ऋग्वेद ठेऊन तो " पैल " नामे ऋष्यास दिला. दुसऱ्याचे नांव यजुर्वेद ठेऊन तो " वैशंपायन " ऋष्यास दिला. त्या वेळेस " वैशंपायन " ऋष्याजवळ याज्ञवल्क्य नांवाचा एक त्याचा शिष्य होता. त्यानें तो वेद सर्व शिकला. हे पाहून वैशंपायनाच्या दुसऱ्या शिष्यानें याज्ञवल्क्याशी भांडण केले, तेव्हां याज्ञवल्क्यानें ती वेद विद्या वांती मार्गे सर्व बाहेर टाकून दिली. इतक्यांत ती वांती एका तितरपक्षानें भक्षून गायन केले. यांजवरून त्याचे तैतरेय कृष्ण यजुर्वेद व तैतरेय ब्राह्मणादि नाव देण्यांत आले. पुढें याज्ञवल्क्य ऋष्यांनीं सुर्योपासना करून आपणात नवे वेद रचण्याचे सामर्थ्य आणलें आणि त्या बळानें " शुक्ल यजुर्वेद रचला. याचे पुराव्यासाठीं शतपथ ब्राह्मणांतील सर्वा मागील वाक्य तुझापुढें ठेवितो.

**अदित्यानि मानि शुक्लानि यजु १ वर्षा वाजसेनयन याज्ञवल्कियेना ख्यायंते ॥**

शुक्ल यजुर्वेद शतपथ ब्राह्मण अध्याय १४.

या वेदाचे सहितेंत ४० अध्याय आहेत त्याची अनुक्रमणिका.

दर्शपौर्णमास १–२. अधान ३. अग्निष्टोम ४, अतिथ्येष्टी ५–६. उपांशुग्रहमंत्र ७. अदित्यग्रहमंत्र ८. राजसूय सौत्रामणी ९. यज्ञ १०. चयन ११. चिती १२,१३,१४,१५. शतरुद्रिय मंत्र १६. चितिवंसार-

धारा १७-१८. सौत्रामणी १९, २०, २१ अश्वमेध २२. अश्लेल भाषण २३. पशू प्रकर्ण २४. अश्वमेध २५,२६,२७,२८,२९. पुरुष मेध ३०,३१. सर्वमेध ३२,३३. पित्रु मेध ३४,३५. शांति पाठ ३६. प्रायःश्वित्त ३७,३८,३९. ज्ञाणकांड ४०. असें ४० अध्याय आहेत.

या वेदाचे भाषांतर, महिधर, उव्हट, सायनाचार्य आणि कर्क यांणीं केलेलें असून पांचवे "द्वि वेदांग" आणि सहावा देवयाज्ञिक असें आहे.

सांवत—या वेदांतून कांहींशी माहिती मिळेल काय ?

पं० धों०—मागें यावरील टिकाकारांनीं अध्याय ६ वर टिका केलेली आहे. ती मी एका ग्रंथाचे आधारानें माहिती देतों.

**॥ ऋतस्यत्वा देवहविः पाश्चेन प्रतिमुंचामि घर्षा मानुष्यः ॥** अध्याय ६ श्लोक ४ था.

टिका—॥ हे देव हविः देवानां हि विरूप यज्ञस्य पाशेनत्वां प्रतिमुंचामि ॥ एवं पशुं संबोध्य मित्रे समर्पयाति ॥ व्याम द्वय परिमितया कुश कृतमारज्वानां पाशंकत्वा शृगयोरंत राले पशुं छागं बध्नाति पाशंप्रति मुंचेदिति ॥

महिधर "वेद दिपे" षष्टे अध्याय

अर्थ—पशूंस दोरिनें यूप स्तंबास बांधून मारणाऱ्या पुरोहितांकडेस सोंपून देतात, आणि पशूस ह्मणतात कीं तूं देवाचा भक्ष आहेस.

॥ देवस्यता सवितुः ॥ अ० ६ श्लोक ५.

टिका— ॥ युपे पशु बध्नाति इतिं सुत्रार्थः ॥

अर्थ—यूपास जो पशू बांधलेला आहे, तो हा सुत्रार्थ होय.

॥ अग्निषोमाभ्यां जिष्ठं नियुनाज्मि ॥ अ० ६ श्लोक ६.

टिका—अग्निषोम देवताभ्यां जुष्टमाभि ऋचितं पशुं नियुनज्मि ब्रध्नामि ॥

अर्थ—अग्निषोम देवास ज्याची रुचा आवडते असा पशू मी बांधितों.

॥ अद्भ्यो स्त्रौषधि भ्यौ अमुत्रा माता०॥ श्लो० ७.

टिका— ॥ पशु प्रौक्षणिभीः प्रौक्षति ति मेव्यं करोति ॥

अर्थ—पशूवर पाणी शिंपून प्रौक्षण करावें.

॥ वाचंते शुद्धामि ॥ माणंते शुद्धामि ॥ श्लोक ८.

टिका— ॥ पान्ति मृतस्य पशोः प्राणा मुखा दीन्यष्टौ प्राणाय तनानि प्रति मंत्र शुध्राति अद्भिः स्पृशाति ॥

अर्थ—पशु वधल्यावर यज्ञ कर्त्याच्या स्त्रीनें हस्ते मार्जण करवावें.

॥ घृतेन द्यावा पृथिवी ॥ श्लो. ९.

टिका—वपामुत्खिद्य–द्यावा पृथिवी इति ॥ पशु दरात वपांनिष्काण्य आच्छादयेत ॥

अर्थ—पशूचे वपा ( काळीज ) काढून त्यांवर तूप टाकून त्याचा होम करणें (तळून काढणें ).

॥ अश्वस्त परोगो मृगस्ते प्राजापत्यः २४ अ० श्लो० १०

टिका—अश्वमेधिकानां पशुनां देवता संबंधं विधापिनोऽध्यामेनोच्यन्ते ॥ तत्राश्वमेधे एका विशंतिर्युपाः सन्ति तत्र मध्यमे युपे सप्तदश पशवो नियोजनियाः ॥ शतत्रय संख्या कानां पशूनां मध्ये पञ्चदश पंचदश पशुने कैकास्मिन्युपे युनक्ति ॥

अशी २९ मंत्रे आहेत. त्याचा अर्थच लिहितो ह्मणजे झाले सातवे मंत्रापासून तो २७ मंत्राचा भावार्थ कीं, अश्वमेधांत ६०९ अन्य पशू पाहिजेत. त्यांत अनेक रंगाचे बोकडे, बदक, पाहिजेत त्यांतून लहान पशू पक्षी २०७ सोडून देनें, असा भाष्यकार महिधर पंथाचा लेख आहे.

२८ वे मंत्रांत नरमेध चैत्र शु० १० चे दिनी करावा. त्यांत पशू बांधण्यास एक यूपस्तंब रोवांवे, त्यास ३११ बोकडें व २०० माणसें बांधावींत. मग त्याचे प्रोक्षण त्याग निवेदन करून माणसें सोडून द्यावींत. आणि ३११ बोकडे मारून त्यांचा होम करावा. असा महिधर भाष्यकार अर्थ करितो.

२९ वे मंत्रांत ह्मणतो कीं, माणसाचे दहा करण्याचें ऐवजी गाईची वपा ( काळीज ) याचा होम करावा. या पूर्वोक्त अनुष्टानाचे नांव पितृमेध होय.

या अशा नीच कृत्याचे महत्व तरी किती वाढविले.

यांस एक उदाहरणास्तव पाराशर स्मृतिच्या तिसरे अध्यायांतील ४० वा श्लोक ह्मणून दाखवितो.

॥ **पदे पदे यज्ञफल मानु पूर्व्या लभंति** ॥ भावार्थ–गंगेच्या यात्रें करूंस दर पाऊलास यज्ञाचे पुण्य सांगतात.

**सांवत**—यज्ञाकडून पुण्य तर कांहीं दिसत नाहीं. परंतु पापाची सामुग्री मात्र त्यांत भरली आहे. तर असे पापी यज्ञ फळ ज्या गंगेच्या मार्गानें प्राप्त होते, तर त्या गंगेचे यात्रेंत किती पाप भरले असेल? ह्मणूनच एखाद्या क्रूर निर्दयास तु पुरा काशिकर आहेस, असे ह्मणत असतो. ते कांहीं खोटें नाहीं.

कांहो पंडित सामवेद व अथर्वणवेदांत ही हिंवसा प्रकर्ण आहे काय?

**पं० धों०**–होय ताण्ड्य महा ब्राह्मण ह्मणून हा एक साम वेदाचा अंतर्गत आहे. त्या ग्रंथावर सायनाचार्याची भाष्य ( टीका ) आहे. त्यांत पुष्कळ तऱ्हेचे यज्ञ प्रकार लिहिलें आहे.

**सांवत**—सायनाचार्य हा कोण होता?

**पं० धों०**–सायनाचार्य हा ९०० वर्षांपूर्वीं कर्नाटक प्रांती विजय नामें एक नगरी होती. तेथें "बुक्क" या नांवाचा राजा होता. त्याचे आश्रित हा एक ब्राह्मणाचा मुलगा होता. त्यांस पूर्वीं "माधव" असें ह्मणत असत. पुढें त्यानें सन्यास धारण केल्यावर त्याचे "विद्यारण्य स्वामी" असें नांव पडलें. व पुढें तो ग्रंथ रचूं लागल्यावर त्याचें नांव "सायनाचार्य" पडलें.

सांवत०—साम वेदांतील कांहींशीं माहिती द्याल काय?

पं धों०—साम वेदाचे ताण्ड्यय महा ब्राह्मण ग्रंथांत अनेक क्रतुचे भेद लिहिले आहेत. त्यांचीं नांवें.

१ " अग्निष्टोमादि सप्तक्रतु; २ औपसद क्रतु, ३ चतुष्टोमक्रतु, ४ उद्भाद्दल भितक्रतु, ५ इंद्रस्तोम क्रतु, ६ निधनक्रतु, ७ वसिष्ट क्रतु चतुरात्र ८ विश्वामित्र, संजय चतुरात्र, ९ पंचशारदित्य पंचरात्र, १० विश्वजीत एकादस रात्र ११ प्रक्षाक्यक्रतु १२ चैत्ररथक्रतु, १३ गर्गक्रतु, १४अंगिरसामयनक्रतु, १५ शतरात्रक्रतु, १६ द्वादश संवत्सर सत्र, १७ शटत्रीश संवत्सर सत्र, १८ सारस्वत सत्र, १९ शटक्रतु, २० जोती:क्रतु, २१ ऋप भाप्य क्रतु, २२ कुलायाख्यक्रतु, २३ त्रिकद्रुक शटरात्र, २४ प्रजापति सत्परात्र, २५ ऐंद्र-सत्परात्र, २६ जनक सत्परात्र, २७ देवनवरात्र, २८ विशंति रात्र, २९ त्रय स्त्री शांतिरात्र, ३० चत्वारिंशद्रात्र, ३१ एक शष्टीरात्र क्रतु, ३२ सहस्र संवत्सर रात्र, ३३ सर्पसत्र, ३४ विश्वसृजमय नक्रतु, ३५ अदित्यपृष्ट्य मयनक्रतु आणि ३६ संवत्सरसत्र असे आहेत. या सर्व सुत्रांत ब्राह्मण, क्षेत्रिय, वैप्य या तिन्ही वर्गाचे कर्म, उपनयन, विवाह, अंत्येष्टी इत्यादि कांही फेरानें दावले आहे. या तिन्ही वर्गास यज्ञाचा अधिकार सांगितला आहे.

ताण्ड्य महा ब्राह्मणाचें वचन.

" यावच श्रुतीचे सुचनेस्तव खालीं या ग्रंथाचा खंड व मंत्र आंकड्यांनीं दर्शविले आहेत.

॥ परि श्वौ पशुन्नियुं जन्ति ॥ १.७, १.३, ४.
अर्थ—यूप नसल्यास परिधीस पशूनां वर बांधावे.

॥ वैशंयाजयेत् ॥ १.८, ४, ५. ( वैश्यानिही यज्ञ करावे. )

॥ एतद्वै वैशस्य समृद्धं यत्पशवः पशु भिरे वैनूं सवधयाति ॥ १८, ४, ६, ( यज्ञ केल्यानें वैश्याचे लक्ष्मीची वृद्धि होणार. )

॥ जोतिर्षा एषोऽग्निष्टोमो जोतिष्मंतं पुण्यलोकं जयतियएवं विद्वाने तेन् यजते ॥ १९, ११, ११. ( अग्निष्टोम यज्ञ केल्यानें मनुष्य पुण्य लोकीं जातो. )

॥ स्वाराजंगच्छतिय एवं वेद ॥ १९, १३, २. ( हा प्रकार जो जाणितो तो स्वर्गी जातो. )

॥ परमेष्ठितांगच्छतिय एवं वेद ॥ १९ १३,४. ( ब्रह्मपुरीस जातो. )

॥ अथैषविघ्नन: ॥ १९, १८, १. ( यज्ञ विघ्ने दाखवितो. )

॥ इंद्रोत्कामयत पाप् मानंभ्रातृव्यं विहन्या मितस एतं विघनम् पश्यत् ॥ १९, १८, २. ( पूर्वी इंद्रानें इच्छा केली कीं, शत्रू कोणत्या उपायानें मरेल. तव्हां शत्रू मरण्यास्तव इंद्रानें हा यज्ञ विधी युक्त केला ) तो यज्ञ प्रकार.

॥ एकादशना एकादश पशवः एकादश युपा भवान्ति ॥ " २, २, ४. " ( ११ दोऱ्यानें ११ पशु ११ युपास बांधावे. )

॥ तया समुद्य तथा राज्या यंयं कामं काम-

येततं तमभ्य श्रुतेऱ् एवं वेद ॥ "२०,२,९" (हा) यज्ञ केल्यानें मनः कामना पूर्ण होते ॥

॥ अजोग्नि पोमिय ॥ "२१, १४, ११." ( अग्निषोम देवास बोकड्या मारावा)

॥ ऐंद्रा मारुता उक्षणि मारुत्यो वत्स तर्याः ॥ २२,१४,११, ( इंद्र आणि मरूत नांवें गाय मारावी, व मरूतासच देणें झाल्यास वांसरूं मारावें. )

॥ पशू कामो यजेत् ॥ "२२,६,२." ( ज्यांस पशुंची इच्छा आहे त्यानें यज्ञ करावें ).

॥ सोम पौर्ष पशुमुपा लभ्य माल भेरन ॥ "२, १६, ४." ( सोमदेवासाठीं व पुषादेवासाठीं पशु मारावेत ).

असेंच हर्येक क्रतूंत हर्येक निरनिराळें फळ सांगितलें आहेत. कशांत ब्रह्मपद, कशांत इंद्रपद, कशांत प्रजापशु, अन्न, राजाधिकार वगैरे नाना तऱ्हेचे प्रकार या जिव्हेंच्या रुचेकरितां या भ्रष्ट खादाड ऋष्यांनीं प्राचिन इतिहास कल्पित कादंबऱ्या प्रमाणें लिहून ठेवलें आहे, कीं जसें प्रजापतीनें अमका यज्ञ केल्यानें पर्जन्य वृष्ठि झाली. रुद्रास पशु मारल्यानें जनावरांचा रोग गेला, मरती बंद झाली, आणि वृद्धि ही झाली. अशा अगणित बाढा लिहून ठेवल्यात. अशाच सर्व कृत्यांनी व हिंवसेनें चारी वेद व सुत्रे भरलेली आहेत. व याच प्रमाणें सामवेद संहितेंत व त्याचे अर्धगत आठही ब्राह्मणांत बहुत करून यज्ञ क्रियांच लिहिलेल्या आहेत.

सांवत—अथर्णव वेदाचा गोपथ ब्राह्मणांतील कांहींशी माहिती द्याल काय ?

पं० धों०—आपली इच्छा असल्यास बरें आहे. गोपथ ब्राह्मणांतील तीन श्लोके दाखवितो.

॥ ॐ मा ॥ सयिन्ति वा अहिताग्नेरग्नय: त एन मेवाग्ने ( त्मिध्यायन्ति यजमानं य एत मैद्रग्नं पशू षष्ठे षष्ठे मासे अलभते ॥

" गोपथ ब्राह्मण द्वितीय पाठ. "

अर्थ—प्रत्येक सहा सहा महिन्यानें बकऱ्यांचा यज्ञ करावा.

अथात: सव नियस्य पशोर्विभागं वक्षाम: ॥ उदूहृत्याच दानानि ॥ हनुस जिव्हे प्रस्तो तु: कण्ठ: सकाकुद: प्रतिहर्तु: स्येनं वक्ष उद्गातुर्दक्षिणं पार्श्वसास मध्यर्यो: सव्य मुपगा तृणां सव्योंत्स: प्रति प्रस्थातुर्दक्षिण श्रोरव्याख्रि ब्राह्मणो वरस कृथं ब्राह्मणा छं सिन: उरु: पोतु: सव्याश्रोणि र्होतूर ससकथं मैत्र्या वरूण्यो रूरछाव कस्य दक्षिणा दोर्नेष्टु: सव्या सदस्य स्य सदयूंचा नुन ग्रंप गृहपते जाघनी पत्न्यास्तांसा ब्राह्मणेन प्रतिग्राहयति ॥ वनिष्टुर्हृदयं वृ कौचा ङुं ल्यानि दक्षिणो बाहु राग्नि प्रस्य सव्य अत्रे यस्य दक्षिणौ पादौ गृहपते वृत

मदस्य सव्यो आंदौ गृहपत्न्यावत् प्रदाया: सहै वैनयो राष्ट्रस्तं गृहपते रेवानु शास्ति मणिजश्चिस्कन्धास्ति सश्च ग्रावस्तु तास्ति स्न श्चैक्रि कसा आर्द्ध गूंचापान श्चोत्रे तुरत उर्द्ध चम साध्वर्युणां क्ढोमाः शमयितुः शिरः सुब्र ब्रह्मणस्य यश्च सुत्या माहुयते तस्य चर्म इत्यादि ॥ " गोपथ ब्राह्मण पाठ ३ खंड १८. "

अर्थ—प्रस्तोता, प्रतिहर्ता, उद्गाता, अध्वर्यु, उपगाता, प्रतिप्रस्थाता, ब्रह्मा, ब्राह्मणछंसि, होता, मैत्रावरूण, अछावक, नेष्टा, सदस्य, अग्निध्र, ग्रावस्तोता, उन्नेता, अध्वर्यु, शमिता, सुब्रह्मण्य, गृहपते, व्रतपद आणि प्रमुख. हे वरील २२ गृहस्थ यज्ञ करण्यास मदतगार व पुरोहित असतात. याप्रमाणें यज्ञांतील पशूंचे वाटे घालून हे वाटवाटून घेणारे असतात, त्यांची प्रशंसा केली आहे.

॥ अथातो यज्ञ क्रमा. अग्नयाधियमग्नाधियात्पूर्णाहुति ॥ पूर्णाहुतेग्नि होत्रमग्नि होत्रा दर्शपौर्णमासौ दर्शपौर्णमासाभ्या माग्रयणं आग्रयणाश्चातुर्मासानि ॥ चातुर्मासेभ्याः पशु बन्ध पशु बाधग्निष्टोमो अग्निष्टोमा द्राजसूयो राजसुया द्वाजपेयः ॥ वाजपेयादश्वमेधः ॥ पुरूष मेधात्सर्वमेधः ॥ सर्वमेधा-

**दक्षिवन्तो ॥ दक्षिणा वदन्ति दूक्षिणा आ दक्षिणा सहस्र दाक्षिणे मस्र तिष्ठंस्ते वा ऐते यज्ञ क्रमः ॥ पाठ ९ खंड ७.**

याचा अर्थ उघड आहे ह्मणून लिहीत नाहीं वर लिहिल्याप्रमाणें यज्ञविस्तार दाखविला.

हे सर्व वेद मंत्र व्यासाने एकत्र करून चार वेदांच्या संहिता ( भाग ) बांधल्या व व्यासानें आपल्या चारी शिष्यांनां वाटून दिल्या.

१ पैल ऋष्यास ऋग्वेद, ऐतरेय ब्राह्मण व भेद दिला.

२ वैशंपायन ऋषास यजुर्वेद, तैतरेय ब्राह्मण व भेद दिला.

३ जैमिनी ऋषास सामवेद, ताण्ड्य व भेद १००० दिले.

४ सुमंतु ऋषास अथर्वणवेद, गोपथ ब्राह्मण व भेद दिला.

चौवेदी ब्राह्मणांच्या शाखा.

१ ऋग्वेद्यांच्या सांख्यायनि, शाकल, वाष्कल, अश्वलायनि व मण्डुक अशा पांच शाखा आहेत.

२ कृष्ण यजुर्वेद्यांच्या तैतरेय, अपस्तंब, हिरण्यकेशि, मैत्राणि, सत्यापाड व बौध्यायनि अशा सहा शाखा आहेत.

३ शुक्लयजुर्वेद्यांच्या " वाजसनेय याज्ञवल्क्य " यांनी केलेल्या कण्व, माध्यांदिनी, कात्यायनि वगैरे आठ शाखा आहेत.

४ सामवेद्यांच्या कौथुमि, राणायणि व गौभील अशा शाखा तीन आहेत.

५ अथर्णवेदांच्या पिपलाद व शौनक अशा दोन शाखा आहेत. या एकेक शाखेचे जे जे अचार्य झाले त्यानीं आपापल्या शाखेस्तव एकेक ज्यांचे त्यानीं सूत्र रचले. त्यां सूत्रांसच अनुसरून ब्राह्मण लोक इत्यादि कर्मे करितात.

संहिता, ब्राह्मण, अरण्यक, उपनिषद् व परिशीष्ट असे या वेदांचे पांच भाग आहेत. यज्ञरूपी धर्म मंत्र ब्राह्मण आणि कल्प या तीन ग्रंथानें होतो. ह्मणून " यास्काचार्य " यानें कल्प ( सूत्रें ) हीं वेद तुल्य ठरविलीत.

हरएक शाखेच्या सूत्रांचे एक श्रोत व दुसरा गृह्य असे दोन भाग आहेत. या सर्व श्रुतिनी यज्ञक्रियांच लिहिलेली आहे. आणि गृहांत गृहस्थांचा धर्म लिहिला आहे. त्यांस स्मृतित गणितात. या सुत्रांची अन्यग्रंथानी मोठी योग्यता मानिली आहे.

अनेक शाखेचे अनेक सुत्रे आहेत. परंतु सर्वांचा भावार्थ एकच आहे.

**सावंत**—त्यांतील एखाद्या शाखेचे सूत्र ऐकवा.

**पं० धों०**—अश्वलायन शाखेचे सूत्र पाहू.

" अश्वलायन सूत्रम् "

॥ दैव्या शमितार आरभत्वं० ॥ " अ० ३ कां० ३ " ( पशूस मारा. ) ॥ दैवतेन पशुनानात्वं० ॥ " ३. ७. " ( देवतांस निरनिराळें पशुं पाहिजेत.

॥ षाण्मास्यः सांवत्सरोव ॥ " ३. ४. " ( सहा महिन्यानी पशू मारावा ) ॥ सौत्रामण्यां ॥ " ३. ९. " ( दारू पिण्याची विधी ) अश्विनी सारस्वतैंद्राः पशवः बार्हस्पत्योवा चतुर्थः ऐंद्र सावित्र वारूणाः पशु पुरोडाशाः ॥ " ३. ९. " ( आश्विन, सारस्वत व इंद्र या तिघांस पशूचे बळी देनें. आणि ब्रहस्पतिस चौथा पशू द्यावा. तद्वत इंद्र, सविता व वरुणास ही पशू बळी द्यावेत. ) ॥ दर्शपौर्णमसाभ्यामि ष्टिः पशू चातुर्मासैरथ सोमेन ॥ " ४. १. " ( अमवाशा, पोर्णिमा व चातुर्मासाचे अनुष्ठानांत पशु मारावे ) ॥ अथसवनियन पशू नाचरंति ॥ " ९. ३. " ( सवनि अनुष्ठानांत पशू वधावा. ) सात यज्ञ मिळून एक संस्थाही आहे. त्यास संस्था अशी. संज्ञा दिलेली आहे.

**सांवत**—ती यज्ञे कोणती ?

**पं० धों०**—॥ अग्निष्टोमोऽत्याग्निष्णोम उक्थः षोडशी वाजपेयो अतिरात्रौऽत्पोर्याम इति संस्थाः ॥ "६. ११." ( अग्निष्टोम, अत्याग्निष्टोम, उक्थ, षोडशी वाजपेय, अतिरात्र आणि आत्पोर्याम अशी सांत यज्ञे मिळून संस्था जाणावी.

**सांवत**—पंडितराव यापेक्षां आणखी कांहीं माहिती मिळेल काय ?

**पं० धों०**—पुरे नाहीं झाली तर ऐका.

॥ अग्नेयें द्राग्नैका हशिना पशवः उतरषडक ॥ " २ २ " ( अग्नि किंवा इंद्राग्नि यांच्या नांवें ११ पशु मारावेत ). ॥ वायव्य पशुः उत्तर षट्क ॥ " ३

–२." ( वायु देवांस एक पशु पाहिजे ) ॥ सज्ञत्व-मश्वं पत्न्यो धुन्वंति उत्त० ॥ " ४. ८. " ( मारलेला घोडा व यज्ञ कर्त्याची भार्या एका वस्त्रा खालीं झाकावी.) ॥ तस्य विभागं वक्षामः उत० ॥" १–९. " ( यांत यज्ञांतील वधलेला पशु ब्राह्मणांनी वांटून घेण्याचा प्रकार सांगितला आहे. )

या शिवाय या अश्वलायन गृहसूत्राचे चार अध्याय आहेत त्यांत गृहस्थाश्रम धर्म सांगितला आहे. गृहस्थाश्रमांत व श्रोतांत इतकाच फेर आहे की एकाग्निचें कुंड करणारा ब्राह्मण "**स्मार्ताग्नि**" व गृहस्थही ठेवितात. हा अग्नि लग्नविवाहांत उत्पन्न करितात. आणि जो गृहस्थ अग्नि उत्पन्न करून अग्नि होत्र घेतों त्यांस "**श्रोताग्नि**" ह्मणतात. त्यांची "**दक्षिणाग्नि, गार्हस्पत्याग्नि, अहव नियाग्नि**" अशी नांवें आहेत. अशा अग्निहोत्र्यांनां यज्ञ करण्याचा अधिकार आहे. या अग्निहोत्र्यांचे कर्म श्रोत सुत्रांत वर्णन केले आहे. व यांचा धर्म गृहसुत्रांत आहे. यांचा अग्नि उपासना धर्म मी मागेच " सत्यांजन " नावाच्या लहानशा पुस्तकांत कळविला आहे तो पहा.

**सावंत**—गृहसुत्रांत गृहस्थांचा धर्म कोणत्या प्रकारे कळविला आहे.

**पं० धों०**—बरें आहे तोही थोडासा भाग कळवितो.

॥ अथ पशु कल्पः ॥ " १–१. " ( पशूचे यज्ञ विधी विधान ) ॥ उतरतो अग्नेः ॥ शमित्र शायतनं

कृत्वा ॥ पशुमाल्याव्य ॥ सपला शयार्द्र शाखया पश्चा दु पष्टशेन ॥ त्वाजुष्टं उपा करा मिति ॥ " १-११-१." ( अग्निचे उत्तरेस पशु वधण्यांस जागा करितात. व पशूस स्नान घालून पळसाचे वोल्या डाहांळिने त्यांस स्पर्श करितात. आणि ह्मणतात कीं तूं देवाचा भक्ष आहेस यास्तव तुला भक्षण्यायोग्य करितों. ) ॥ व्रिहि यवमति भिराद्भिः पुरस्तात प्रोक्षति अमुपौत्वाजुष्टं प्रोक्षामि ॥ " १-११-१ " ( पाण्यांत जव भिजऊन ते जवाचे पाणी पशुवर उडवितात ) ॥ अवृतैव पर्याग्नि कृत्वो दश्चं न यंति ॥ " १-११-५. " ( जळते लांकूड हातांत घेऊन पशूस प्रदक्षणां करितात. ). ॥ तस्ये पुरस्ता दुल्मुकं हरन्ति ॥ " १-२१-६. " ( जळते लांकूड घेऊन पशूचे पुढें चालतात ) ॥ शामित्र एश भवति ॥ ( पशूस वधण्याचे जागी नेतात. ) ॥ वपाश्र-पणिभ्यां कर्ता पशु मन्वारभते ॥ " १-११-८. " काळजाचे यज्ञ मंत्र ह्मणतात. ) ॥ पश्चाछा मित्रस्य पाक शिर संप्रत्य कशिर संवोदक पादं संज्ञाय पुरा-णाभे तृणमत्तर्धाय वपा मुत्खिद्य ॥ " १-११-१० " ( पशू बांधून त्याचे नाभितील काळीज काढून घेतात ) यांस " नारायण वृत्तीचा " पुरावा. ॥ नारायण वृत ॥ शमितस्य पश्चिमे देशे वर्हिरूप स्तृणति कर्ता ॥ तं यत्र निहृ निशान्तो भवन्ति तध्वर्यु वर्हि रंयस्तादु पास्य-ति इति श्रुतेः ॥ तत्तस्तस्मिन वर्हिषी प्राकशिर संवो-दक् पादं पशूं शमयति शमिता वपास्यनं ज्ञात्वा तिर्यक छित्वा वपां उद्धरेत् शमित्रे प्रताप्यति वपामभि धार्य

जुहुयात ॥ ( वधस्तंबी गवत अथरून त्यावर पशूस मारावें अशी वेदाज्ञा आहे. व त्यास मारून त्याचे काळीज भाजून त्यांवर तूप टाकून त्याचा होम करून ते स्वः करावे.

" गृह सूत्र अ० २ अन्न प्राशन संस्कारविधी. "

॥ षष्ट मास्यन्न प्राशनं ॥ " १-१६-१. " ( मूल जन्मल्यावर सहाविमासी मुलाचा अन्न प्राशन संस्कार करावा ) ॥ आज मन्नाद्य कामः ॥ " १-१६-२ " ( मुलांस बकऱ्याचे मांस या संस्कारात चारले तर पुढें तो श्रीमान होईल ) ॥ तैतिरं ब्रह्म वर्चस कामः ॥ " १-१६-३ " ( मुलांस तितरपक्षाचे मांस चारलें तर तो मोठा ब्रह्म तेजस्वि होईल. )

" आतां थोडासा गृहसूत्रांतील मधुपर्काचा नमुना ऐका. "

॥ ऋत्विजो वृत्वा मधुपर्क माहरेत् ॥ " १-१४-१. " ( यज्ञस्थळी ऋत्विजास, लग्नमंडपी वधु गृहीं वरास वरयते गृहीं राजा आल्यास त्यांनां मधुपर्क करावा ) ॥ स्नात कायो पस्थितात् ॥ " १-१४-१ " ( गुरू सासरा व मामा यांना मधुपर्क करावा ) ॥ अचार्य श्वश्रु पित्रु तुलानांच ॥ ( अचार्य, गुरू, काका सासरा व मामा हे घरीं आल्यास यांनांही मधुपर्क करावा ) ॥ आचांतोद कायेगां वेदयन्ते ॥ ( त्यांनां मुख मार्जनास पाणी देऊन त्यां समोर गाय उभी करावी. ) ॥ हतोमे पाप्मा महेत् ॥ इति जापित्वि कुरूतेति कारयिष्यन् ॥ " यावर नारायण वृत्ति " इमं मंत्र

जपित्वा ओंम कुरूतेति ब्रुयात् यदिकार यिष्यन् भवति तदाच दाता आलभेत् " ( यावरील सुत्रांतील मंत्र ह्मणून " ओंम " हा शब्द उच्चारून घरवाल्यानें गाइचा वध करावा. ) ॥ नामांसो मधुपर्को भवति ॥ " यावर नारायण वृत्ति " ॥ मधुपर्काङ्ग भोजनं अमासं न भवतित्यथः पशू करण पक्षे तन्मांसेन भोजनं उत्सर्जन पक्षे मांसा नारेण ॥ ( मधुपर्काचे जेवण मांसा शिवाय होत नाहीं. यांस्तव वधलेल्या पशूचे मांस शिजऊन खावे. किंवा तो पशू सोडला तर त्याचे ऐवजीं दुसरे मांस आणून खावे.

॥ अपोद्धुरन्वष्टक्यं ॥ ( नवमिचे अन्यष्ट कर्म करावे ) ॥ तसैव मासस्य प्रकल्प ॥ " यावर नारायण वृत्ति " ॥ अपरस्मिन्न हनि नवम्या मन्वष्टक्यं नाम कर्म कार्य मित्यर्थः ॥ योऽष्टम्यां पशुः कृतः तसैव मांसं ब्राह्मण भोजनार्थं प्रकल्प सकृत्येत्यर्थः ॥ ( ज्या पशुंचा वध केला असेल त्या पशुंचे मांस ब्राह्मणांनां आदिकरून वाढावे. )

**सांवत**—आपण जे मागें सत्बोध ग्रंथांत एके ठिकाणीं सांगितलें आहे कीं, शुलगव यज्ञ त्याचा प्रकार कसा काय आहे तो कळूं द्या.

**पं० धों०**—बरें आहे. गृहसुत्रवरून कळवितो. ॥ अथशुलगव अनुष्टान अशा प्रकारें करावें ) ॥ शुर दिव सन्तेवार्द्रया ॥ ( शरद ऋतूंत कार्तीक मासीं अथवा वसंत ऋतु चैत्र किंवा वैशाख मासीं अरद्रा नक्षत्रीं शुलगव यज्ञ होतो. ) ॥ श्रेष्टंस्वस्ययुवस्य ॥

( मोठा बलवान बैल आणावा ) ॥ अकुष्टि एष्टत ( तो बैल रोगी नसावा ) ॥कामं कृष्ण मालो हवांश्वेत॥ ( काळ्या रंगाचा उत्तम असावा ) ॥ व्रिहि यत्र मति भिरूद्भिरभिषिच्य ॥ ( त्या बैलावर पाण्यानें अभिषक करावे ) ॥ शिरस्त अभसत ॥ ) डोक्यापासून ते पुछा पर्यंत ) ॥ रुद्राय महादेवाय जुष्टोवर्ध स्वेति ॥ ( महादेवाचे उपयोगीं पडणारा मंत्र ह्मणावा ) ॥ प्रोक्षणादि समानं पशुना विशेन्व क्षामः ॥ ( इतर पशुप्रमाणें बैलांचाही वध करावा ) ॥ पात्र्यापलेश नवावया जुहुयात इति विज्ञायते॥ ( पळसाचे पानावर त्याचे काळीज ठेवून होम करावा ) ॥ हराय मृडाय सर्वाय शिवाय महादेवायो ग्राया भिमाय पशुपतये रूद्राये शंकराये शानाय स्वाहिति ॥ ( होत्र करतेवेळीं हे वरील शिवाचे १२ नांवें जपावेत ) ॥ सएष शुलगवो धन्यो लोक्यः पुण्यः पुत्रः पशव्य अयुष्यो यशस्य ॥ ( हा यज्ञ केल्यानें कर्त्यास धान्य, कीर्ति, पुत्र, पुण्य, पशु समद्धि व आयुष्य प्राप्त होतें. ) ॥ इष्टवान्य मृत्सृजेत ॥ ( एका बैलाचें यज्ञ करून दुसरा बैल ( वसु ) सोडून देणें. )

सांवत—तेलंगी ब्राह्मणाच्या धर्मांत हिंसा आहे काय?

पं० घो०—पहा सांवत " अपस्तंत्र शाकेचे ब्राह्मण " आहेत हे ब्राह्मण तेलंग देशांत व महाराष्ट्रांत फार करून असतात. या ब्राह्मणाजे " अपस्तंबी धर्म सूत्र " नांवाचा एक धर्म ग्रंथ आहे त्यांवर " हरदत्त " नामें टिका आहे. त्यांतील कांहीं सूत्रे आपणापुढें ठेवितो.

॥ धन्व नडु होरमक्षम् ॥ " प्रश्न १ पटल ५ सूत्र ३० ( गाय व बैल खाणें पवित्र आहे. ) ॥ क्या क्त्र भोज्य मितिहि ब्राह्मणम् ॥ "१-५-२८" ( ब्राह्मण ग्रंथांत पशांचा भक्ष पवित्र पवित्र आहे. ) ॥ मेध्यमाण डुहं निति वासनेयेकम् ॥ "१-५-३१" ( वाजासनिय ह्मणतो बैल यज्ञ पशु आहे ) ॥ गोमधुपर्का हों वेदाध्यायः ॥ "२-४-१" ( मधुपर्कांत गाईचा वध अगत्य करावा, अशी वेदाज्ञा आहे. ) ॥ अचार्य ऋत्विक स्नातको राजा धर्म युक्तः ॥ "२-४-६" ( अचार्य, ऋत्विक, वर व राजा यांस ब्राह्मणानें मधुपर्क द्यावा. ) ॥ धर्मज्ञ समयः प्रमाणं वेदाश्च ॥ "१-१-२" ( धर्म जाणण्याची ज्याची इच्छा असेल त्यानें या वेद वाक्यांवर आपली श्रद्धा राखावी. ) तसाच साम वेदांतील " लाट्यायन " ऋष्यानें केलेलीं " लाट्यायन सुत्रें " त्यांतील थोडासा मासला पहा. ॥ उक्षाचे दनुर्वंध्य औक्षगोरंध्रे ॥ "१-६-४२" ( बैलाचा यज्ञ करितांना बैलाचा मंत्र ह्मणावा. ) ॥ ऋषभ अर्षभं ॥ ( सांडीचे यज्ञांत उंटाचा मंत्र ह्मणावा.) ॥ आज आजिग ॥ बोकडाचे यज्ञांत आजा मंत्र ह्मणावा. ) ॥मेष ओर्णा वयं ॥ ( मेंढरांचे यज्ञांत मेंढ्याचा मंत्र ह्मणावा. ) ॥ वपायां हुतायां धीष्ण पानु पतिष्टेरन् ॥ ( काळनाचा यज्ञ करितांना "उपस्थान" मंत्र ह्मणावा. ) ॥ गोष्टे पशु कामः ॥ गाईचे गोठ्यांत यज्ञ केल्यानें पशु वृद्धि होते ) ॥ स्मशानेऽभिचरन् ॥ ( स्मशानांत यज्ञ केल्यानें शत्रू नाश पावेल ) ॥ वै-

शंयोविशः स्वराजानः पुरस्कुर्विरन् सगासवे नये जेता ॥ ( वैश्यानें गोसव यज्ञ करावा) ॥ राजाश्वमेधेनयजेत् ॥ ( राजानें अश्वमेध करावा ) ॥ पंचशारदिये पशु बन्धर्यं जेत ॥ ( पंचशारदिय यज्ञांत पशु मारावा ) तसाच "यज्ञेश्वर शास्त्री " याचे ग्रंथाचे ७५ वे पृष्टांतील १०८ व १०९ श्लोकांत सांगितलें आहे कीं, आपला अग्निहोत्री ब्राह्मण आपले घरीं आला तर त्याचे सन्मानार्ग भोजन देण्यास बैल अथवा वेंढा मारून शिजवून त्यास भोजन देऊन तृप्त करावें. यांवर टिकाकार लिहितों कीं, स्नातक, अचार्य, राजा, मित्र आणि जांवई यांचे करितां दरवर्षीं ब्राह्मणांनीं मधुपर्क करावा. यांस प्रष्टिकरणार्थ " याज्ञवल्क्य स्मृति १७६ व १७७ श्लोकांत सांगितले आहे, कीं पांच नखांचे प्राणी सिंह, गव्हा, कासव, मेंढा, ससा व गेंडा हे ब्राह्मणांस भक्षण करण्यास योग्य आहेत, व पाटिन आणि राजीन या दोन जातीचे मासे तर ब्राह्मणांनीं अगत्य भक्षिलेंच पाहिजेत.

**सांवत**—या शिवाय आणखी कांहीं पुराणांतरी व इतर ग्रंथांतरी हिंवसा कथिली आहे काय असल्यास कळवाल तर बरे होईल.

**पं० धों०**—आपली इच्छा " याज्ञवल्क्य स्मृति श्लो० ३०३—३०४ यांत सांगितलें आहे कीं " गृह यज्ञांत " ( वराचे वांस्तुशांतित ) गूळ, क्षीर, ऋषीधान्य, दूध, दही भात, तूप भात, चटणी मांस, केशरि

भात इतकें पदार्थ करून गृहशांती मध्यें ब्राह्मणांस जेऊं घालावे. "मत्स्यपुराण अ० १७ श्लो० ३०— ३६ पर्यंत" श्राद्ध कल्प सांगितला आहे. त्यांत ब्राह्मणांस स्मृति प्रमाणें मासे, हरण, बोकड, पक्षीं, कोंकरें, चितळ, मृग, ऋक्ष, डुकर, टोणगे, ससे, कासव, बोकूड लंबकर्ण, गेंडे, लोहवर्णी मेंढा शिवाय वाघ व सिंह अशा प्राण्यांचे मांस लागतें. मार्कंडेय पुराण अ० १२ श्लोक १० । अ० १३ व अ० १९ श्लो० १८ देवि महात्म्यांतील चंडिपाठांत लिहितात कीं, देवीचे पुजेस बलिदानास पशूचे लोहयुक्त मांस व दारू आर्पण करावी. महाभारथ द्रोपदीपर्व सर्ग १ श्लोक ४ व सर्ग ६ श्लो० १ यांत ह्मणतांत कीं ब्राह्मणास खाण्या करितां पुष्कळ हरणें मारून आणिलीं. धनुर्धर राजानें पुष्कळ हरणें, डुकरें व रानह्मसी मारून आणून ब्राह्मणानां जेऊ घातलें. भारथ अश्वमेधपर्व अध्याय ८८. मध्यें सांगितलें आहे कीं, धर्मराजानें या ब्राह्मणाच्या सांगण्यावरूव बेल, खैर, देवदार असे अनेक जातीचें यूप रोऊन त्यांस पशु पक्षी जलचर असे ३०० जातींचे प्राणी बांधलें त्या समारंभास व्यवस, नारद व तुंबरही होते. अ० ८९ त सर्व प्राण्यांचे मांस व घोड्याचेही मांस शिजविलें, त्या घोड्याचे काळीज विधी संस्कारानें द्रोपदीस देणार, तो इतक्यांत; ते वाईट कृत्य द्रोपदीस न आंवडून ह्मणा, किंवा तिला त्यांच्या कृत्यांची घाण येऊन ह्मणां, अथवा कसें तरी खरे किंवा खोटें म्हणां, द्रोपदीस उपवेशन संस्कार झाला ( द्रोपदी

दूरशी झाली ) यास्तव याज्ञिक खादाड ब्राम्हणांनीं ते घोड्याचें अमंगळ काळीज एका ब्राह्मणाचे हातावर ठेवलें, कीं लगेच त्या खादाड ब्राह्मणानें त्याचा गटका मारलाच. अशा या धर्म ढोंगी खादाडाच्या तापत्र यांतून आपला बचाव करण्यास झट रजोश्वला ( दूरसी ) होऊन द्रौपदी बसली. त्या समारंभांत मद्याची हौदे भरली होती. अन्नाचें पर्वत पडले होते. असंख्य जनावरें मारून त्यांचे मांस शिजविले. होते तितके ही या खादाड ब्राह्मणांनीं स्वः केलें. "अध्यात्म रामायण उत्तर कांड अ० १ श्लो० १२ सांगितले आहे कीं, रामचंद्रानें लंकेहून परत येताना, मार्गांत विश्वामित्र, भृगु, अंगिरस, वामदेव व अगस्ति या ऋषांकरितां गाय मारून ब्राह्मणास मधुपर्क केला. "श्राद्ध विवेक ग्रंथ पान १६ हा ग्रंथ पवित्र काशित रचला गेला. यांत मातृपितृ श्राद्धविधी अनेक प्रकारें लिहिलेला आहे. त्यांत महिस, मेंढा, हरण, रुइ, आजा, ससा, कांसव, डुकर, तीतर, लावक वगैरें मारून त्यांचें मांस ब्राह्मणास चारावें. प्राण्यांस मारतांना त्यावर पाणी शिपून ह्मणावे कीं ॥ ओं भ्यस्त्वा जुष्टं प्रोक्षाणि ॥ ( माझे पित्रांस्तव तुला पवित्र करितों ) असें ह्मणून प्राण्यांचा वध करावा. वेळेवर हे प्राणीं न मिळालें तर सिंह, लांडगा, वाघ, कोल्यांनीं मारलेले मांस तेंहीं न मिळाल्यास बाजारचे मांस आणून कार्य भाग उरकून घ्यावें. त्यांस वरील मंत्राची जरूर नाहीं.

इतक्यां चौथ्या वांबे रैफलेंतील एक मुसलमान शि-

पाइ ह्मणून उठला कीं कैंव पंडत हलतो ये ब्रम्मन लोकोंनें गोरक्षका तो बडा सोंग लाकें हिंदुस्थानमें बडी चलवल मचा दियी थीये कैसा ?

पं० धों०—

॥ पद ॥ “ कविराचे चालीवर. ”

वागके ये पंडे क्यारे ॥ हुयेहयगौपालनहारे ॥ध्रु०॥
धेड बिचारे पेटके मारे गौमुये पर खाते ॥
इसलिये ये पंडे उनके छांवसे दूर रहते ॥ १ ॥
अंग्रेज सरकार गौ वधते हय लिये खानेके भाई ॥
उन्पे प्यार मुसलमिनेंसे नाहक् करते लढाई ॥ २ ॥
गवालंब गोमेध पशु हनन जो करने चालें ॥
उनके नामसे पितर खिलाते ये पंडे गोरक्षवाले ॥ ३ ॥
गौमाताकेये भगवत गौको नित रोज देते लाथा ॥
उस्के चमडेका जुता पैनकर करते शेखिकें बाता ॥ ४ ॥
गौके नामपर पैसे मंगकर पगार अपना निकाले ॥
ये हिकमत समझेना किसीकों फस रहे भोले भाले ॥५॥
बेशधारी लांडगे घूस मेंढ्यामे मेंढ्या चराते ॥
लोक कहे ये मेंढपाल ठक नहीं पछाने जाते ॥ ६ ॥
सच्चे गौपालोंकीं येधूर्तोंन्ने उडा ई दैना ॥
खेती भाती लीई डाल वसेमे मार रहेहय चैना ॥ ७ ॥
छुरी हातले खसाई करते गौपे एकदम सह्ला ॥
पन यें कलम खसायोंका गौपालोपर नित्त रोज हल्ला ॥८॥
सत्यशोधक **धोंडीराम** कहे पछानो इनको पुरे ॥
क्यों लगेहो नादमें बम्मन बहुरूपे ये सारे ॥ ९ ॥

**सांवत**—काहो पंडित आताशा तर हे मधुपर्क करितांना अथवा श्राद्धांत मांस खातांना कोठेंच आढळण्यांत येत नाहींत. याचे कारण काय ?

**पं० धों०**—पूर्वीं आपलेंच देशबंधु यांतून कांहीं लोकांस यांचा हा विलक्षण व घाणेरडा अमंगळ निर्दयत्वेचा प्रकार न अवडून एक जैन धर्म उपस्थित करून अहिंसा धर्म सुरू केला. वयांच्या जागोजाग हिंसक यज्ञांचा विध्वंस करूं लागलें. ते कोणते ह्मणाल तर ज्यांस ब्राह्मणाच्या हरयेक ग्रंथानीं राक्षस, दैत्य अशी संज्ञा दिलेली आहे तें. त्यांचा भरणाहीं अतीशय होऊन, त्यांची यांची युद्धेही पुष्कळ झालींत. तेंव्हां यांच्यांतीलच कात्यायनाचा भाष्यकार आपल्या टिकेंत या कलयुगाचे निमीत्य दाखऊन पाराशरानें गौचे बदला बकऱ्याचे मधुपर्क करावे असे ठरविले, ते ॥ अतश्च गवालंब्रस्य कलो निशिद्धत्वात ॥ तस्थाने आजालंभः ॥ त्याचे मागाहून " कौस्तुभ कारानें हाही प्रकार मोडण्यास्तव ॥ मांसेन भोजनं दानं इति मास प्रतिनिधित्वेतमाषा विकारो भोजने देवः विनायक शांत्या दौमास प्रतिनिधित्वेन ॥ ( ज्याची पुजा करणे त्यांस भांसाचे भोजन देणें खरें. परंतु त्याचे ऐवजीं "उडीद" हे मांसा समान आहे. यास्तव उडदाचे अन्नास मांस जाणून पक्ष, मास, विनायकशांती हे प्रकार आवरून घ्यावेत. ) अशा प्रकारे त्याने वरिल श्लोक ग्रंथांत रचून ठेऊन जग लज्जेकरितां मांसा ऐवजीं उडदावर हरयेक प्रकार अवरून घेण्याचे सुरू केले.

**सांवत**—काहो पंडित पहा आपण लोक या ब्राह्मणासारखे कांहीं इतके अभक्षभक्ष कुळींतील नसून आपणास हे शिवत सुद्धां नाहींत. व आपण खरे क्षत्रिय उत्तम कुळींतील असून आपल्यांतील श्रीमानांस मात्र क्षत्रिय ह्मणतात व दुसरा गरीब स्थितींतील एखादा त्याचाच नातेवाईक कोणी असला तर त्यास शूद्र जाणितात. व आपणही जाणून घेतो. आणि आतां तर ते मर्वांनाच शूद्रांत लेखूं लागलेत. तर इतकें आपण ब्राह्मणेतर लोक हलकट कीं काय ?

पं० धों०—अहो सांवत हलकट तरी बरें परंतु शूद्र हे कोणास ह्मणलेले आहे. यां विषयीं तुह्मीं कोठें शोध केलांत काय ? आहो यजुर्वेदाचे तैंतरेय अरण्यक पहा ॥ कल्प दासाः मयवसो वहेयुः अथेनं अनसा वहंती ते केशां ॥ ह्मणजे प्रेतास शूद्र ही संज्ञा देऊन प्रेत गाड्यांत घालून नेतात.

या श्रुतिवरून हे भ्रष्ट ब्राह्मण तुह्मीं यजमान असून तुह्मास शूद्र ह्मणतात. तूह्मास विद्या नसल्यामुळें शूद्र या शब्दांचा अर्थ न कळतां आपल्या कुळींस यांचे सहवासांत राहून शूद्र ह्मणऊन घेता. तर तुमची कुळीं प्रेतवत कीं काय ? आहो ज्यांस विद्या नाहीं. त्यास ज्ञान नाहीं. व या जगांत ज्यांस ज्ञान नाहीं, तो खरोखरच जिवंत असून त्यांस मेलेल्या प्रेतावतच जाणले पाहिजे. तर ही येवढी मोठी उपमा ब्राह्मणेत्तरांस मिळण्यास हे स्वार्थी ब्राह्मणाच कारण झालेत, यांनीं तु-

मत्री विद्या बंद ठेऊन तुह्मास अज्ञाणी करून ठेवले. ज्ञान नसल्यामुळें अर्थातच तुह्मास मढ्यावत जाणून शूद्र ही उपमा देऊन तुमचे उरावर पाहिजे तशा मजा मारू लागले. तर माझ्या बांधवानो, आतां तरी नेत्र उघडा, संततीस विद्या शिकवा, जागे व्हा, मढ्यांतून उठा व पुनर्जन्म पाऊन शूद्र या शब्दावर लंघन करा. तसेच जे अतिशूद्र ( मढ्यापेक्षांही नीच ) ह्मणउन घेणारे यांनांहीं माझी विनंती पूर्वक हीच सूचना आहे कीं, तुह्मी जागे व्हा. व ह्या राजात विद्यादानाची फळे घ्या. पुन्हा असा राजा मिळणें नाहीं. यास्तव हा राजा आपणांवर चिरायु असावा अशी इश्वराजवळ दररोज प्रार्थना करा. ह्मणजे तुह्मी मनुष्यांत आलाच समजा.

**सांवत**—काहो पंडित वेद अनादि ह्मणतात ते खेर काय ?

**पं० धों०**—

॥ अंभग. ॥

वेद अदिकानादिचे । आह्मी वेदांच्या आदिचे ॥ १ ॥<br>
समाज सत्यशोधक । असत्य वेदाबाधक ॥ २ ॥<br>
सत्य तेथें हो असत्य । वेद असत्य हे सत्य ॥ ३ ॥<br>
सत्यशोधकही सभा । वेदा पूर्वी तिची प्रभा ॥ ४ ॥<br>
गुरू ज्ञान जोत कृपे । वेदासह सर्व सोंपे ॥ ५ ॥<br>
वेद धोंडीरामा पुढें । काय गरिब बापुडें ॥ ६ ॥

आतां वेदाच्या प्राचिनते विषयीं पाहु जातां सर्व ब्राह्मणांचा विश्वास मनु संहितेवर आहे तर म० स० अ० १ श्लो० ६३–७५ पर्यंत ब्राह्मणांचें ग्रंथी कृत-युग १० हजार वर्षांमागें भाद्रपद व० १ स संहिता-ग्रंथ ब्रह्माचें आज्ञेनें लिहिण्याचा समाप्त झाला. आतां त्याच संहितेत नहुषराजा, पृथुराजा, विश्वामित्र, अजि-र्गत, वसिष्ट व भारद्वाज वगैरे ऋष्यांचे वर्णन केलेलें आहे. तेव्हां या ऋष्यांचा काल पाहू गेले तर, हें रामा-च्याही वेळेस होते.

वेदांचा कर्ता मूळ पुरुष ब्रह्मदेव ह्मणावा तर. ब्रह्मदेवापासून तो दाशारथी रामापर्यंत ५९ पीढ्या झाल्या, आणि रामचंद्रापासून सुमित्रापर्यंत ५६ पीढ्या मिळून एकंदर पीढ्या ११५ झाल्या. याचा आपणाच विचार करा कीं, मनुष्य जन्मल्या पासून मनुष्यास २५ वर्षांनें मूल होतें. या मानानें ब्रह्मापासून तों सुमि-त्रापर्यंत २८७५ वर्षें काळ गेला, तो सुमित्र विक्रमाचे वेळेंस होताच, तेव्हां विक्रमापासून आजपर्यंत विक्रम शक १९५६ चालू आहे. यावरून 'ब्रह्मदेवांस आज-पर्यंत ४८२८ वर्षें झालींत. यांत कांहीं संषय नाहीं.

दुसरें असें कीं ब्रह्मापासून कृष्णापर्यंत ६६ पिढ्या झाल्या. कारण रामचंद्र हा कृष्णाच्या ७ पिढ्यां आ-धीं होतां, असें असून हा ब्रह्मवृंद समाज युगाच्या मि-शानें ह्मणा, किंवा कसेंही ह्मणा, वेदअनादि व पाच पन्नास कोट्या वर्षें दर्शवितात. आणि वेदांतील ऋषी

राम कृष्णावतारि ही आणून उभा करितात. तर याचा विचार श्रोत्यानिच करावा.

यावर कदाचित् वाचाळ भ्रमिष्ट ब्रह्मवृंद समाज ह्मणेल कीं, आर्य लोक ४८ वर्षें पर्यंत ब्रह्म चर्य व्रतात राहून पुढें स्त्रीशीं संसार करित होते तेहीं जर सत्य मानावें, तर पुढें त्याहीं मानानें ५० वे वर्षी संतान धरल्यास ११५ पिढ्यांचे ५७५० वर्षें होतात. आणि पुढील विक्रम संवत १९५३ वर्षें त्यांत घातली तर ७७०३ वर्षें सन १८९६ इ० पर्यंत झाली. मग या भ्रमिष्ट विचार शून्य ब्रह्मवृंद समाजाचे खर्व, अब्ज, कोट वर्षें कोणीकडेस गेली. याजविषयीं माझी समजूत कोणी ब्रह्मवृंदा पैकीं काढण्यास एखादा पुढें सरसावेल काय ?

**सांवत**—म. संहतेत सांगितले आहे कीं पुरुशांनीं ३६ वर्षें वेदाध्ययनांत, १८ वर्षें प्रपंचांत घालऊन तिसरा अंमल ९ वर्षें करावा. असे असून रामाचे स्वयंवर तर विश्वामित्रानीं जनक घरीं १४ वर्षाचे वयांतच करविले. तसेंच कृष्णाचेही स्वयंवर १२ वर्षाचे वयांतच झाले.

**पं० धों०**—अहो सांवत हे क्षत्रियाची मुलें, यांनीं मुळींच ह्याच्या विरुद्ध वागण्याचे कित्येक ठिकाणीं प्रयत्न केले.

**सांवत**—महाभारथ, रामायण, पुराणे वगैरे अनेक ग्रंथांनीं ऋष्यांच्या आयुष्यांची संख्या लक्ष लक्ष वर्षें वर्णिली आहे. हें काय खोटें असेल.

पं० धों०—म० स० कृतांत ४००, त्रैतांत ३००, द्वापारांत २००, कलीत १००, वर्षें मनुष्य जगतो. आणि तोच मनुष्य दुसरे ठिकाणीं त्याच ग्रंथांत ह्मणतो कीं, मनुष्यांचे आयुष्य १०० वर्षांचेच आहे, व तिन्ही युगांत मनुष्य १०० वर्षांवर जगत नाहीं.

अहो महाराज ऋग्वेदाचा प्रथम मंत्र विश्वामित्राचा मुलगा " मधुछंद " यानें रचला व शेवटचा मंत्र " अघमर्षण " यानें रचला यावरून वेदाचे आधीं ऋषी होते व ते आमच्या कुळींतील तर आह्मी वेदाचे आधीं का नसावे ? वेदाचा पहिला मंत्र रचणारा जो मधुछंद हा रामचंद्राचे वेळस होतात यावरून ऋग्वेद ३०७३ वर्षें इ० स० १८८६ सालपर्यंत झाली.

पहा ऋग्वेदांत पाराशराचे मंत्र आहेत यावरून ऋग्वेद अखेरीस २४२७ वर्षें इ० स० १८९६ पर्यंत झाली. हा सर्व ऋग्वेद रचण्यास ६४९ वर्षें लागली.

सावत—परंतु ब्राह्मण ह्मणतात कीं हीं मंत्रें ऋष्यांनीं ऐकली व व्यासांनीं एकच केली.

पं० धों०—असे आहे? तर त्यांचेच यजुर्वेद तैतरेय ब्रा० मंत्र २२ सात लिहितो कीं, ज्या ऋष्यांनी वेदाची मंत्रे रचली त्यांस धन्य असो.

सावत—मग ह्या सर्व लबाड्याच जाणाव्या. वेदाची ही बोंबाबोंब. तर सर्वांची अशीच असेल. व्यर्थ काथ्या कुटून तो काय उपयोग.

भाग पहिला समाप्त.

# प्रस्तावना.

फार प्राचिन काळापासून आजपर्यंत सर्व धर्मांत यज्ञ होताहेत. मात्र हिंदु धर्मांपैकीं बौध्य जैन लिंग या तीन वर्गांतच होत नाहींत. त्या यज्ञास ब्राह्मण लोक यज्ञ ख्रीश्चन लोक "सींग" पारसी लोक अर्पण मुसलमान लोक कंदोरी व ब्राह्मणेतर हिंदु लोक जत्रा ह्मणतात. या प्रकरणांत अधीक प्राण्यांचा वध कोणत्या धर्मांत होतो. या विषयीं विचार केला असतां, आमचे भूदेव ब्राह्मण लोक यांचेच यज्ञांत अनेक तऱ्हेचे पशू पक्षादि जीवजंतु वधले जातात. पशुपक्षीच काय ? परंतु यांचे पुरूष मेध नामे यज्ञांत पूर्वीं पुरूष देखील वधीत होते. व मनुष्यांनीं कित्येक वेळां बळी अर्पण केलेली उदाहरणें यांच्या धर्म ग्रंथांत पुष्कळ सांपडतात. तर असा जो हिंसक वेदीक धर्म त्याचे स्वरूप आमच्या अज्ञानावस्थेंतील बांधवांच्या पुढें ठेऊन त्यांना याचा व सोहळे करणाऱ्या ब्राह्मणाची ओळख करून द्यावी या हेतुने आमचा सत्यशोधक समाजियन बंधु रा० रा० **पंडितराव धोंडीराम नामदेव** जेष्ट शृंगेरि कुडलगिचे स्वामी जगद्गुरू **श्री शंकराचार्य** यांचे संस्थानचे **सरसुभे** यांनीं रचलेला **वेदाचार** (वेदांतील आचार) नामे ग्रंथ हा मी मोठ्या उत्सुकतेनें जगापुढें सादर करितों.

**एक सत्यशोधक समाजियन,**

**लक्ष्मणराव गोपाळराव सांवत देसाई.**

बांबे ४थी रायफल जमादार आणि आगवें विलें गांवचे इनामदार.

## अभंग.

पाहिले हे वेद, आणि वेद धर्म ॥
कळूं आलें वर्म, शोधितानां ॥ १ ॥
शोधितानां सर्व, हा ब्रह्म घोटाळा ॥
आला हो कंटाळा, याज्ञिकांचा॥ २ ॥
याज्ञिक ते सर्व, भ्रष्ट व खादाडे ॥
फोडिताती हाडें, घाणेरडें ॥ ३ ॥
घाणेरडें लोक, वेद धर्मी सारें ॥
कसाव तें पुरे, ऋषी वाळें ॥ ४ ॥
ऋषी वाळा मूळ, धर्म वेद चार ॥
त्यांतील अचार, विलक्षण ॥ ५ ॥
विलक्षण अति, गुरें ढोरें खाती ॥
सोंवळें दाविती, अज्ञाण्यांनां ॥ ६ ॥
अज्ञाण्यां कळेनां, गाया बैल घोडें ॥
ह्मशीचीं पारडें, खाणारे हें ॥ ७ ॥
खाणारें हरण, टोणगे डुकरां ॥
विचार हो करा, श्रोतेजन ॥ ८ ॥
श्रोतेजन तुह्मी, ओळखा हो पूर्ण ॥
भूदेव ब्राह्मण, हें तुमचे ॥ ९ ॥
तुमचे तुह्मीच, ओळखा भ्रष्टांनां ॥
तुह्मां यजमानां वाटविलें ॥ १० ॥
वाटविलें जग, धोंडीराम ह्मणें ॥
पाहुनियां घेणें, वेद श्रुत्यां ॥ ११ ॥

# सद्धर्मानुष्ठान.

---ooo---

धर्मसंबंधीं विषयांचें लहानसें पुस्तक.

---

## नानाभाई रघुनाथ

यांणीं

प्रसिद्ध केलें.

---

" धर्मंचर । धर्मान्नप्रमादितव्यम् ।
धर्मात्परंनास्ति । धर्मःसर्वेषांभूतानांमधु " ॥
धर्माचरणकर । धर्माविषयींप्रमादकरूंनको ।
धर्माहूनकांहींश्रेष्ठनाहीं।धर्मप्राणिमात्रासहितकारीहोय।

---

मुंबईमध्यें

" न्याशनल " छापखान्यांत छापलें.

सन १८७२. इ०

( सर्व प्रकारचे हक्क मालकानें आपल्याकडेस ठेविले आहेत. )

---

किंमत ३ आणे.

# सद्धर्मानुष्ठान.

धर्मसंबंधीं विषयांचें लहानसें पुस्तक,

नानाभाई रघुनाथ

यांणीं

प्रसिद्ध केलें.

" धर्मंचर । धर्मान्नप्रमादितव्यम् ।
धर्मात्परंनास्ति । धर्मःसर्वेषांभूतानांमधु " ॥
धर्माचरणकर । धर्माविषयींप्रमादकरूंनको ।
धर्माहूनकांहींश्रेष्ठनाहीं । धर्मप्राणिमात्रासहितकारीहोय।

मुंबईमध्यें

" न्याशनल " छापखान्यांत छापलें.

सन १८७२. इ०

( सर्व प्रकारचे हक्क मालकाने आपल्याकडेस ठेविले आहेत. )

किंमत ३ आणे.

# प्रस्तावना.

———०००———

कांहीं दिवसां मागें "हिंदु रिफार्मर" या पत्रांत सद्धर्मानुष्ठान या सदराखालीं धर्मसंबंधीं विषयांवर लहान लहान निबंध येत असत. ते एकत्र करून छापवावे अशी पुष्कळ गृहस्थांनीं आपली इच्छा दर्शविल्यावरून, हें लहानसें पुस्तक तयार करून आह्मी मोठ्या संतोषानें त्यांस सादर करितों. यांत जे विषय आले आहेत त्यांचा पूर्ण विचार या निबंधांत केला नाहीं, हें सांगावयासच नको. धर्म संबंधीं मुख्य मुख्य विषयांचें मनन नित्यशः केल्यावांचून धर्मबुद्धि अंतःकरणांत जागृत राहणें कठीण, हें मनांत आणून अशा प्रकारच्या कांहीं विषयांचा मननार्थ अति संक्षिप्त रूपानें यांत संग्रह केला आहे. आरंभीं प्रातःस्मरणार्थ एक श्लोक व प्रातःकालीं करण्या करितां लहानशी प्रार्थना दिली आहे. तशीच पुस्तकाच्या शेवटीं सायंकालीं करण्याची प्रार्थना व पठण करण्यास एक स्तोत्र अशीं दिलीं आहेत. धार्मिक जनांस धर्मोन्नति विषयीं यापासून यत्किंचित् उपयोग झाला असतां या पुस्तकाचा हेतु सफल होईल.

श्री

# प्रातःस्मरण.

—— oo ——

## श्लोक.

लोकेश चैतन्यमयाधिदेव ॥
मांगल्यविष्णो भवदाज्ञयैव ॥
हिताय लोकस्य तवप्रियार्थम् ॥
संसारयात्रामनुवर्तयिष्ये ॥ १ ॥

हे लोकाधिपति चित्स्वरूप परमेश्वरा! हे मंगलमय विभो! तुझ्या आज्ञेनुसार लोकहितार्थ व तव प्रीत्यर्थ प्रपंच कृत्यांस मी प्रवृत्त होतो.

---

## प्रातःकालीं करावयाची प्रार्थना.

हे दयामय परमेश्वरा! हे मायबापा, रात्रिकालीं मी निद्राकुल असतां अत्यंत वात्सल्येंकरून माझें तूं रक्षण केलेंस, आणि आपल्या दयेच्या सुखावह छायेखालीं माझ्या विगलित झालेल्या शरीरास व क्षुब्ध झालेल्या मनास चिर विश्रांती देऊन, हा नूतन दिवस दाखविलास. या वेळीं निखिल जग विश्रांतिसुखातें अनुभवून, पुनरपि जागृत होऊन, प्रसन्न वदन होत्सातें चित्तास अत्यंत आल्हाद देत आहे. माझे सर्व अवयवांत अपूर्व बलाची स्फूर्ति होत आहे, व मन निष्कलंक शांतियुक्त झालें आहे. सूर्य प्रकाश हळुहळू सर्व सृष्टि व्यापून, सकल पदार्थ अभिनव शोभेनें युक्तकरून, तुझे मंगल गुण प्रकट

करीत आहे. या समयीं अखिल चराचर विश्व पाहून अचिंत्य शक्ति, अपार कारुण्य, अनुपम चातुर्य, पवित्रता माझ्या मनास विनीत भावेंकरून तुजप्रत समर्पण करण्यास प्रवृत्त करीत आहे; यास्तव आदरें करून तुझ्या भजनीं प्रवृत्त होतों. हे भक्तवत्सला! तूं कृपाळु होऊन माझ्या जीवनाचें सार्थक व्हावें हा नूतन दिवस मला दिला आहेस परंतु आज मजवर कोणते प्रसंग येतील, मी कोणत्या संकटांत किंवा मोह पाशांत आपल्या मंदबुद्धिमुळें पडेन, याची मला कल्पना ही करितां येत नाहीं. यास्तव हे प्रभो! माझा हा दिवस तुझ्या दयेच्या छायेखालींच जावो; तुझ्या इच्छेनुरूप मला कोणतीही स्थिति प्राप्त झाली तथापि तुझ्या मंगलमय स्वरूपाचें क्षणमात्र विस्मरण होऊं देऊं नको. माझे अंतःकरणांत कर्तव्यबुद्धि व पवित्रभाव जागृत राहून मजकडून सर्व व्यवहार, सद्धर्म आणि सुनीति यांस अनुसरून घडोत ही माझी तुजपाशीं अनन्य भावेंकरून प्रार्थना आहे. तुजवांचून मला अन्य त्राता कोण आहे!

# सद्धर्मानुष्ठान.

## उपासना.

१ प्रत्यहीं निदान दोन वेळ तरी ईश्वराची उपासना करावी.

२ ज्या स्थानीं मनांत अपवित्र भाव उत्पन्न होईल, किंवा एकाग्रतेचा व्याघात होईल, त्या स्थानीं उपासना करणें उचित नाहीं.

३ ज्या प्रमाणें प्रत्येकानें एकांतीं नियमित प्रकारानें ईश्वरोपासना केली पाहिजे, त्याचप्रमाणें कुटुंबांतील सर्व मनुष्यांनीं स्नेहभावानें एकत्र मिळून ईश्वरोपासना केली पाहिजे.

४ शांत, समाहित, आणि एकाग्रचित्त होऊन, सर्वसाक्षी, सर्वांतर्यामी परमात्मा साक्षात् ध्यानीं आणून, त्याच्या उपासनेस प्रवृत्त व्हावें.

५ उपासनेचीं तीन अंगें आहेत;—प्रार्थना, कृतज्ञता, व आराधना. पापापासून मुक्तता होऊन आपल्यास ईश्वरप्राप्ति व्हावी एतदर्थ प्रार्थना; आपल्यावर ईश्वराची जी अनुपम व अपार कृपा आहे, तिजविषयीं कृतज्ञता; आणि हृदयाचे ठायीं त्या निष्कलंक, सत्यस्वरूपी परम पुरुषाचें दर्शन घेऊन भक्तिपूर्वक त्याप्रत आत्मसमर्पण करणें, ही त्याची आराधना.

६ निरंतर नेमानें उपासना केली असतां तींतील

ह्मणण्याचे पाठ मुखोद्गत होण्याचा संभव आहे. कोणतेही नियमित शब्द वारंवार उच्चारिले असतां ते तोंडपाठ होऊन जातात. परंतु मुखोद्गत झालेले पाठ ह्मणते समयीं त्यांतील भाव मनांत उत्पन्न होत नाहीं, ह्मणून ते अशा रितीनें केवळ मुखोद्गत न होण्याविषयीं यत्न करणें हेंच उत्तम.

७ कधीं कधीं उपासना करते वेळीं ईश्वरस्वरूप आपल्या अंत:करणांत आविर्भूत होत नाहीं, आणि तेणे-करून आत्मा निराश्रय व निरानंद होत्साता निवृत्त होतो. यद्यपि विषयचिंतनापासून निवृत्त होऊन भगवत्-स्वरूपीं लय लावण्याविषयीं शक्त्यनुसार यत्न केला, तथा-पि चित्ताची एकाग्रता होत नाहीं, किंवा ईश्वरप्रेममुख-दर्शनजन्यआनंद आपल्यास प्राप्त होत नाहीं. अशी मनाची स्थिति होते याचें कारण काय? याला काय शरीराची, किंवा मनाची, किंवा आत्म्याची अस्वस्थता ह्मणावी? वास्तविक पाहिलें असतां शरीरसंबंधी रोग, मानसिक शोक, आणि आत्मसंबंधी पापविकार, हींच याचीं कारणें होत. रोग आणि विपत्ति हीं आपल्या आधीन नाहींत. तेव्हां पापासक्ति निराकृत करून एकाग्र-चित्त ईश्वराचे मार्गीं आत्मा लावण्याविषयीं सर्व प्रकारें यत्न करावा. तेणेंकरून आपण उपासनेच्या फललाभास अवश्य अधिकारी होऊन कृतार्थ होऊं.

८ ज्या पापापासून मुक्त व्हावें ह्मणून आपण ईश्वरापाशीं प्रार्थना करितों, त्याचा परिहार करण्याची आपली इच्छा व प्रतिज्ञा जर दृढ असेल, तर आपली प्रार्थना सफळ झाल्यावांचून राहणार नाहीं.

## आत्मपरीक्षा.

१ वेळोवेळीं आत्मपरीक्षा करणें उचित होय. आपली मति विशेष पवित्र किंवा अपवित्र होत आहे, आपण पुण्याचा किंवा पापाचा संचय करित आहों, हें वारंवार पाहिलें पाहिजे. या प्रपंचकोलाहलामध्यें अंतर्दृष्टि जागृत राखणें अत्यंत अवश्य आहे.

२ आत्मपरीक्षा करितेसमयीं या सर्व विषयांचें आलोचन करावें. आपण काळ कसा घालवितों; दानादि धर्म कार्यास किती समर्थ आहों; जें जें पापाचरण करितों तें समजून करितों किंवा कसें; त्याविषयीं आपल्यास अकृत्रिम अनुताप होतो कीं नाहीं; आपण जें सत्कर्म करितों त्यापेक्षां अधिक करण्याची आपली शक्ति आहे कीं नाहीं; आपल्या शक्तीप्रमाणें धर्माचरण करण्याविषयीं आपण यत्न करितों कीं नाहीं.

३ कोणतेंही पाप क्षुद्र मानून त्याची उपेक्षा करूंनये. आपल्या आत्म्याचे ठायीं एक छिद्र जरी सांपडलें, तरी अपवित्रभाव त्या द्वारें शिरून तेथें आश्रय करील. कोणतेंही पाप लघु मानिलें ह्मणून तें लघुच राहात नाहीं; अतएव सर्वदां द्वाररक्षकाप्रमाणें सावध राहिलें पाहिजे.

### श्लोक.

॥ इन्द्रियाणां तु सर्वेषां यद्येकं क्षरतीन्द्रियं ॥
॥ तेनास्य क्षरति प्रज्ञा दृतेःपात्रा दिवोदकम् ॥१॥

**अर्थ**—सकल इन्द्रियांमध्यें जर एक इंद्रियाचें स्खलन झालें, तर तेवढ्यानेंच मनुष्याची बुद्धि भ्रष्ट होते; जसें चर्ममय पात्रास एकच छिद्र असलें तरी त्या वाटेनें सर्व उदक गळून जातें.

४ आपले गुण अल्प आहेत आणि आपले दोष बहुत आहेत असें मनांत वारंवार आणिलें पाहिजे. धर्माचरणाविषयीं आपली यत्किंचित् प्रवृत्ति झाली ह्मणून त्याविषयीं दंभ किंवा अभिमान होऊं देऊं नये. आपल्यास जी स्थिति उचित आहे तिशीं आपल्या वास्तविक स्थितीची तुलना करून पाहिली असतां, आपली योग्यता अत्यंत अल्प आहे असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. जर अधम लोकांशीं आपली तुलना केली तर मन सहजच आत्मगौरवानें युक्त होईल. परंतु साधुसज्जन धर्ममार्गांत आपल्यापेक्षां अनंत पट श्रेष्ठ असतात, हें लक्षांत आणिलें असतां आपण आपली स्थिति पाहून लज्जित होतों.

५ आपली यथोचित अवस्था कळण्याकरितां ईश्वराकडे दृष्टि द्यावी; त्याच्या समीप वास करण्यास आपण कितपत योग्य झालों आहों याचा विचार करावा; त्याच्या गुणांशीं आपल्या गुणांची तुलना करावी; ह्मणजे आपली पवित्रता जसजशी वाढेल तसतसे नम्रता आणि विनय हेही गुण अवश्य वाढतील. अत्युच्च पर्वततलीं एकादा प्रचंड हत्ती जसा क्षुद्र मेषाप्रमाणें वाटतो, त्याप्रमाणें ईश्वरासमीप आपण आपल्यास भासतों.

६ पापानुशोचन करितेसमयीं ईश्वराच्या करुणेचें स्मरण करावें. मनांत आणावें, कीं यद्यपि आपण त्याची आज्ञा उल्लंघन करितों, यद्यपि त्याच्या स्नेहमय उपदेशाची वारंवार हेलना करितों, तथापि तो आपल्यावर अतिशय करुणा करितो; आपली क्षुधा तृषा शांत करितो, आपल्यास परिधेय वस्त्रदान करितो, आणि मातेपेक्षांही अधिक स्नेहानें आपलें लालन पालन करून नाना प्रकारचीं सुख:

साधनें योजून आपल्यास सुखी करितो. याप्रकारें सरळ अंतःकरणानें विचार केला असतां आपली बुद्धि लवकर विशुद्ध होईल यांत संदेह नाहीं.

आनंद.

१ वृथाविषयसुखापासून विरत होण्याविषयीं प्रयत्न करावा.

२ असत्संगीं, असद्ग्रंथपठणीं, द्यूतादि क्रीडांचेठायीं, तसेंच व्यर्थ परिहास व परनिंदा यांमध्यें आनंद मानूं नये.

३ आपलें संपूर्ण कर्म ईश्वरास समर्पण करावें, तेणेंकरून आपलें कोणतेंही कर्तव्य विच्छिन्न होणार नाहीं.

४ अतएव क्रमेंकरून केवळ धर्ममार्गांतच आनंद मानण्याविषयीं प्रयत्न करावा. जेणेंकरून केवळ ईश्वराचेच ठायीं आपल्यास आनंद होईल, आणि त्याचें श्रवण, मनन, निदिध्यासन व त्याच्या आज्ञेप्रमाणें वर्तन करण्यास आपल्यास आनंद वाटेल, असा यत्न करणें अवश्य आहे. आनंद आणि पवित्रता, कर्तव्य आणि इच्छा जेव्हां संमिलित होतील, तेव्हांच आत्मा सर्वोत्कृष्ट भाव धारण करील.

श्लोक.

॥ आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावानेष ब्रह्मविदां वरिष्ठः ॥

अर्थ—जो परमात्म्याचे ठायीं क्रीडा करितो, जो परमात्म्याचे ठायीं आनंद अनुभवून सत्कर्मशील होतो, तोच ब्रह्मवेत्यांमध्यें श्रेष्ठ.

५ जे विषयसुखाविषयीं विशेष आसक्त त्यांचे ठायीं गांभीर्य अल्प, सत्य त्यांचेठायीं चंचल, आणि दुष्कर जे धर्मविचार व धर्माचरण तें त्यांजकडून होणें अशक्य.

६ प्रपंच अनित्य आहे हें ध्यानांत आणिलें ह्मणजे वृथाविषयसुखापासून मन सहजच निवृत्त होतें. आनंदाचा समय अति अल्प, कोणच्या वेळेस मृत्यु येईल याचा नियम नाहीं; हें सतत लक्ष्यांत वागविलें पाहिजे.

## अर्थव्यय.

१ ईश्वराच्या प्रियकार्यसाधनोद्देशानें अर्थोपार्जन करावें आणि त्याच्या आदेशानुसार त्याचा व्यय करावा.

२ स्वेच्छाचारी होऊन अर्थव्यय करूं नये; कारण एतद्विषयीं आपण ईश्वराचे ऋणी आहों; तो ज्याला जितकी संपत्ति देतो त्यापासून त्याच्या सामर्थ्याप्रमाणें धर्मवृद्धीविषयीं यत्न इच्छितो.

३ प्रपंचास पुरून जें धन उरेल त्याचा कांहीं नियमित अंश धर्मकार्यी खर्च करावा.

## समय.

१ समय अमूल्य धन हें सर्वांस माहित आहे. समयावर धर्माधर्म अवलंबून राहतात. अर्थव्ययाविषयीं ज्याप्रमाणें विवेक व यत्न केला पाहिजे, त्याप्रमाणेंच कालक्षेपणाविषयींही केला पाहिजे.

२ समय आणि जीवन यांमध्यें कांहींच भेद नाहीं असें ह्मणतां येईल; कारण समयानेंच आपलें जीवन होतें. जितका समय उत्तम प्रकारानें क्षेपण केला जातो तितकेंच आपलें जीवन. आणि जितका वेळ आळसांत किंवा कुत्सित कर्मांत जातो तितका मृत्युप्राय होय. जो आपल्या शतसंवत्सर आयुर्दायापैकीं केवळ पांचच वर्षें सत्कर्मांत घालवितो त्याचें आयुष्य पांचच वर्षें होय; अतएव समय वृथा घालवणें हें एक प्रकारें आपला प्राणघात करणें होय.

३ आलस्य सर्व पापाचें मूळ; यास्तव फार प्रयत्नेंकरून त्याचा परित्याग करावा.

४ आपलें जीवन क्षणभंगुर;—

**श्लोक.**

॥ कोहि जानाति कस्याद्य मृत्युकालो भविष्यति ॥

अर्थ;— कोण जाणे, आज कोणाचा मरण काळ उपस्थित होईल. अतएव इहलोकीं जितका वेळ साधेल तितका सत्कर्मांत व सद्विचारांत क्षेपण करण्याविषयीं कदापि अनमान करूं नये. परिणामीं मरणोन्मुख झाल्यानंतर पश्चात्ताप होऊन काय उपयोग ?

५ जो सर्वदा इहलोक सोडून परलोकीं जाण्यास सिद्ध असतो तोच उत्तम प्रकारें आपला कालक्षेप करितो असें समजावें.

६ मला कांहीं कर्तव्य राहिलें नाहीं, मी काय करावें असें कधींही मनांत आणूंनये कारण, ईश्वराकडे ज्याचें लय लागलें आहे, त्याचें कर्तव्य आकाशाप्रमाणें अनंत आहे.

७ सर्वदां कर्तव्यज्ञान जागृत राखावें, आणि वेळोवेळीं मृत्यूचें स्मरण करीत जावें.

**सत्य वाक्य.**

१ सत्यभाषण करावें; कोणत्याही विषयाचें वर्णन करितेसमयीं दुसऱ्याच्या मनांत तो विषय यथार्थ रीतीनें पेईल अशा प्रकारें वर्णन करावें.

२ सहसा कधींही प्रतिज्ञा करूं नये; कोणत्याही महत्कार्याविषयीं मी तें करीन असें ह्मणूंनये, तें करण्याविषयीं मी यत्न करीन असें ह्मणावें. कोणताही विषय मला

चांगला समजतो असें ह्मणूं नये, मला याप्रमाणें बोध होतो असें ह्मणावें. कोण जाणे, आपण जें करण्याविषयीं प्रतिज्ञा केली तें आपल्याकडून होईल कीं नाहीं; एकाद्या गोष्टी-विषयीं आपली दृढमति झाली ती ठीक झाली कीं नाहीं.

३ सुमनुष्यानें कायवाचामनेंकरून अशाप्रकारें व्यवहार करावा कीं, सर्वांचा त्याच्या बोलण्यावर भरवसा पटेल. तो एकवार जें बोलला, तें सत्य, किंवा मिथ्या असा संशय लोकांस उत्पन्न झाला तर तो त्याचा अपमानच होय.

---

## आधार.

१ इतरांवर आपण सर्व प्रकारें अवलंबून राहूं नये. ईश्वरावर आपण भार घालावा; इतरांच्या साह्यानें आणि धर्मबलानें आपण बळकट व्हावें.

२ दुसऱ्याच्या बळावर आपली प्रतिष्ठा स्थापन करणें हें वाळूवर गृह निर्माण करणें, किंवा वीर्यहीन आणि विशीर्ण शरीर लोहकवचानें आवृत करणें यासमान आहे. यास्तव ज्या प्रकारें आपला आत्मा निज सामर्थ्यानें ईश्वरीं स्थिर होऊं शकेल, त्या प्रकारचा यत्न करावा.

३ आपण जें कांहीं ज्ञान संपादन करितों तें चिंतना-चे योगानें स्वायत्त करीत जावें. मनास केवळ उपदेशाचें ग्राहक करूं नये. जो उपदेश ऐकिला, तो ध्यानेंकरून मनाचे ठायीं दृढ होईल एतद्विषयीं यत्न करावा. तेणेंक-रून उपार्जित ज्ञान वेंचलेल्या पुष्पांप्रमाणेंच लौकर क्षीण होणार नाहीं. ज्याकाळीं ध्यानमननादि साधनानीं ज्ञान आत्म्याचे ठायीं बद्धमूल होईल, त्याकाळीं तें नीरस होण्यास पात्र होणार नाहीं. त्यापासून अनंत काळपर्यंत नवनव्या ज्ञानकलिका निघून प्रफुल्लित होतील.

## कर्तव्यज्ञान.

१. मनाच्या सर्व वासना अंधशक्तीप्रमाणें कार्याविषयीं प्रवृत्त होतात; यास्तव त्या अयोग्य विषयाकडे न जातां कर्तव्यज्ञान आणि धर्मबुद्धि आपल्याठायीं स्थिर होतील एतद्विषयीं यत्न करावा.

२. प्रवृत्तीच्या स्वाधीन झाल्यानें केवळ जड पदार्थांप्रमाणें बाह्याकर्षणानें व्यवहारांत आपण उद्युक्त होतों. आपल्या आंगीं कांहीं स्वतंत्रता राहत नाहीं; परंतु धर्मशासनानुरूप कर्तव्य आचरण केलें असतां सकलवृत्ति ईश्वर मार्गीं नियुक्त होतात.

३. कर्तव्यज्ञानास आपल्या हृदयाचें आधिपत्य दिल्यानें कर्तृत्वभाव प्रस्फुटित होतो.

४. कर्तव्यज्ञानाच्या आदेशाचा अतिक्रम केला असतां त्या योगानें कर्तृत्वशक्तीचा ऱ्हास होऊन, आत्मा इंद्रियनिग्रहाविषयीं असमर्थ होतो. परंतु त्या आदेशास अनुसरून वर्तलें असतां आत्मा तेजस्वी आणि पराक्रमशाली होऊन सकल कुप्रवृत्तींचा पराजय करितो.

५. अतएव हा आदेश पालन करण्याविषयीं सर्वदा यत्न करित असावें. जें कांहीं कर्म उचित ह्मणून आपल्यास बोध होईल, तें करण्याविषयीं तत्क्षणींच प्रवृत्त व्हावें. संपूर्ण मोहपाशांपासून दूर राहून वैराग्य स्वीकारावें एतद्विषयीं श्रम झाला असतां तो श्रम असें समजूं नये. जरी एकवार यत्न विफल झाला, जरी एकवार पराभव झाला तरी पुनः उठून नवीन उद्योग करण्याविषयीं पुढें सरसावावें. आलस्य व उपेक्षा यांपासून सर्वदा दूर राहवें.

## विषयानंद.

१ यौवनकाळीं विषयानंदाविषयीं फार तत्परता असते. तेणेंकरून जी जी नवीन वस्तु दृष्टीस पडते, तिजविषयीं आपले ठायीं अनुराग उत्पन्न होतो. यास्तव विचार करावा, कीं आपल्यास जेणेंकरून धर्माचरणामध्यें आनंद वाटेल असा उपाय योजिला पाहिजे. मिथ्या विषयसुखानें धर्मास विमुख होतां कामास नये.

२ धर्मबुद्धि कधीं कधीं बाह्य विषयांवर अवलंबून असते; आणि ती विषय उपस्थित झाले असतां उदित होते, व अदृश्य झाले असतां नष्ट होते., स्थानविशेषीं, कालविशेषीं, व संगविशेषीं प्रीति, पवित्रता, आनंद आणि उत्साह उदित होतात; परंतु हे सकळ भाव स्थिर नसतात. अतएव एकवेळ ते भाव आपले ठायीं उत्पन्न झाले, ह्मणून तेवढ्यानेंच निश्चित होतां कामास नये. धर्मबुद्धि क्रमेंकरून मनाची स्वाभाविक अवस्था होईल एतद्विषयीं यत्न करावा.

३ धर्मबुद्धि पर्वताप्रमाणें अचल झाली पाहिजे. धर्माचे योगानें यौवनकालींच आत्मा वशीभूत केला पाहिजे.

## संसार.

१ प्रपंच आणि परमार्थ हे आपल्या जीवनाचे मुख्य उद्देश होत. धर्मास अनुसरून प्रपंचांतून पार पडून ईश्वर-प्राप्ति करणें हाच आपल्या जीवनाचा उद्देश.

२ आपण संसारापासून कोणत्या रीतीनें मुक्त व्हावें ? निर्जन अरण्यांत जाऊन केवळ ध्यानपरायण होऊन राहावें काय? नाहीं नाहीं, सद्धर्माचा आदेश असा नाहीं. "धर्मान्नप्रमादितव्यं, कुशलान्नप्रमादितव्यं" असें

श्रुतिवचन आहे. याचें तात्पर्य हेंच कीं धर्माविषयीं व ऐहिक सुखाविषयींही आपण तत्पर असावें. सारांश धर्मास अनुसरून संसारयात्रा करावी. संसारांत राहवें, परंतु तद्विषयीं आसक्त होऊन मोहानें बद्ध होऊंनये. संसार सागरामध्यें धर्मनौकेवर आरोहण करून ईश्वराची कृपा संपादून प्रवास करावा. त्यामध्येंच निमग्न होऊंनये. आपण अमृतधामाचे यात्रेकरू आहों हें ध्यानांत ठेवून संसारांत वर्तावें. चिरकाल विहारी लोकांप्रमाणें विषयसुखाकडे लक्ष्य लावून तेणेंकरून बद्ध होऊं नये.

३ स्वार्थपरतेपासून मुक्त होणें यालाच संसारापासून मुक्त होणें असें ह्मणतात.

श्लोक

॥ यदा सर्वे प्रभिद्यन्ते हृदयस्येह ग्रंथयः ॥
॥ अथ मर्त्योऽमृतो भवत्येतावदनुशासनम् ॥

ज्या कालीं सर्व ऐहिक पाशांपासून हृदय मुक्त होईल, त्या कालींच जीव अमर होईल, हाच उपदेश जाणावा.

४ यथार्थ वैराग्य झालें नाहीं, मनांत विषयासक्ति प्रबल राहिली, आणि आपण अरण्यांत गेलों, तरी काय होणार आहे. त्यालाच संसारी ह्मणावें, जो ईश्वरास विसरून संसार सुखांत मग्न होऊन राहातो. तोच वैरागी, ज्याची प्रीति केवल ईश्वराचेच ठायीं असते, जो केवळ ईश्वरप्रियकार्यसाधनोद्देशानेंच संसारांत राहातो.

५ जेव्हां आपल्या सर्व वृत्ति व सर्व शक्ति केवळ स्वार्थपर होऊन तत्संपादनींच तत्पर असतात, तेव्हां आपलें जीवन सांसारिक जीवन होय. या सांसारिक जीवनाचा परित्याग करून, धर्माचे योगानें आणि ईश्वर-

रूपेनें पुनर्जीवित होण्याविषयीं यत्न करावा. जे या प्रकारें नूतन जीवन धारण करून ईश्वरभक्तियुक्त होऊन संसार-धर्म पालन करितात, तेच धार्मिक होत. ते ज्या प्रकारें संसारयात्रानुवर्तन करितात त्याप्रमाणें विषयीं जन करीत नाहींत. त्यांची संसाराविषयीं जी मनोवृत्ति असते ती विषयीं जनाची नसते. ज्याप्रमाणें शरीर मृत झालें असतां बाह्यविषयाकडे त्याची प्रवृत्ति होत नाहीं, त्याप्रमाणें सांसारिक जीवनांतून मुक्त झालें असतां, संसारसंबंधी सुख दुःख, संपत्ति विपत्ति, आशा भय, यांहीं करून आत्मा विचलित होत नाहीं.

### श्लोक

॥ अध्यात्मयोगाधिगमेनदेवं ॥

॥ मत्वाधीरो हर्षशोकौ जहाति ॥

तात्पर्य; ज्ञानी पुरुष अध्यात्मयोगानें परमेश्वराचें स्वरूप ओळखून त्याची प्राप्ति करून घेतो, आणि ऐहिक सुखदुःखांपासून मुक्त होतो. ज्ञानी व धार्मिक पुरुष नाना प्रकारचीं कर्में करितो; भिन्न भिन्न अवस्थांमध्यें राहतो; परंतु त्याचें लक्ष्य, आशा, व आनंद, हीं सर्व परमेश्वराचे ठायींच स्थिर राहतात. ईश्वरप्राप्त्यर्थ संसार, अनंतकाल सुख प्राप्त्यर्थ ऐहिक जीवन, आणि जीवनाचें लक्ष्य ईश्वर, हें मनांत वागवून संसारयात्रा करावी.

### प्रीति.

१ ईश्वराचे ठायीं प्रीति स्थापन करावी; आणि सकल मनुष्यांविषयीं भ्रातृसौहार्द वागवावें.

२ ईश्वराचेठायीं प्रीति स्थापन केली असतां, सत्याविषयीं आपली प्रीति होते. त्याचे सत्य, सुंदर, मंगल स्वरूपीं

प्रीति जडली असतां, त्यांची पवित्रता आपल्यापुढें जाज्वल्यमान प्रकाशित होऊन राहते. ईश्वरप्रीति ह्मणजे काय? अपापविद्ध, निष्कलंक, सत्यस्वरूपाविषयीं जी प्रीति तीच होय. कारण आत्मा सच्चिदानंदस्वरूप होय.

३ सत्याविषयीं प्रीति धरिली असतां ज्या स्थानीं, ज्या समयीं, ज्या व्यक्तिविशेषीं, ज्या पुस्तकीं, सत्य दृष्ट होईल, त्यात्याविषयीं प्रीति उत्पन्न होईल. धार्मिक पुरुषांची धर्मानुकूल स्थानीं, उपासनासमयीं, ईश्वरपरायणव्यक्तीचे ठायीं, आणि धर्मप्रतिपादकग्रंथीं प्रीति असते.

४ याप्रमाणें ज्यांची प्रीति नियमित नसते, त्यांची प्रीति अप्रशस्त होय.

५ ईश्वरप्रीतीचें लक्षण काय? प्रथम त्याच्या सहवासाची इच्छा, दुसरें तत्संबंधी सर्व गोष्टींवर प्रीति, तिसरें इतर विषयांचा त्याग हेंच होय.

## बंधुप्रीति.

१ ज्याप्रमाणें ईश्वर आपला पिता जाणून त्याजवर प्रीति करावी, त्याप्रमाणेंच सर्व मनुष्यें त्याचीं लेंकरें आहेत असें जाणून त्यांविषयीं बंधुप्रीति हृदयांत वागवावी. जेव्हां हे दोन्ही भाव अंतःकरणांत संयुक्त होतात, तेव्हां आनंद आणि पवित्रता हीं सहज प्राप्त होतात आणि धर्माचरण सुलभ होतें.

२ बंधुप्रीतीस प्रतिबंधक चार गोष्टी आहेत; स्वार्थपरता, अभिमान, द्वेष, आणि परनिंदा. स्वार्थपरतेनें आपण केवळ आपल्या विषयींच उद्युक्त असतों; केवळ आपल्या स्वतांस सुख झालें ह्मणजे आपण तृप्त होतों; इतरांचे सुखाविषयीं यत्न करीत नाहीं.

यास्तव मनांतील हा कुटिल भाव निर्मूळ करून टाकून ईश्वराच्या मंगळ भावाचें अनुकरण करावें. आपल्या अंगीं कांहीं सद्गुण असला तर त्याविषयीं अभिमान बाळगूं नये. असा विचार करावा, कीं आपल्या अंगीं पुष्कळ दोष आहेत; तसेच पुष्कळ गोष्टींमध्यें इतर लोक आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहेत. विनयाचें अवलंबन करावें; नम्र आणि विनययुक्त झाल्या वांचून ईश्वरप्राप्ति कोणासही व्हावयाची नाहीं. इतर लोकांचे अंगीं कांहीं दुर्गुण आढळले ह्मणून त्यांची हेळणा, अगर द्वेष करूंनये. पापाची हेळणा किंवा द्वेष करावा; पापी लोकांचा करूंनये. मनुष्यें साधु असोत किंवा असाधु असोत; सकलही आपले बांधव होत यास्तव सकलांवर प्रीति करावी. आपल्या बांधवांचे दोषांची त्यांस क्षमा करावी. अपराध करणें हा मनुष्यांचा स्वभाव होय, परंतु क्षमा करणें हा ईश्वरी गुण होय.

## श्लोक.

॥ क्षमा वशीकृति र्लोके क्षमाहि परमं धनम् ॥
॥ क्षमा गुणोह्यशक्तानां शक्तानां भूषणं क्षमा ॥

तात्पर्य; क्षमेचे योगानें सकल वश होतात, क्षमा हें परम धन होय. अशक्ताचे अंगीं क्षमा हा गुण होय. शक्तिमंतांस क्षमा हें भूषण होय. इतरांचे दोष करुणार्द्र बुद्धीनें पाहवे. ते दोष त्यांणीं सोडले ह्मणजे त्यांचा तिरस्कार किंवा द्वेष करण्याचें कारणच राहिलें नाहीं. मनुष्यांवर सर्वदा दयाच करावी. मात्र पापाचा तिरस्कार करावा. परोक्ष परनिंदा करणें अत्यंत अनुचित होय. जे या नीच बुद्धीस अनुसरून चालतात, ते इतरांकडे दयार्द्र दृष्टीने पाहूं शकणार नाहींत, आणि तेणेंकरून सकल

लोकांविषयीं वैरभाव त्यांचे हृदयांत उत्पन्न होईल. ज्या हृदयांत परनिंदा वास करिते त्यांत प्रीति वास करूं शकत नाहीं. स्थलविशेषीं हितासाठीं इतरांचे दोष काढावे त्यापेक्षां त्यांचे गुणच संतोषानें कां स्वीकारूं नये ?

**श्लोक.**

॥ अन्यान् परिवदन् साधुर्यथाहि परितप्यते ॥
॥ तथा परिवदन्नन्यान् तुष्टो भवति दुर्जनः ॥

तात्पर्य; इतरांची निंदा केल्यानें साधु जसा दुःखित होतो, तसा परनिंदेनें दुर्जन संतुष्ट होतो.

३ इतरांस विपत्ति प्राप्त झाली असतां आपल्या सामर्थ्या प्रमाणें त्यांस साह्य करण्याविषयीं यत्न करावा. स्नेह, दया, परोपकार, हे केवळ प्रीतीचे भिन्न भिन्न प्रकार होत.

४ आपण सकलही ईश्वराच्या अमृतधामाचे यात्रेकरू आहों; यास्तव सकलही बंधुप्रीतीनें एकत्र होऊन ज्ञान, धर्म आणि प्रीतिद्वारा परस्परांस साह्य करून त्या अमृतधामाच्या प्राप्तीविषयीं तत्पर व्हावें.

**पवित्रता.**

१ आपला आत्मा पवित्र करणें हा आपले जीवनाचा उद्देश, सकल कार्यांमध्यें लक्षांत ठेवावा, कर्मद्वारा पाप पुण्य आत्म्यापासूनच घडतें; आत्माच सकल कर्माचें मूळ: यास्तव आत्म्याकडे सदैव लक्ष्य असावें.

२ केवळ बाह्यकर्मानुष्ठानांतच तत्पर राहूं नये. आपला आत्मा पवित्र केला असतां धर्मानुष्ठान सहजच घडून येईल. वृक्षाचे मुळीं जल घातलें असता तो सहजच वाढून फल पुष्पांनीं सुशोभित होईल.

३ ज्या क्षणीं कोणतीही अपवित्र कामना मनांत उत्पन्न होईल, त्या क्षणींच ईश्वरास शरण जाऊन त्याची प्रार्थना करावी कीं, त्या पापापासून तो तुमचें रक्षण करो. जर दुर्बलतेचे योगानें तुह्मांकडून पापाचरण घडलें तर अकृत्रिम अनुताप करावा. आणि पुनरपि पापमार्गापासून अतिप्रयत्नेंकरून दूर राहवें.

४ आत्मा पापविकारानें दूषित झाला असतां, कधीं-कधीं, यथार्थ अनुताप होत नाहीं. जसें शरीर निःशक्त झालें असतां त्यास कोणत्याही आघाताचें भान होत नाहीं, त्याप्रमाणेंच आत्मा ज्ञानविरहित असला तर त्यास अनुतापाचा अनुभव होत नाहीं. ज्या मनुष्याचेठायीं कर्तव्य ज्ञान जागृत राहतें, व जो सूक्ष्म बुद्धीनें सकल विषयांच पर्यालोचन करण्यास समर्थ असतो, त्याचे हातून अत्यंत लघु पाप घडलें तरी त्याच्या मनास दुःसह यातना होतात. यास्तव धर्मबुद्धि जागृत राखावी; तेणेंकरून पापाचा केवळ स्पर्श झाला तरी आत्मा अनुतापयुक्त होईल आणि पापाचा प्रतीकार करण्याविषयीं यत्न करण्यास समर्थ होईल.

५ इंद्रियदमन, आत्मशुद्धि, आणि सदसद्विवेक, यांचा अभ्यास करण्याविषयीं तत्पर असावें. पापविषयाशीं मनाचा संयोग झाला असतां, तत्काल पापासक्ति वृद्धिंगत होते; आणि जसजशी पापाची सवय होये, तसतसा धर्म-बलाचा ऱ्हास होतो; आणि पाप बलाढ्य होतें. अतएव अभ्यासानें हळुहळु मनास पाप विषयापासून निवृत्त करावें; कधींही निराश होऊं नये. अभ्यासजनित पाप अभ्यासद्वाराच निराकृत होतें. अनेक दिवसांचें पाप एक निमिषांत कसें जाईल ?

६ कुसंसर्गाचा विषवत् परित्याग करावा. सत्यस्वरूप पावनांचा पावन असा जो परमेश्वर, आणि सत्परायण असे जे साधुसंत, त्यांच्या सहवासानें राहून, दिवसानुदिवस आत्मा शुद्ध आणि पवित्र करावा. तो सर्वसाक्षी परमात्मा सर्वदा आपल्या संनिध राहतो हें ध्यानांत आणावें.

श्लोक.

॥ एकोहमस्मीत्यात्मानं यत्त्वं कल्याणं मन्यसे ॥
॥ नित्यं स्थितस्ते हृदये पुण्यपापेक्षिता मुनिः ॥

तात्पर्य; हे प्राण्या, मी एकटा आहें, असें तूं समजूं नको. कारण सकल पुण्यपापद्रष्टा सर्व प्रभु तुझ्या हृदयामध्यें नित्य वास करितो.

श्लोक.

॥ मोहजालस्य योनिर्हि मूढैरेव समागमः ॥
॥ अहन्यहनि धर्मस्य योनिः साधुसमागमः ॥

तात्पर्य; मूढाच्या समागमानें आपण मोह पाशांत पडतों, परंतु साधुसमागमानें निःसंशय धर्माचीच वृद्धि होते.

७ जर आपल्या ठायीं दया करूं इच्छितां, तर निष्ठुर होऊन आपल्या इंद्रियादिकांचा निग्रह करा. जर आत्म्यातें श्रेष्ठ करूं इच्छितां, तर विनीत आणि नम्र व्हा. जर ज्ञानी होऊं इच्छितां, तर आपल्या अज्ञतेचाच परिचय करा. जर इतरांस धार्मिक करूं इच्छितां, तर प्रथम आपणच धार्मिक व्हा. जर सत्कर्मानुष्ठान करूं इच्छितां, तर अंतर विशुद्ध करा.

जीवनाचें लक्ष्य.

१ आपल्या जीवनाचीं कर्मे नाना प्रकारचीं व अवस्था·

ही नाना प्रकारच्या आहेत. परंतु सर्व अवस्थांमध्यें ईश्वर-प्राप्ति हें एकच आपलें लक्ष्य होय.

२ जो सर्व कार्यांमध्यें केवळ परमेश्वराकडे लक्ष्य लावून सकल जीवन त्याप्रत समर्पण करितो, त्यालाच धार्मिक पुरुष ह्मणावें. संक्षेपानें धार्मिक पुरुषाचें लक्षण हेंच जाणावें.

३ कोणी ह्मणेल कीं, धार्मिक पुरुष नानाप्रकारचीं विषय सुखें सेवन करीत नाहीं काय ? भिन्न भिन्न विषय संबंधी कर्मे करीत नाहीं काय? करतो; परंतु विषयासक्त लोकांप्रमाणें तो केवळ विषयसुखार्थच विषय सुख किंवा विषयकमार्थिच विषयकर्म अनुभवीत नाहीं. होकायंत्राचा कांटा जसा सर्वकाळ उत्तर ध्रुवाकडेच असतो, तद्वत् धार्मिक पुरुषाचें लक्ष्य सदैव ईश्वराकडेच असतें.

४ ग्रहगण ज्याप्रकारें चोहीं बाजूनीं सूर्या सभोंवतीं परिभ्रमण करितात, आणि आपापल्या गगनकक्षेचें कधींच अतिक्रमण करीत नाहींत; तद्वत् धार्मिक पुरुष ईश्वर आपल्या जीवनाचें मुख्य लक्ष्य मानून त्यावर स्थिर दृष्टी ठेवून, विहित कर्मे आचरून, अधिकाधिक पवित्रता संपादन करितो.

५ ज्यासमयीं ईश्वर आपल्या जीवनाचें लक्ष्य होईल; त्याच समयीं कोणत्याही कार्यांमध्यें ईश्वराचा वियोग व्हावयाचा नाहीं. सकल कार्यें एकीभाव धारण करतील, कोणतेंही विच्छिन्न, विच्छृंखल होणार नाहीं. विषयोपभोग, व धनसंग्रह, इत्यादिक कनिष्ठ कार्यें, ईश्वरोपासना व धर्मानुष्ठान. हें जें आपल्या जीवनाचें मुख्य कर्तव्य, त्यास प्रतिबंधक होणार नाहींत.

६ जीवनाचीं कर्मे ... प्रकारचीं; स्वकीय, परकीय, आणि धर्मसंबंधीं. स्वकीय कर्तव्य कर्मे सामान्यत: चार प्रकारचीं; शारीरिक कर्म, विषयोपभोग, विद्याभ्यास, आणि अर्थोपार्जन. परकीय किंवा इतर लोकांसंबंधीं आपलीं कर्तव्य कर्मे दोन प्रकारचीं; व्यक्तिविशेषविषयक, व समुदायविषयक. आणि धर्म संबंधीं कर्तव्यें उपासना आणि धर्मानुष्ठान हींच होत. या सर्व कर्मांमध्यें ईश्वरप्राप्ति हेंच मुख्य लक्ष्य असावें. हीं सकलकर्मे वर्तुल परिधिरूप व ईश्वरप्राप्ति तन्मध्यबिंदुरूप होय.

## लोकेषणा.

१ जनानें आपली स्तुति करावी ही इच्छा, व जन आपली निंदा करील ही भीति असे लोकेषणेचे दोन प्रकार आहेत. कांहीं अंशीं लोकेषणा लोकव्यवहारास आवश्यक, व हितावहही आहे. तिच्या अभावीं पुष्कळ लोक दुष्ट व अनर्थकारक कर्मांविषयीं स्वेच्छ व निर्भय होत्साते प्रवृत्त झाले असते. ज्यांस सर्वसाक्षी सर्वनियंत्या परमेश्वराचें ज्ञान नाहीं, ज्यांच्या ठायीं सदसद्विवेक समर्थ मनोदेवता जागृत नाहीं, त्यांचें यत्किंचित आकलन करण्यास लोकेषणेवांचून अन्य कोण आहे? परंतु ही लोकेषणा आपली मर्यादा उल्लंघून पलीकडे गेली ह्मणजे मोठी अनर्थकारक होण्याचा संभव आहे. लोकेषणेपासून सत्कार्यभीरुता आणि असत्कार्यप्रवृत्ति होण्याचा संभव आहे.

२ कधींकधीं लोकेषणेपासून सत्कार्यभीरुता उत्पन्न होते. आपण जे लोकभीतीनें कर्तव्यकर्मास प्रवृत्त होत नाहीं, त्याचें कारण लोकव्यवहार बलवत्तर हें नव्हे. तर केवळ भीरुता व वैराग्याविषयीं कातरता हेंच होय. सत्य,

ज्ञान, धर्म, यांचे बलापेक्षां ... व्यवहाराचें बल कधींही अधिक होऊं शकेल काय?

३ आपण लोक भीति धरून ईश्वराज्ञेनुरूप व धर्मोपदेशानुरूप कर्तव्यकर्म आचरण करण्यास धैर्य केलें नाहीं तर लोक आपल्यास विशेष पीडा करितात. परंतु धैर्य करून सत्कर्माचरणांत अग्रेसर झालें असतां जन आपल्यास पीडा देण्यास बहुधा उद्युक्त होत नाहींत.

जसें एकादे नावेंत बसून समुद्रामध्यें प्रवास करूं लागलें असतां, मार्गांत प्रचंड वायु सुटून, समुद्र क्षुब्ध होऊन, चहूंकडे लाटा उसळूं लागतात; त्यावेळीं भयभीत होऊन वायूची गति, पाण्याचा प्रवाह आणि आपला जाण्याचा मार्ग यांविषयीं विचार नकरितां स्तब्ध राहिलें असतां आपण क्वचित काळाच्या मुखांत सांपडूं. परंतु विचार करून, धैर्य धरून योग्य योजना करून आपला मार्ग न सोडितां पुढें जाऊं लागलों तर आपण इच्छिलेल्या स्थळीं सुखरूप जाऊन पोचूं. तद्वत् धर्मनौकेमध्यें आरूढ होऊन भवसागरामध्यें प्रवास करूं लागलें असतां, लोक व्यवहाराच्या लहरी भयंकर व अनतिक्रमणीय वाटतात; परंतु धैर्यपूर्वक स्वमार्गीं प्रवृत्त झालें आणि सत्य सोडलें नाहीं तर आपली यात्रा सफळ होते. जर विविधस्वरूप ज्या लोकाचारलहरी, त्यांस भिऊन सद्वर्तन सोडिलें, आणि असत्याचें अवलंबन केलें, तर आपला कधींही जय व्हावयाचा नाहीं.

"सत्यमेव जयते ! नानृतम्"

सत्यच विजयी होतें; असत्याचा कधींही जय होत नाहीं.

## वैराग्य.

१ ईश्वर प्राप्त्यर्थ प्रसंगवशात् यत्किंचित् सकल वस्तूंचा त्याग करण्यास आपणास सिद्ध असलें पाहिजे. कारण तदितर सकल पदार्थांविषयीं वैराग्य हेंच सद्धर्माचें जीवन आणि मोक्षप्राप्तीचें साधन होय.

### श्लोक.

॥ न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः ॥

तात्पर्य; लौकिक कर्मानें किंवा प्रजोत्पत्तीनें किंवा संपत्तीनें अमृतत्वप्राप्ति व्हावयाची नाहीं. केवळ विषयवैराग्यानेंच अमृतत्वप्राप्ति होते.

२ ईश्वरावर प्रीति करणें हें आपल्या जीवनाचें मुख्य लक्ष्य. त्याच्या प्राप्तीनेंच आपल्या सकल कामना परिपूर्ण होतील. कारण तोच एक पूर्णकाम होय. अतएव विवेकानें सर्व वस्तूंविषयीं विरक्त होऊन कृतार्थ व्हावें.

### श्लोक.

कामस्याप्तिञ्जगतः प्रतिष्ठांक्रतोरनन्त्यमभयस्यपारं ॥
स्तोममहदुरुगायम्प्रतिष्ठान्दृष्ट्वा धृत्याधीरोनचिकेतोत्यस्राक्षः

विद्यासंपन्न आचार्य नचिकेता नामें मुमुक्षु पुरुषाची विषयविरक्तता व परमात्मपरता पाहून आनंदयुक्त होत्साता ह्मणतो; हे नचिकेता, तूं खरोखर ज्ञानी होस. कारण परमात्माच एक केवळ पूर्णकाम, सकल विश्वाचा आधार, सकल धर्माचरणाचें अनंत फल दाता, भवसागराचें निर्भय परतीर, अतिश्रेष्ठ, अतिस्तुत्य, विश्वव्यापक, परमपद, असें विवेकानें जाणून संसारसंबंधीं अनेक भोग्य विषयांपासून विरक्त झालास.

याप्रमाणेंच ईश्वरावर भक्ति ठेऊन आपल्यासही विरक्त

झालें पाहिजे. त्याणें आपणास वैभव दिलें तर बरेंच परंतु आपली त्याविषयीं अपेक्षा असूं नये. त्याच्या आज्ञेस अनुसरून तो जें वैभव देईल तें आदरपूर्वक व कृतज्ञतापूर्वक ग्रहण करावें. आणि त्याच्या आदेशानुरूप त्याचा परित्याग करण्यास सिद्ध असावें.

३ विषयवैराग्य हेंच ईश्वरप्रीतीचें निदर्शन होय. त्याच्या प्राप्त्यर्थ विषय सुखाचा त्याग दुष्कर वाटत असतां त्याजवर प्रीति करतों असें ह्मणणें ही गोष्ट अत्यंत असंगत होय. त्याजवर जर यथार्थ प्रीति असेल, तर तदर्थ आपण सर्वस्व अर्पण करण्यास अनमान करणार नाहीं.

४ कित्येक धार्मिक पुरुषांनीं ईश्वरार्थ आपले प्राणसुद्धां अर्पण केले आहेत. मग आपल्यास धन, किंवा विषयसुख किंवा मिथ्या प्रतिष्ठा, यांचा त्याग करण्यास संकोच वाटावा काय? त्याला आपण सर्व अर्पण करावें. त्याच्या आदेशानुसार प्राणही गेला ह्मणून त्यांत आपलें काय अनहित झालें? त्याच्या कृपेवांचून आपलें प्राणधारण तरीं होईल काय?

" कोह्येवान्यात्कःप्राण्यात् यदेष आकाश आनंदो नस्यात् "

तात्पर्य; परमात्मानुग्रहावांचून कोण प्राणधारण करूं शकेल.

५ आपण एकदां धर्ममार्गाचें अवलंबन करून अमृतधामाचे यात्रेकरू झालों तेंव्हांच विषयवैराग्य स्वीकारिलें. आपण आपले प्राण, मन, शरीर, सकल ईश्वरास अर्पण केले. सर्व त्याच्या हातीं दिलें. तर मग त्याच्या कार्यीं विन्मुख कां व्हावें? तो जेथें जावयास सांगेल तेथें जावें;

जें करण्याची आज्ञा करील तें करावें; त्याच्या इच्छेविरुद्ध कोणतीही गोष्ट करण्याचें आपले अंगीं सामर्थ्य नाहीं. आपलें जें आहे तें सर्व त्याचेंच आहे. तेंच आपण त्याच्या प्रीत्यर्थ खर्च करतों. तर वैराग्यास कां भ्यावें? गत गोष्टीचा शोक कां करावा? त्याजवर सर्व भरंवसा ठेऊन कायावाचामनेंकरून त्याची आज्ञा परिपालन करण्याविषयीं यत्न करावा. तदर्थ प्राणार्पण करण्यास देखील भिऊं नये. आपण धर्मयुद्धास प्रवृत्त झालों आहों. ईश्वर आपला सेनापति झाला आहे. तस्मात् अकुतोभय अग्रेसर झालें पाहिजे, पराङ्मुख होतां नये. भयभीत होऊन पलायन करतां कामांस नये. ईश्वराज्ञापालनार्थ सकल कष्ट, सकल दुःख अपराजित हृदयानें सहन करून सद्धर्मांत जय संपादून कृतकृत्य व्हावें हेंच उचित.

## पितृभक्ति.

१ आपण आपल्या मातापितरांवर सदैव अत्यंत प्रीति करावी, त्याप्रमाणें या जगामध्यें आपल्यास पूज्य कोणीही नाहीं.

### श्लोक.

॥ मातरं पितरं चैव, साक्षात् प्रत्यक्ष देवतां ॥
॥ मत्वा गृही निषेवेत, सदा सर्वप्रयत्नतः ॥१॥

तात्पर्य; आपलीं मातापितरें त्यांस साक्षात् प्रत्यक्ष दैवतें मानून निरंतर सर्व प्रयत्नें करून त्यांची सेवा करावी. धार्मिक पुरुषास परमेश्वरावर अत्यंत भक्ति करून त्याच्या सेवेस सदैव तत्पर राहणें उचित आहे, त्याप्रमाणें आपलीं मातापितरें हीं इहलोकीं त्याच्या प्रत्यक्ष विभूती आहेत, असें मानून एकनिष्ठपणें त्यांची सेवा करणें उ-

चित होय. एतद्विषयीं यत्न कधींही शिथिल करतां कामांस नये. मातापितरांच्या सेवेनें आपणास पुण्यप्राप्ति होते, आणि ती न केली असतां प्रत्यवाय घडतो. विश्व-जनक व निखिलमाता परमेश्वर मातापितरांच्या द्वारा आपला पितृभाव आणि मातृभाव प्रदर्शित करितो. त्याच्या दृष्टीनें मातापितरांची सेवा हें आपलें अति श्रेष्ठ आणि अति पवित्र कर्म होय. अतएव आपल्या सकल प्रपंच संबंधी कर्तव्यामध्यें त्या सारखें दुसरें त्यांस प्रिय कोणतेंही नाहीं. यास्तव आपण मातापितरांची सेवा कायावाचामनेंकरून करावी. त्यांचेसाठीं आपलें शरीर, आपलें मन, आपली वाणी, आपण संपादिलेलें द्रव्य, ह्यांचा विनियोग करावा.

२ इहलोकीं मातापितरांप्रमाणें श्रेष्ठ कांहींच नाहीं.

**श्लोक.**

॥ गुरूणांचैव सर्वेषां, माता परमकोगुरुः ॥

॥ मातागुरुतराभूमेः, खात्पितोच्चतरस्तथा ॥१॥

तात्पर्य; सकल श्रेष्ठ वस्तूंमध्यें माता परम श्रेष्ठ होय. माता पृथ्वीपेक्षांही वरिष्ट, आणि पिता आकाशापेक्षांही श्रेष्ठ होय. सर्व मनुष्यांमध्यें मातापितरें अति श्रेष्ठ अशीं मानावीं. आपल्या मातापितरांपेक्षां विशेष विद्वान, गुणी आणि सामर्थ्यवान अशीं मनुष्यें जगामध्यें असतील; परंतु त्यांपेक्षां आपल्यास विशेष पूज्य किंवा मान्य अन्य कोणीही नाहीं. आपल्या आंगीं आपल्या मातापितरांपेक्षां विशेष विद्या किंवा सामर्थ्य असलें, तरी आपला जो त्यांच्याशीं नित्यसंबंध आहे त्याच्या योगानें त्यांच्या श्रेष्ठत्वास न्यूनता येत नाहीं. तव विद्येनें, किंवा मानानें, किंवा अधिकारानें, किंवा

विषयसुखानें, मदोन्मत्त होऊन मातापितरांचा अनादर व अपमान कदापि करूं नये.

३. आपण मातापितरांशीं सदैव अति प्रेमभावानें वर्तावें.

श्लोक.

श्रावयेन्मृदुलांवाणीं ॥ सर्वदाप्रियमाचरेत् ॥
पित्रोराज्ञानुसारीस्यात् ॥ सत्पुत्रःकुलपावनः ॥ १ ॥

तात्पर्य—"कुलपावन सत्पुत्रानें मातापितरांशीं मृदुभाषण करावें, सर्वदां त्यानां जें प्रिय तें आचरावें आणि त्यांच्या आज्ञेचें प्रतिपालन करावें." कदापि त्यांपाशीं कठोरतेनें वागूं नये. कोमल वाणीनें त्यांपाशीं संभाषण करावें; विनीत वेषानें त्यांजपाशीं जावें, सप्रेम दृष्टीनें त्यांजकडे पाहवें; आणि आनंदानें त्यांचें वचन मान्य करावें. नित्य त्यांचें कल्याण चिंतावें व त्यांच्या हितार्थ यत्न करावा. ते जें करण्याची आज्ञा करितील तें खेद न मानितां क्लेश स्वीकार करून करावें. जर कदाचित् त्यांची आज्ञा अन्याययुक्त आहे असें आपल्यास वाटलें तर फार नम्रपणानें आणि मधुर भाषणानें, अत्यंत खिन्नतेनें त्या आज्ञेचा अन्यायीपणा त्यांस जाणवावा ह्मणजे आपल्या विनयानें व सौम्यपणानें तीं संतुष्ट होऊन तद्विषयीं आग्रह धरणार नाहींत. त्यांना सुखी व संतुष्ट करण्या करितां आपल्या वैषयिक सुखाचा त्याग करणें अवश्य पडल्यास त्याविषयीं अनमान करूं नये, हेंच पुत्राचें लक्षण. या लक्षणानें संपूर्ण जो पुत्र, तोच परमपिता जो परमेश्वर त्याचा सत्पुत्र होतो, आणि आपल्या पवित्र आचरणानें आपलें कुल पवित्र करितो.

४. मातापितरें आपल्यावर जें प्रेम करितात, आपल्या साठीं जे नानाप्रकारचे कायिक व मानसिक क्लेश भोगितात, ते अवर्णनीय आहेत.

श्लोक.

यंमातापितरौक्लेशं ॥ सहेते संभवेन्नृणां ॥
नतस्यनिष्कृतिःशक्या ॥ कर्तुंवर्षशतैरपि ॥ १ ॥

तात्पर्य—“ मातापितरें आपल्या करितां जे क्लेश सहन करितात, त्याविषयीं त्यांचे आपण उतराई होऊं ह्मटलें तर सर्व आयुष्य त्यांच्या सेवेंत खर्च केलें तथापि त्यांचे उपकार फेडण्यास आपण समर्थ होणार नाहीं.” मातापितरें आपल्या मुलांच्या सुखार्थ अनेक प्रकारें शारीरश्रम करितात व निरंतर चिंता वाहतात. ह्याप्रमाणें बालपणीं आपलें संरक्षण करणोरं दुसरें कोणीच नाहीं. पहा माता नवमास पर्यंत अति कष्टानें आपल्या उदरामध्यें आपल्यास संभाळिते; आणि आपण जन्मास येण्याचे समयीं अति दुःसह प्रसवयातना सहन करून ज्यापासून मोक्षासारखी महत् फळें प्राप्त होणार अशा प्रकारचें, हें, अति श्रेष्ठ जन्म आपल्यास देते. आपण जन्मल्यानंतर बाल्यावस्थेमध्यें, आपले अवयव अत्यंत मृदु असतात; आपल्यास चलनवलनाची शक्ति नसते; आपल्या हिताविषयीं आपल्यास ज्ञान नसतें; आपली क्षुधा तृषा इतरांस कळविण्यास साधन कांहींच नसतें; व कोणतेही प्रकारें आपलें रक्षण करण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नसतें. अशा स्थितीमध्यें आपली माता आपल्यास किती जिवापलीकडे जपत असते? अहोरात्र तिचें चित्त आपल्याकडे असतें; आपल्यास कांहीं दुःख

होऊं नये ह्मणून ती सतत काळजी वाहत असते; आपल्यास आरोग्य नसलें तर तिला स्वस्थ निद्रा देखील लागत नाहीं; आपण न सांगतां वेळच्यावेळीं आपली तहान भूक ती जाणते; आपलें रुदन ऐकून तिचें हृदय तत्काळ कळवळतें; आपलें यत्किंचित हास्यवदन पाहून तिला अति आनंद होतो. पुढें आपल्या हात पायांस शक्ति येऊन आपण चालूं लागलों, किंवा रांगूं लागलों, ह्मणजे आपण कोठें पडूं, आपल्यास कांहीं अपघात होईल, ह्मणून तिचें चित्त सदैव आपल्याविषयीं उत्कंठित असतें. ती आपल्यास एक क्षणभरसुद्धां विसंबत नाहीं. पुढें जसजसे आपल्या बुद्धीस अंकूर फुटूं लागतात, तसतसें बरें कोणतें, वाईट कोणतें, आपण कशास स्पर्श करावा, कशास करूं नये, इत्याद्यनेक हितावह गोष्टींचें ज्ञान ती हळुहळू आपल्यास देते, अहाहा! मातेचें प्रेम काय वर्णावें! त्याला अंत नाहीं; त्याला पार नाहीं; त्याला कधीं व्यत्यय नाहीं. आपण कितीहि प्रमाद केले, आपण कितीही गोष्टीमध्यें तिला विसरलों, तथापि ती कधींही आपल्यास विसरत नाहीं. यावज्जीव ती कायावाचामनेंकरून आपल्या कल्याणाविषयीं तत्पर असते. मातेची पुत्रवत्सलता किती वर्णन करावी!

॥ नमातुःपरदैवतम् ॥

तात्पर्य—"मातेहून मनुष्यांमध्यें आपल्यास पूज्य दैवत आणखीं कोणीही नाहीं" यास्तव.

॥ मातृदेवोभव ॥

तात्पर्य—"मातेस इहलोकीं परम दैवत मानून एक

निष्ठपणें सदैव तिच्या सेवेंमध्यें तत्पर असावें हें आपलें प्रपंचांत मुख्य कर्तव्य." हें आचरिल्यानें आपण सद्वृत्त, लोकमान्य, व ईश्वरप्रिय होऊं. अन्यथा आचरणानें आपला सर्वोपरी नाश आहे.

५. माता जशी आपल्या हितार्थ निरंतर तत्पर असते, तद्वत् आपला पिताही आपल्या कल्याणाविषयीं अनुदिन चिंता वाहतो; अति प्रयत्नेंकरून आपलें पालन पोषण करितो; आपल्या विद्याभ्यासास नाना उपाय योजितो. आणि आपल्या मातेस जरी पित्यापेक्षां आपल्या करितां विशेष श्रम करावे लागतात, व क्लेश भोगावे लागतात, तथापि त्या सर्वांचा विभागी पिता होतो. त्याचीही आपल्यावर प्रीति अकुंठित, अकृत्रिम, व अनुपमेय होय. अतएव

॥ पितृदेवोभव ॥

तात्पर्य—"पिताहेही इहलोकीं आपलें परम दैवत मानून एकनिष्ठपणें त्याची सेवा करावी." हेंच आपल्यास उचित होय.

६. आपल्या मातापितरांविषयीं आपल्या ठायीं कृतज्ञता बुद्धि सतत जागृत ठेवावी; अनुदिन त्यांचें प्रिय संपादण्याविषयीं तत्पर असावें; परमेश्वरापाशीं निरंतर त्यांस कल्याण मागावें; आणि आपल्या आचरणानें त्यांस कधींही काडीमात्र क्लेश होऊं नयेत एतद्विषयीं सावध असावें. परमेश्वरी कृपेनें आपलीं मातापितरें चिरकाळ वांचून वृद्धत्व पावलीं असतां, विशेष आदरानें त्यांची सेवा करावी. अनेकप्रकारें त्यांचें संगोपन करण्याची संधी परमेश्वरानें आपल्यास दिली, हें आपलें मोठें भाग्य

समजावें. आणि त्यांचें वार्धक्य त्यांस सुखानें जाईल एतद्विषयीं सतत यत्न करावा.

७. सारांश आपल्या मातापितरांची सप्रेमसेवा, हें आपल्या ऐहिक कर्तव्य कर्मामध्यें श्रेष्ठ कर्तव्य होय. यापेक्षां विशेष महत्वाचें कर्तव्य केवळ परमेश्वराची अनन्यभावें भक्ति हेंच होय. कारण मातापितरांच्या अनुपम प्रितीचाही उदय, त्या परमकृपाळू प्रभूच्या अखंड व निरंकुश दयेपासूनच होतो. यास्तव त्या विषयीं अनन्य भक्ति, हा जो आपला परमधर्म, ज्या पासून आपल्यास अखंड कल्याणाची प्राप्ति होणार, तो निर्विघ्न आचरण करण्यास सकल त्याग करण्यास ही आपल्यास सिद्ध असलें पाहिजे. अतएव पितृभक्ति हा जो आपला ऐहिक धर्मामध्यें परम धर्म तोही ईश्वरभक्तीस प्रतिबंधक होऊं नये. याविषयीं तत्पर असावें हें उचित.

# सायंकालीं करावयाची प्रार्थना.

हे परम कृपाळु परमेश्वरा! तुझ्या सेवेमध्यें व तुझ्या मंगल छायेखालीं हा माझा दिवस सुखानें गेला, याविषयीं माझें मन अकृत्रिम कृतज्ञतेनें युक्त झालें आहे. तुझ्या कृपेनें पुन: हा विश्रांतीचा समय प्राप्त झाला आहे. त्याचें अवलंबन करण्या पूर्वीं पुन: शुद्ध भावें करून तुजप्रत आत्म समर्पण करणें, याप्रमाणें माझें दुसरें कोणतें कर्तव्य आहे! हे दीनवत्सला! मजकडून अज्ञानानें किंवा प्रकृतिदोषांमुळें जे अन्याय घडले असतील, ते तूं कृपाळु होऊन क्षमा कर. मी अकृत्रिम अनुतापयुक्त होऊन तुजला शरण आलों आहें. हे कृपाळा! तूंच माझा त्राता व सुखदाता होस. तुजवांचून मज दीनास अन्यगति नाहीं. माझा अव्हेर करूं नको. माझा आत्मा शुद्ध करून आपल्या मंगलधामाचा अधिकारी कर.

असतोमा सद्गमय ! तमसोमा ज्योतिर्गमय !
मृत्योर्मा अमृतंगमय!

हे भगवन! मला असत्यांतून सत्याप्रत ने; अज्ञानांधकारांतून ज्ञानरूप प्रकाशांत ने; व मृत्यूच्या पाशांतून सोडवून अमृतधामाप्रत ने.

## स्तोत्र.

नमस्ते सतेते जगत्कारणाय,
नमस्ते चिते सर्व लोकाश्रयाय ।
नमो द्वैत तत्वाय मुक्ति प्रदाय,
नमो ब्रह्मणे व्यापिने शाश्वताय ॥
त्वमेकं शरण्यं त्वमेकं वरेण्यम्,
त्वमेकं जगत्पालकं स्वप्रकाशम् ।
त्वमेकं जगत्कर्तृ पातृ प्रहर्तृ,
त्वमेकंपरं निश्चलं निर्विकल्पम् ॥
भयानां भयं भीषणं भीषणानाम्,
गतिः प्राणिनां पावनं पावनानाम् ।
महोच्चैः पदानां नियंतृ त्वमेकम्,
परेषां परं रक्षणं रक्षणानाम् ॥
वयंत्वां स्मरामो वयंत्वां भजामो,
वयंत्वां जगत्साक्षिरूपं नमामः ।
सदेकं निधानं निरालंबमीशम्,
भवाम्भोधिपोतं शरण्यं व्रजामः ॥

सुबोध ज्ञान पुस्तकमाला नं० १

# विजया दशमी अथवा दसरा.



हें पुस्तक " हितेच्छूनें " केलें तें
विजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

आश्विन शु. १० शके १८२३.

किंमत १ आणा

श्री रामचंद्रायनमः

# दसरा अथवा विजयादशमी.

यथा सांगरे कर्म कांहीं घडेना। घडे कर्मतें पुण्य गांठीं पडेना।

रामदास.

हिंदुस्थानांतील मोठ्या उत्साहांपैकीं हा एक उत्साह आहे. मोठ्या सणांतील हा एक मोठा सण आहे. राष्ट्र-विजयाचे दिवसांपैकीं हा एक मोठा विजयाचा दिवस आहे. हा सण व या पूर्वींचे नऊ दिवस हे इच्छित फल प्राप्ती करितां ईश्वराची आराधनाकरून, फल मिळवि-ण्याच्या उद्योगास लागण्याचा आहे. हा हिंदुस्थानचे अमके भागांत आहे व अमके भागांत नाहीं असें नाहीं. हा हिंदूंचे अमके घरांत आहे व अमके घरांत नाहीं असें ही नाहीं. शास्त्रकारांनीं गांवोगांव, शहरोंशहरीं,

॥ पूजनीया जनैर्देवी स्थाने स्थाने पुरे पुरे ॥
॥ गृहे गृहे शक्तिपरैर्ग्रामे ग्रामे वने वने ॥
॥ स्नातैः प्रमुदितै र्हृष्टैर्ब्राह्मणैः क्षत्रियैर्नृप ॥
॥ वैश्यैशूद्रैर्भक्ति युक्तै म्लेंच्छैरन्यैश्च मानवै ॥
॥ स्त्रीभिश्चकुरु शार्दूल तद्विधान मिदंशृणु ॥

स्थलोंस्थलीं फारतर काय पण वनोंवनीं सुद्धां हा कामनिक उत्साह करण्यास सांगितलें आहे. हा ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांनींच केला पाहिजे असें नाहीं

तर म्लेंच्छांनीं सुद्धां करण्यास परवानगी आहे. मग ते म्लेंच्छ काबूलचे अमीर असोत, इराणचे शहा असोत, तुर्कस्थानचे बादशाह असोत, रशियाचे झार असोत. इंग्लंदचे राजे असोत, वा अमेरिकेचे अध्यक्ष असोत, ज्यांस यशाची गरज असेल व विजय होण्याची इच्छा असेल त्यांनीं हें व्रत करण्यास हरकत नाहीं असें आमचे औदार्यशाली व जगद्धितेच्छु शास्त्रकार ह्मणत आहेत.

हा भक्तिप्रचूर उत्साह एक दिवसाचा नाहीं, एक रात्रीचा नाहीं, अथवा एका अहोरात्रीचाही नाहीं. दहा अहोरात्रीचा आहे. नऊ दिवस सबीज, सक्रीय आणि सभक्ती ईशाराधना करून दहावे दिवशीं कार्यारंभ केल्यास त्यांत विजयी व्हावयाचेच; असा अनुभव आमच्या पूर्वजांना आला आहे. त्यांनीं आपल्यावर चालून आलेल्या महाबलाढ्य शत्रूंवर या दिवशीं चालकरून जाऊन त्यांचीं पोटें फोडून त्यांतून अन्याय व जुलूम बाहेर पाडून तेथें न्याय, दया, क्षमा, शांती यांची स्थापना केली होती व त्या सुखाचा अनुभव आह्मी कित्येक पिढ्या घेतला आहे. आपली उन्नत्ति व्हावी असें प्रत्येकास वाटतें व तो आपली उनति व्हावी ह्मणून रात्रं, दिवस श्रम करीत असतो. प्रत्येक व्यक्तीचें उन्नतींत राष्ट्राची उनात्ति आहे असेंही ज्ञाते लोकांचें ह्मणणें आहे परंतु आमच्या श्रमाची आणि ज्ञाते लोकांच्या ह्मण-

ण्याची गाठ कधींच पडावयाची नाहीं असा आमचा वर्तन क्रम आह्मांस सांगत आहे. तो ह्मणतो. तुमचा आत्मोन्नतीचा रस्ता चुकून तुह्मी भलतीकडे भडकत आहांत. तुह्मी आपले पूर्वजाला विसरला, स्वराष्ट्राला विसरला, स्वधर्माला विसरला, स्वकर्माला विसरला, आणि स्वबांधवाला शत्रू समजून अन्यायाला मिठ्या मारूं लागला आहांत, व स्वबांधवाच्या घातास कारण होत आहांत. मग तुमची उनत्ति होईल कशी ? जर तुमची उन्नत्ति होत नाहीं आणि तुह्मी आपलें पहात नाहीं तर तुमच्या राष्ट्राची उनत्ति कधींही व्हावयाची नाहीं. आमच्या वर्तन क्रमाचें वरील सिद्धांताचे खुलाशाकरतांच आजचा दसरा आहे. हा खुलासा आपण खुल्या अंतःकरणानें अवलोकन कराल अशी प्रार्थना आहे.

आमच्या महाराष्ट्राची स्वामिनी महालक्ष्मी आहे, कोंकणांतील आदिशक्ती दुर्गा, महाकाली, महासरस्वती आणि कालिका आहे, याच विंध्य पर्वतावर गेल्या ह्मणून यांस विंध्यवासिनी ह्मणूं लागले. यांचे भक्त कलकत्याकडे झाले, त्यांनीं काली नांव ठेविलें, पंजाबी अन्नपूर्णा ह्मणूं लागले, मद्रास आणि तैलंगणांत चामुंडा अथवा चंडी नांव मिळालें. काशीस या नव दुर्गा नव दिशेस बसवून तेथील लोक या नऊ दिवसांत यांचे दर्शनास गेल्या-

खेरीज अन्नग्रहण करीनासें झाले. श्रीरामचंद्रांनीं लंकेवर स्वारी करण्यापूर्वीं इचीच आराधना केली होती; आणि इचाच प्रसाद घेऊन रावणावर स्वारी केली आणि विजय मिळविला. श्री रामचंद्र लंकेहून परत आल्यानंतर रामचंद्राची सर्व व्यवस्था सीताबाई स्वतः ठेवीत असत. श्री रामचंद्राचीं वस्त्रें, शस्त्रें, अलंकार वगैरेची ठेवरेव सीताबाईकडे असे. कोणाला कांही देणें, कोणाला आणणें, बोलावणें झालें तरी तें यांच्या कडेसच असें. कोणाला कांहीं लागलें अथवा करावेसें वाटलें तरी तें त्यानें मारुतीला सांगावयाचें, मारुतीनें सीताबाईस कळवावयाचें, आणि त्यांनीं श्री रामचंद्राचे परवानगीनें जें काय करणें योग्य असेल तें करावयाचें असा सांप्रदाय असे. हा सांप्रदाय श्री रामचंद्रांनीं यांची वाल्मिकाश्रमीं रवानगी करून आपण योग साधन करण्यास प्रारंभ करीपर्यंत सारखा चालला होता. रामार्जनचंद्रिकाकारांनीं असें लिहिलें आहे कीं, आनंदपूर्ण कवी, मारुतीस सांगत असत व मारुती सीताबाईस सांगून प्रतिवर्षी सर्व वानर गणासह हा उत्सव करून विजयादशमीच्या मुहूर्तावर बाहेर निघून मिळालेल्या विजयांचें स्मरण कायम ठेवीत असत. म्हैशासुराचा वध याच नऊ दिवसांत केलेला आहे. रक्तबीजांचा फडशा या नवरात्रांतच पाडला आहे. अर्जुन आज्ञात वासांतून मोकळा झाला तो आपण आज

ज्या शमीची पूजा करतों त्या शमीची पूजा करूनच विजयी झालेला आहे. अशी अनेक उदाहरणें आपल्या पुराणांतून आहेत व गेल्या दोन अडिचशें वर्षां पूर्वींचे इतिहासांतही आढळतात. हा उत्साह सर्व राष्ट्रांत पसरला आहे व तो आजपर्यंत सारखा चालू आहे. इतकेंच नाहीं तर गेले नऊ दिवस आपण आपल्या शक्त्यनुसार तेंच करीत आला आहांत आणि आपल्या कार्यांत जय प्राप्ती व्हावी ह्मणून आजच्या या घटकेसही मोठ्या आनंदानें बाहेर पडला आहांत. असें आपण प्रतिवर्षी करीत असतां आपणास राजदरबारांत जय नाहीं, राजव्यवहारांत जय नाहीं, लोक व्यवहारांत जय नाहीं, लोकाचारांत जय नाहीं, स्वबांधव कुटुंबांत जय नाहीं. व स्वकुटुंबांत ही जय नाहीं. जिकडे जावें तिकडे अपजय आणि अपमान मांड चढवून तयार! जिकडें पहावें तिकडें आघात आणि अपघात यांची तयारी! असें कां व्हावें? या प्रश्नाचें उत्तर लेखकाचें थोतांड, कवीची अतिशयोक्ति, भिक्षुकाचा अपस्वार्थ असेंच ऐकावयास सांपडतें व सांडणार! होय. कव्युक्तींत कदाचित् अतिशयोक्ति ही असेल आणि भिक्षुकाचा अपस्वार्थी पणाही कदाचित त्यांत असेल. पण कवीचे अतिशयोक्तीला अथवा भटाच्या अपस्वार्थीपणाला अश्रय देणारें स्थल पाहिजे आहे त्या खेरीज वरील दोन्ही प्रकार घडावयाचें

नाहींत हें उघड आहे. दुसरें, तें रामायण काला पासून राघोबा भरारीपर्यंत ह्मणजे दहापांच हजार वर्षेपर्यंत कमी जास्त प्रमाणानें चालत आले असोन, त्याप्रमाणें कार्येघडून आलेली आहेत, तेव्हां अनुभवास मिथ्या ह्मणतां येत नाहीं. तिसरें, परंतु ज्यांना अंशतःतरी विचार शक्तीचे लागतें आहे त्यांनीं आपलें विचाराचा ओघ आपल्या पूर्वजांच्या कृतीपर्यंत नेऊन भिडविल्यास आणि त्यांच्याकृतीची व निश्चयाची आपल्या कृतीशीं आणि निश्चयाशीं तुलना केल्यास त्यांची चूक त्यांच्याच नजरेस येणार आहे. हें स्पष्ट करून दाखविण्याकरतां पुराणा पैकींच एक पुराणी गोष्ट येथें देतों.

कोल्हापूर प्रांतीं सुरथ या नांवाचा राजा राज्य करीत असे, हा जातीनें प्रतापी होता तरी विषयी असे. विषयी पुरुष कसे परस्वाधीन होतात, त्यांची बुद्धि, ज्ञान अथवा निश्चयादि नैसर्गिक गुण एका स्त्रैणत्वामुळें कसे निस्तेज आणि निर्बली होतात याचा अनुभव सर्वांस आहेच. अशा निर्बली मनुष्यास योग्य मार्गावर आणणारे पुरुष कोणतेही कालीं थोडेच असावयाचें. स्वार्थ साधू, आप्पलपोटे अशांचीच समृद्धी केव्हां आणि कोठेंही असावयाची. त्याप्रमाणें हा स्त्रैण बनतांच याच्या भोंवतीं अशाच लोकांचा भरणा जुळला होता यांत याचा प्रधान अग्रगणी होता. आपले राजास मूर्ख बनविण्याकरितां

प्रयत्न करणारे, अथवा राजांतील राजतेज विघडवून सोडण्याकरतां प्रयत्न करणारे, त्याच्या क्षात्र रक्तांत भेसळ करून त्यास आपले ताब्यांत आणणारे दरवेशी सर्व राष्ट्राचे घातास कारण होतात. तशा घातकी स्वभावाचा प्रधान जरी याच्या जवळ नव्हता तरी तो आपलें घर भरण्यापेक्षां ज्यास्त कांहीं पहात नसे. यामुळें रयतेंत " यथा राजा तथा प्रजा " या ह्मणी प्रमाणें स्त्रैणत्व माजून जिकडे तिकडे अव्यवस्था झाली. चंगीभंगी लोकांचा सुळसुळाट झाला. पौरुष्य लय पावलें, स्वाभिमानाची दिशा बदलली, ऐक्याचे खोब्रें झालें. व "बळी तो कान पिळी" ही स्थिति झाली. तेव्हां अर्थातच शत्रूस फावलें. त्यांनीं आजूबाजू पोखरल्या. हें पहातांच प्रधानजी आपलें घर संभाळण्याचे आशेनें शत्रूस सामील झाले. आणि थोडे अवकाशांतच राज्यांत शिरून त्यांनीं सुरथास राज्यावरून हाकलून देऊन आपण राजे झाले.

सुरथास त्याचे मूर्खपणाचें बक्षीस यथायोग्य प्रकारें मिळालें. सुखासनावरून ओढून काढून दुःखासनावर बसविलें. पहिले प्रधान, पहिले मंत्री, पहिले सचीव, पहिले नोकर चाकरादि चटसारे आपापल्या घरीं, या नव्या राजाची चाकरी करीत राहिले आणि हा एकटा प्राणी प्राणाशेनें एका वनांतून दुसरे वनांत भटकूं ला-

गला ! एके झाडाखालून दुसरें झाडाचे सावलीखालीं वसूं लागला ! अन्न दृष्टी आड झालें तरी भूक आपली चिकाटी सोडिना. तेव्हां तिचे शांत्यर्थ झाडाचीं फळें खावीं आणि असावें, लोंड तिवाशांचें स्मरण करावें आणि झाडाचा पांचोळा दगड यांच्या गाद्या गिरद्या मानून झोंप घ्यावीं. असें करीत करीत सुमेधा ऋषींचे आश्रमीं येऊन दाखल झाला.

याच वेळीं समाधी या नांवाचा एक वैश्यही तेथें आला. हा वैश्य धनकनक संपन्न होता. याला स्त्री व मुलें बरींच होतीं. हा मोठा उद्योगी आणि सहासी होता. पैसा कोठून आणि कसा उत्पन्न करावा हें याच्या पासून शिकण्यासारखें होतें. खंडींतील पावरतीही हलूं द्यावयाची नाहीं हा याचा बाणा असे. पान पत्रावळी पासून लक्षाधीश कसे होतात, हें यानें जगास दाखविलें होतें. अशा निरलस उद्योगी, आणि बुद्धिमान व्यापाऱ्यासही अरण्यवास भोगावा लागला! याचें कारण त्याचा कंजुषपणा आणि त्याच्या पुत्रांची उधळीवृत्ती याचें धर्म कार्पण्य आणि विशेष त्यांची धर्मोदार्यता, याचा स्वाभिलाष आणि त्यांचा परोपकार इत्यादि दुर्गुण सुगुणांचे एकत्र वास्तव्य होईना; ह्मणून पिता पुत्रांचें पटेना. ते अनेक आणि हा एकटा, एक स्त्री होती तीही पुत्र मोहानें त्यांसच मिळाल्यामुळें याचें कांहींच चा-

लेना. तेव्हां हा वैतागुन घर सोडून जो निघाला तो फिरत फिरत वरील ऋषीचे आश्रमीं आला.

ऋषी ह्मणजे जप, तप, व सत्य यांची मुर्ति असल्यामुळें त्यांच्या आश्रमीं ऋद्धि सिद्धि पाणी भरत आसावयाच्या त्यांच्या आश्रमीं राजा आणि रंक सारखेच दिसायाचे आणि असायाचें ही पण सारखेंच त्यांच्या सामर्थ्याची उपमा त्यांनाच, त्यांचा शब्द झेलण्यास ब्रह्मा, विष्णु, महेश सदा तत्पर असायाचे. अशा ऋषीच्या आश्रमीं कंगाल झालेला राजा आणि वैतागलेला वणिक् आला असतां एकाच दरानें राहिले. तेथील कसोटी या दोघांच्या हीं कसोटीहून अगदींच भिन्न असल्यामुळें त्यांस आपण नवें जगांत आलों आहोंत असें वाटलें. पहाटेच्या पक्षांचे ध्वनी कानीं पडण्यापूर्वीं उठण्याचें राजा विसरला होता पण वैश्यास ती संवय होती. तथापि त्यावेळीं उठून स्नान करणें दोघांसही माहित नव्हतें. लांकडाचा खर्च वांचविण्या करितां वणिक् सीतोदकानें स्नान करी पण तें बारा वाजतां करीत असें. राजास त्याचा स्पर्शही नव्हता. भगवन्नाम स्मरण राजास संकट काळीं आणि वैश्यास तोट्याचे प्रसंगीं होत असें, इतर वेळीं त्याची ओळखही नसे. राजा तारुण्य, लक्ष्मी आणि अधिकार मदानें धुंद झालेला आणि वैश्य संपत्ति लोभांत गुंग झालेला अशा क्रमांत ज्यांची निमें पेक्षां

अधिक अयुष्यें खर्च झालेलीं त्यांस येथें प्रात:स्नान, संध्योपासन, अग्नि पून, होम हवन, गोरक्षण, आणि भात अथवा कंदमुळें भक्षण आणि अहोरात्र ईश चिंतना खेरीज अन्य देखावा दिसेना, अन्यविषय ऐकूं येईना, अथवा अनुभवण्यास मिळेना. ऋषि पत्नी, ऋषि कन्या आणि ऋषि पुत्र सदोदित त्यांतच निमग्न ! अशा सर्वतो परी विपरीत स्थितीमुळें या दोघांस कंटाळा येई; आणि हे केव्हां केव्हां तेथून निघून दूर एकांत स्थलीं जात आणि आपल्या पूर्व कृतीचें स्मरण करून सुखदु: खानें व अखेर विचारानें समाधान करून परत येत असत.

अशां क्रमांत कांहीं दिवस गेले, एके दिवशीं राजा आणि वैश्य नित्याप्रमाणें एके झाडा खालीं बसले आहेत, राजा आपलें ऐश्वर्य मनांत आणून माझा हिऱ्यांचा हार कोण घालीत असेल, माझा रत्नजडीत मुकुट तो दुष्ट घालीत असोन आपले वैभवानें लोकांस दिपवित असेल, माझ्या नाटक शाळा, मजकरतां शोक करीत असतील; न जाणो, कोणी जिवास मुकल्या असतील, कोणी आशेनें माझ्या वाटेकडे डोळे लावून बसल्या असतील, कोणी माझ्या शोधांत असतील; व कोणी पैशाचे लोभामुळें त्याच्या बरोबरच विलास करींत असतील!

माझ्या राण्या माझ्याच राहिल्या असतील काय ?

असतील तर मज साठीं झुरत असतील. त्या चांडाळानें त्यांस आपल्या राण्यांच्या दासी बनविल्या असल्यास त्यांनीं आपली हत्या करून घेतली असेल. अंधार कोठडींत टाकल्या असतील तर माझी त्यावेळची मुर्ति ध्यानांत आणून माझ्या अवस्थेबद्दल शोक करीत असतील, माझा आतांचा हा पोषाख, हें स्वरूप, हें वस्ति स्थान त्यांच्या लक्षांत कसें यावें ?

वैश्याचे विचार राजापेक्षां अगदीं निराळेच चालले होते. आपली बायको चांगलें सुग्रास खावो अथवा अंबिल भाकरी खावो, ती मुलांशी गोड बोलो अथवा भांडत असो; मुलें तिच्या बरोबर लडिवाळपणानें वागोत अथवा वर्दळीस येवोत. त्यांत मोठेंसें नफा नुकसान नाहीं पण मी घरांतून बाहेर पडलों तेव्हां जिन्याचें पोतें तसेंच राहिलें होतें. तें जर त्यांनीं ठेवलें असलें तर आज नाहीं उद्यां तरी भाव येईल. हें कांहींच न करतां तसेंच पडलें असलें तर दिवसां चिमण्या आणि रात्रीं उंदीर पार फडशा उडवून देतील ! हें नुकसान सर्वांत मोठें आहे. हल्ली ऊन चांगलें तापत आहे, तिसऱ्या प्रहरीं वाराही बरा सुटत आहे, अशावेळीं दाण्याची पेवें आणि भाताच्या कणगी ऊपसून ऊन देऊन टाकलें ह्मणजे वर्षभर पहावयास नको. यांत जर कां त्यानीं हयगय केली तर कोंडा आणि फोलकटेंच हातीं

लागावयाची ! त्या लेकांना त्याची किम्मत आतां कशानें कळणार ? अशा विचारांत वैश्यानेंही आपला वेळ घालविला, आणि पर्ण कुटीकडे जाण्यास दोघेही निघाले. वाटेनें जातांना दोघे ह्मणतात अशा विचारांत सर्व आयुष्य गेलें तथापि आपले विचारांची पूर्तता व्हावयाची नाहीं आणि कार्यही साधावयाचें नाहीं. या करतां असें न करतां आपण ऋषीस विचारूं आणि त्यांनीं एखादा मार्ग दाखविल्यास त्याचें अवलंबन करूं. असा बेत कायम करून दोघेही आश्रमीं आले.

सुमेधा ऋर्षी आपले नित्य नियम आटोपून असनावर बसले आहेत, भोंवती शिष्य ऋपिवाक्य श्रवण करण्याकरितां तत्पर झाले आहेत, अजूबाजूस गायींचीं वासरें बागडत आहेत, निरनिराळे जातींचे पक्षी निरानिराळ्या वृक्षांवर, निरनिराळे शब्द करीत हिंडत आहेत, ऋपि कन्या रात्री कारितां पुष्पें, दुर्वा, इत्यादि पदार्थ तोडून आणून ते नारळीचे सोपावर निवडून ठेवित आहेत, अशा शांत व आनंदाचे समयांतच राजा आणि वैश्य आपापल्या स्थितीचे विचार आटोपून व पुढील गोष्टींचा विचार करीत करीतच तेथें येऊन बसले. तपी अथवा योगी पुरुषास दुसऱ्याचे अंतर जाणणें मुळींच कठीण नसतें. दुसऱ्याचे मनांतील ते तेव्हांच सांगूं शकतात ह्मणूनच त्यांस अंतर ज्ञानी ह्मणतात. हें तर काय पण सर्व

जगाचे भूत, वर्तमान व भविष्य जाणण्याची शक्ति त्यांच्या अंगीं येत असल्यामुळें त्यांस त्रिकाळज्ञ ह्मणतात. अशा ज्ञानीपुरुषांच्या अथवा ऋषींच्या किंवा महर्षींच्या गोष्टी पुराणांतून अनेक आहेत. अशा महर्षिपैकीं सुमेधा हे एक ऋषि असल्यामुळें त्यांनीं यांची सर्व स्थिति आणि रीती लक्षांत आणून त्यांस सांगीतलें. आपली स्थिति आमचें लक्षांत आली, आपल्या इच्छाही आम्हाला कळल्या आहेत. त्या साध्य होणें अशक्य नाहीं तरी त्यांचे सिध्यर्थ शुद्ध निष्ठा, नियमित वागणुक, आणि कृतनिश्चय यांची जरूर आहे. हे गुण राजा सुरथा, तुज मध्यें आहेत परंतु तें अज्ञान आणि अविचार यांच्या खालीं दडपून गेले आहेत. भक्ति हा गुण ही तुजमध्यें आहे, परंतु तो मोक्षमार्गांत नसोन नर्क साधनाकडे वळला आहे. हें अज्ञान पटल काढून टाकण्याकरितां तुला प्रथम देहदंडण सोसिलें पाहिजे आहे, उग्रतप केलें पाहिजे आहे आणि ज्या मोहमायेनें तूं गुरफटून गेला आहेस तें मायेचें अवरण काढून टाकून तुझी तुला ओळख पटली पाहिजे आहे. हे राजा, तुला राज्यभ्रष्ट करण्यांत तुझे शत्रूचा दोष आहे अथवा तुझे दैवाचा अपराध आहे, किंवा तुझे भोगतृत्व कारण आहे असा सिद्धांत करण्यापूर्वीं तूं आपल्या चुका शोध ह्मणजे तुझें तुलाच कळेल कीं, शत्रू, दैव अथवा भोगतृत्व हीं तुझें अपराधांतून उत्पन्न झालीं आहेत. तूं राज्यमदानें परमेश्वरास विसरलास, व तारुण्य मदानें कर्तव्यास विसरलास ह्मणून स्वराज्यास मुकलास यांत दुसऱ्याचा अपराध काय? आतां तुला तुझें पूर्व-

वैभव पाहिजे असेल तर शक्तीची आराधना कर. तिला प्रसन्न करून घे. ह्मणजे तुझें शत्रूचा पराभव करण्याचें सामर्थ्य तुजमध्यें येईल आणि तुझें राज्य तुला मिळेल व तूं सुखी होसील.

ऋषींच्या या भाषणानें राजाचें अंतःकरण पश्चात्तापयुक्त झालें. ऋषीच्या सत्यवाणीनें त्याचे अपराध, त्याचीं पातकें, त्याचे दोष त्याच्या हृदयांत मूर्तिमंत उभे राहिले तेव्हां तो सद्गदीत अंतःकरणानें त्यांच्या पायावर लोटांगण घालूं लागला व क्षमा मागूं लागला. तेव्हां मुनीचे अंतःकरणांत कृपा उत्पन्न होऊन त्यांनीं त्यास सबीज मंत्र दिला आणि अनुष्ठान करावयास सांगितलें. ऋषींच्या आज्ञेप्रमाणें यानें आठ दिवस व्रतस्थ राहून अनुष्ठान चालविलें तरी देवी प्रसन्न होत नाहीं, हें पाहून राजानें आपलें शरीरांतील रक्त आणि मांस अर्पण करण्यास सुरुवात केली. इतका कृतसंकल्प प्रत्ययास आल्या नंतरही जर ईश्वर प्रसन्न झाला नाहीं तर जगाला तारकच कोणी नाहीं असें ह्मणावें लागेल. परंतु वास्तविक प्रकार तसा नाहीं. जगाला चालक आहे व त्याच्या सूत्रावर सर्व जग हालत चालत आहे. याचें प्रत्यक्ष प्रमाण आदि शक्तीच्या प्रत्यक्षतेनें सुरथ राजापुढें आलें. ती प्रसन्न झाली तेव्हां यानें राज्य आणि भक्ति मागीतली व ती श्रीमहालक्ष्मीनें दिली. तेव्हां तिच्या अशिर्वादानें त्यानें आपला शत्रू जो कोल्हार याचा पराभव करून तेथेंच महालक्ष्मीची स्थापना केली. तें कोल्हापुर दक्षिण काशी या नांवानें अद्याप प्रसिद्ध आहे.

ही पुराणांतील पुराणी गोष्ट भाविकास सत्य, अभा-

विकास असत्य, अधुनिक विद्वानास खोटी व अतिशयोक्तीची वाटेल तर वाटो, पण जे कोल्हापुरचे महालक्ष्मीचे देवालयांतून जाऊन आले आहेत, ज्यांनीं त्या देवालयाची बांधणी, त्याचें जुनाट स्वरूप, त्याचे बांधणीचा काल, यांकडे लक्ष्य दिलें आहे त्यांना त्या कालांतील कारागीरीचे आणि बुद्धिमतेचें आश्चर्य वाटतें, तसें तें बांधण्याचें कारणांकडें लक्ष्य दिल्यास त्या दृढनिश्चयी पुरुषाचे भक्तीचेही आश्चर्य वाटल्या वांचून रहाणार नाहीं. या व याचे मागून झालेल्याअनेक राजांनीं

॥ जयदेवरदे देवि दशम्यामपराजिते ॥
॥ धारयामिभुजेदक्षेजय लाभाभिवृद्धये ॥
॥ बलसाधेहि बलयमाधि, शत्रौ पराजयम् ॥
॥ त्वद्धारणद्धवेयुधे धनधान्य समृद्धय ॥

असें ह्मणून मागणी केली तसीच आह्मांसही केली पाहिजे आणि ती करणें अगत्याचेंही आहे असें प्रत्येकास वाटेल. पण त्याबरोबरच ज्या भक्तीभावानें आदिशक्तीस प्रसन्न करून घेतलें तो भक्तीभावही आपणांत असल्यावांचून देवी कांहींएक द्यावयाची नाहीं असेंही ध्यानांत येईल. याचा अनुभव सांप्रत व्यवहारांतही येत आहे.

॥ इत्येनं भ्रामये द्राष्ट्र दुर्गादेवी रथोत्थिताम् ॥
॥ नरयानेन वा पार्थ ततोऽविघ्नं समापयेत ॥
॥ अथोत्पन्नेषु विघ्नेषु भूतशांति समाचरेत् ॥
॥ येन विघ्नान जायन्ते यात्रासंपूर्णतांव्रजेत् ॥

आपलें नवरात्र आणि हा श्लोक कसा जुळणार ? नंदादिप माळ वाल्यास भूतबाधा होण्याचा संभव नाहीं. उठते बसते दिवशीं आपण तेथें असोन इतर दिवसांची

माळ उपाध्येबुवांच्या गळ्यांत अडकिवणाराच्या मागें एक भूत जन्मभर असतेंच; तेव्हां त्यांसही या श्लोकांतील भूत-बाधा होण्याचा संभव नाहीं! जे घृतकल्या मधुकल्या पेक्षां अधिक संबंधच ठेवीत नाहींत त्यांना हा श्लोक अथवा यांतील भूत काय करणार? असा प्रकार महाराष्ट्रांतच आहे आणि उत्तरेस अथवा पूर्वेस नाहीं असा अर्थ नाहीं. विंध्याचलवासिनीच्या देवालयाचे गाभाऱ्यांत, काशीचे दुर्गेचे मैदानांत, कलकत्त्यास काली देवते पुढें, या नवरात्रांत बकऱ्यांचे रक्ताचा जो खच साठतो तो एकत्र केल्यास परशुरामाच्या रामऱ्हदा प्रमाणें भले जंगी एक सरोवरच बनेल! हा प्राणनाश हल्लींच्या पशू नाशा इतका मोठा भरला नाहीं, हल्लींच्या नित्य नाशाचा उद्देश नवरात्रांतील पशूं घातासारखा पवित्र नाहीं, तथापि त्यांच्या घाताची जी दिशा आपल्या पूर्वजांनीं घालून दिली आहे ती सुटून आपण भलतीकडे चाललों असल्यामुळें प्राणनाशाचें पातक मात्र पदरीं घ्यावें लागत आहे! असें ह्मणणें भाग आहे.

आपण नवरात्रांत मूळ नक्षत्रावर सरस्वतिची स्थापना करितों, तिचें पूजन करतो, तिला नैवेद्य दाखवितों. आणि श्रवण नक्षत्रावर सरस्वती विसर्जन करतो. याचा अर्थ सरस्वतीनें शुंभ निशुंभ यांच्या वधार्थ भक्तांच्या प्रार्थनेवरून अवतार घेतला आहे व भक्तांचें कार्य करून ती गुप्त झाली आहे, इतकाच समजावयाचा अथवा अधिक कांहीं आहे, हें पहातो कोण? या सरस्वती पूजनांत पूर्वीं वेद आणि शास्त्रें मात्र येत असत-परंतु आमच्या पहाण्यांत कांहीं—बरेंच पुष्कळ—खप्पी

असे आले आहेत कीं, त्यांच्या गृहांत वेदाक्षराचा अंक्ष्य झालेला आहे, शास्त्राचे एकाददुसरें पुस्तक आहे परंतु तें उंच जईवर आहे, तें काढण्याचा उपद्व्याप करण्यापेक्षां खालीं असलेलीं क्रमिक पुस्तकें, करमणुक, मासिक मनोरंजन, इंग्रजी मराठी कोश, व आणखी सटरफटर पुस्तकें व वर्तमानपत्रांच्या फाईलीच सरस्वती पूजनाच्या स्थलीं मांडल्यास काय हरकत आहे? या धोरणावर त्याच मांडल्या आहेत ! आणि यजमानांचे भोजनास उशीर झाला, पित्त खवळलें, कचेरीची वेळ टळत चालली ह्मणून पानावर भात वाढणाराकडे लक्ष देत उपाध्ये बोवा सरस्वतीवर गंधाक्षद टाकीत आहेत !! अशा पूजनानें शुंभ निशुंभासारख्या मूर्ख अथवा महा मूर्खांचा पराभव करण्यास ही सरस्वती उपयोगी पडेल काय?आमच्या पूर्वजांनीं सरस्वती पूजन असेंच केलें होतें काय ? नाहीं. ते व्रतस्थ व अनुष्ठानीं राहून देवीची प्रार्थना करीत असत. शुंभ ह्मणजे मूर्ख व निशुंभ ह्मणजे महामूर्ख अशांच्या बरोबर लढाई करण्या इतकी शक्ति देण्याबद्दल भक्तीपूर्वक प्रार्थना करित असत. सरस्वती ही ज्ञानाची देवता आहे.या देवतेला प्रसन्न करून घ्यावयाचे ह्मणजे सत्य ज्ञान संपादावयाचे. मूर्खांचें मूर्खत्व नष्ट करण्यासारखें तें सतेज आणि सबल असलें पाहिजे ह्मणून सरस्वतीची आराधना करावयाची आहे. याच इच्छेनें ते सरस्वती पूजन करीत, तिची भक्तीपूर्वक प्रार्थना करीत, तिला अनन्य भावानें शरण जात आणि तीही सदय अंतःकरणानें प्रसन्न होऊन अज्ञानामुळें शुंभ निशुंभ बनलेल्या राक्षसांचा वध करी,ह्मणजे त्यांचें

अज्ञान नाहींसें करी. सरस्वती रक्तपाताची देवता नाहीं, ज्ञानाची देवता आहे. सत्य, निष्ठा, निश्चय, धैर्य, उद्योग आणि सुविचार हीं इची अयुधें आहेत. या अयुधांनीं ती शत्रू पराजय करून भक्तांस विजयी करते. हें मनांत न आणतां " यथा सांगतें कर्म कांहीं घडेना । घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना " हें श्रीसमर्थ रामदास स्वामीचें वाक्य अनृत करूं ह्मटलें तर कसें होईल? आह्मी जातीनें सज्ञान असोन शुंभ बनलों तर ती सरस्वती तरी कोणाकरतां, कशी व काय ह्मणून प्रसन्न होईल?

आज विजयादशमी आहे, आज श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत सर्वांनीं आंगाला तेल लावलें असेल. कोणी बेलीया लावून घमघमाट केला असेल तर कोणी अरगजा गरगजा करून थोडा तरी अर्गजा अंगाला लावला असेल. कोणी मसाल्याचे तेलानें शरीर नरम पाडलें असेल तर कोणी खोबरेल तेल चोपडून त्यावर बुक्याचें उटणें केलें असेल. तसेंच कोणी भाग्यवानानें शेलादुपेटा नवा घेतला असेल तर कोणी कोट जाकीट नवें केलें असेल. कोणी सबूट पाटलोणीचा " सूट " तयार केला असेल तर कोणी एका नव्या उपरण्यावरच दसरा साजरा केला असेल. फार तर काय पण " धीस इज आल बॉश " ह्मणणाऱ्यांतील कांहींनीं प्रातःस्नान केलें नसेल, तेल न लावतां क्यारबॉलिक साबणच लावलें असेल, नवीं वस्त्रें परिधान केलीं नसतील तरी स्त्रीयेचे मर्जी करतां, अथवा मातापितरांच्या जिकीरी करतां अथवा शेजारी पाजारी किंवा इष्टमित्र यांच्या थट्टेबाजी करितां ह्मणून

तरी श्रीखंडपुरी, भजी, जिलबी, अथवा नित्यांत नसणाऱ्या अन्य कांहीं तरी पदार्थावर ताव मारण्यास कमी केलें नसेल. जे हासी आणि श्रीमंत आहेत, ज्यांच्या जवळ तांग्यागाडीचे तरी घोडे आहेत, ज्यांच्याजवळ मोडकीं तोडकीं, गंजलींभंगलेलीं हत्यारें परवानगीनें राहिलीं आहेत, त्यांतील पुष्कळांच्या नोकर चाकरांनीं घोड्यांस स्नान घातलें असेल, हत्यारें साफसुफ करून त्यांची पूजा केली असेल व ज्यांच्या दुर्दैवानें या दोहोंपैकीं कांहींच नाहीं त्यांनीं विळे, विळया, कुऱ्हाडी, परशु अथवा चाकू, सुऱ्यांचें तरी पूजन केले असेल. असाच आमच्या पूर्वजांचा दसरा असे काय? नाहीं. गावांतील श्रीमंतापासून गरीबापर्यंत, वृद्धां पासून मुलां पर्यंत सर्वांनीं प्रातःकाळीं उठावयाचें, गांवचे प्रमुखांनीं आदले दिवशीं गोरगरीबांची तजवीज केलेली असे, त्या प्रमाणें अभ्यंगस्नान करावयाचें, हत्यारांची पूजा करावयाची ह्मणजे शिपायांचें हत्यार तरवार, भाला, बरची; वोताटीवाल्याचें हत्यार काठी अथवा निशाण; महाताचे हत्यार अंकुश; गुरवाचें हत्यार शिंग, वाजंत्र्याची सनई, संबळ, नगाऱ्यांचा नगारा ह्मणजे ज्याचा ज्यावर निर्वाह तें त्याचें हत्यार. त्या हत्यारांची पूजा करावयाची; हत्ती, घोडे, उंट इत्यादि स्वारीचीं जनावरें यांस स्नान घालावयाचें, व नित्यापेक्षां चांगला चारा आणि दाणा त्यांस खावयास घालावयाचा. राजानें, आणि त्याच्या सरदारांनीं आपल्या नोकर चाकरांस भोजनास बसवून त्यांस स्वताहा वाढावयाचे. त्यांस पानसुपारी आणि आपल्या सामर्थ्याप्रमाणें व त्यांच्या ऐपतीप्रमाणें

त्यांस वस्त्रालंकार द्यावयाचे. सायंकाळीं सर्वांनीं आपापलीं हत्यारें बरोबर घेऊन व देवीचा प्रसाद जो घटउत्थापना नंतर मिळतो तो मस्तकीं धारण करून सर्वांनीं एकदम सिमोल्लंघनाकरतां बाहेर पडावयाचे. सायंकालचा समय, रवी नुकताच्च अस्ताचलाखालीं गेला आहे व तारांगण चमकूं लागलें आहे. अशा समयांत ईशान्येकडे मुखकरून शमीची पूजा व प्रार्थना करून त्याचा वर मिळवावयाचा आणि नंतर इच्छित कार्यास प्रारंभ करावयाचा. ही ऐक्यवर्धनाची पद्धत कोणीकडे आणि आजची स्थिति कोणीकडे? आज उत्तर हिंदुस्थानांतील लोक, कागदाचे भले मोठमोठे रावण कुंभकर्णादि राक्षस तयार करून त्यांच्या अंगांत दारू ठासून तयार करतात आणि

**अश्मभक महावृक्ष महादोष निवारण,**
**इष्टानां दर्शनं देहि शत्रूणांच विनाशनं.**

अशा मंत्रानें अश्वत्थाची प्राथना करितात.

**" ततोवृक्षं नमस्कृत्यण प्राची पूर्वादि जयं गृहीत खड्ग करोति. एवं त्रिचतुःपादक्रमे चलित्वा सर्व दिग्विजयं कृत्वा शत्रवो जिता इतिब्रुयात् ॥**

इत्यादि आज्ञा ऐकून घेऊन दारूनें बनविलेल्या कागदी राक्षसास पेटवून देऊन आमचे पराक्रमी गडी विजया दशमीचा विजय गाजवीत घरीं येतात! महाराष्ट्र, आणि दक्षिण महाराष्ट्रांत, विजया दशमीचे दिवशीं सायंकाळीं कांहीं दक्षिणेस तर कांहीं पश्चिमेस मोठ्या थाटानें वाजत गाजत जातात, शमी वृक्ष असल्यास बरे, नसल्यास बाजारांत आलेल्या फांद्या पैकीं एकादी फांदी

घेऊन ती सीमेचे बाहेर नेऊन त्याचा साजुक वृक्ष तयार करतात आणि त्यावर मूळ शमी वृक्षाची कल्पना करून त्याची पूजा उपाध्येबोवा कडून करवितात आणि वरील मंत्रानें त्याची प्रार्थना आणि तंत्रानें अचरण करितात ! नंतर अपटा, कांचन, इत्यादि वृक्षांचीं पानें व फांद्या सोने ह्मणून वाटतात. धारवाड, हुबळी, गदग, सारख्या ठिकाणीं शाळवांची ताटें भसाभस उपटून सोन्याच्या लगडीच्या लगडी एकमेकास वाटीत असतात ! ! या सुवर्णाचा व्यापार एक दिवसांतच आटपणारा असतो ह्मणून बरें. हा जर संक्रांतीच्या तिळगुळाप्रमाणें एक महिन्याचा व्यापार असतां तर आपट्यांच्या झाडांचा पार फडशा पडून खऱ्या सोन्यामागें हें शिलंगणाचें सोनेंही निकालांत लागलें असते आणि विड्या तयार करणारास आणि त्या ओढणारास मोठी पंचाईत पडली असती ! सोनें वाटणें तें उपयुक्त झाडांचा नाश करून वाटणें नाहीं. सोन्याची लगड ह्मणजे गरीब बिच्याऱ्या शेतकऱ्यानें पेरलेल्या पिकांतील ताटें नव्हे. तर स्वतः पराक्रम करून मिळविलेल्या जयाचें व संपत्तीचें आनंदर्शक चिन्ह आहे. सीमोल्लंघनांतील सोने ह्मणजे पराक्रमाची देहनगी, मिळविलेल्या लुटीची वाटणी, व विजयाची निशाणी आहे. इकडे लक्ष्य गेल्यास आपणास आपलें प्रस्तुतचे विजयादशमी संबंधानें काय वाटेल बरें ? आमच्या रामचंद्रानें विजयानंदांत कोणास राज्य, कोणास युवराज, कोणास पोषाख, कोणास मोत्याचेहार कोणास हिऱ्याचे कंठे दिले होते. मधूकैटभाचा वध केल्यानंतर श्रीविष्णूनें, महिशासुरास मारल्या नंतर दे-

वांनीं अशाच देहनग्या दिल्या आहेत ! आणि आमचे राजे रजवाडे अशीच देव घेव करीत असत, काप जाऊन भोंकें राहिल्या प्रमाणें आज आमची स्थिति झाली ह्मणून आपण झाडपाल्यावर आलों आहोंत. हें मनांत वाळगून कृती करणें इतकाच विजय आज मिळविला तरी पुरे आहे. आमच्या वरील विवेचनावर असा अक्षेप येण्याचा संभव आहेकीं, हा नवरात्रींचा उत्साह आणि ही विजया दशमी हे लढवय्ये लोकां करिता आहेत, लढाईचे प्रसंगा करिता आहेत, आणि राष्ट्र काबिजी करता आहेत व तेहीपण क्षत्रियांकरिता आहेत. आपणांत हल्ली क्षत्रिय नाहींत, आपणास कोणाचें राज्य घ्यावयाचें नाहीं अथवा कोणास द्यावयाचें नाहीं, खेरीज आपणा जवळ हत्यारें नाहींत आणि आगगाडी व बायसेकल असल्यामुळें घोड्यांचीही गरज राहिली नाहीं. मग आपणास हा उपाधी पाहिजे कशाला ?

अक्षेप ठीक आहे पण चुकीचा आहे. बाह्य देखाव्यास अनुसरून आहे ह्मणून कोत्या शोधाचा आहे, असें तेव्हांच लक्षांत येण्यासारखें आहे. कारण या विषयाचे प्रारंभीं जो श्लोक दिला आहे त्यास अनुसरून पाहिलें असतां ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत सर्वांचा समावेश यांत केलेला आहे. पूर्वी आमच्या राजास मात्र झगडावें लागे परंतु आतां आह्मास आमच्याच प्रभूबरोबर लढाई करावी लागत आहे, आतां आह्मास आमच्यांतील शुंभाबरोबर लढावें लागत आहे, व निशुंभास पार करून टाकावें लागत आहे. या लढाया सरस्वतीस प्रसन्न करून घेतल्याखेरीज कधींही मारता यावयाच्या नाहींत.

तर सरस्वती प्रसन्न करून घेण्याकरतां आह्मास खडतर अनुष्ठानच केलें पाहिजे. आह्मास जसें आमच्या प्रभू बरोबर आणि आमच्या समाजांतील शुंभ निशुंभाबरोबर झगडावें लागत आहे, तसेंच प्लेग आणि दुष्काळ यांच्या बरोबरही आह्मासच झगडावें लागत आहे व लागणार आहे. यांच्या बरोबर झगडण्याची शक्ति येण्याकरतां शाकंबरी देवीची आराधना केली पाहिजे आहे. कारण तिनें आमच्या पूर्वजांना दुष्काळांतून सोडविले होते असें आमचीं पुराणें आह्मांस सांगत आहेत. आमच्या पूर्वजा जवळ बाणभातें होते तरी सत्यनिष्ठा, करारी वृत्ति, अनन्य भाव हीं जब्बर हत्यारें त्यांच्या जवळ असत. गांगेयाचें भीष्म हात्यारानें झालें नाहींत, महा प्रतिज्ञेमुळें झालें आहेत. भीष्माचे भीष्माचार्य बाणभात्यानें झालें नाहींत दृढभक्तिनें झालें आहेत. तसाच अर्जुन, भीम, कर्ण, द्रोण, धर्म, इत्यादि मंडळी, कित्येक हजार वर्षे झाली तरी कित्याप्रमाणें आमच्या पुढें आहे आणि यावत् चंद्र दिवाकरौ कित्याप्रमाणेंच रहाणार तीं हत्यारांचें जोरावर रहाणार नसोन कर्तृत्वावर रहाणार आहे. ज्याजवळ हींच हत्यारें जाज्वल्य असतील तींच त्यांच्या कर्तृत्वास आणि कीर्तीस कारण होणार आहेत. हें लक्ष्यांत आणणारास वरील प्रश्नाचें कारण नाहीं.

आज आह्मांस व्यापारांत, राजदरबारांत, रानामक्यांत, धर्मकर्मांत, कथाकीर्तनांत, पुराणभजनांत यश येत नाहीं. राजा आपलें ऐकत नाहीं, आपले देशबांधव आपलें ऐकत नाहींत, आपले शेजारीपाजारी आपलें ऐकत नाहींत; फार तर काय, पण आपली स्त्रीपुत्रही

आपलें ऐकत नाहींत यांचें कारण हेंच कीं, "यथा सांगेरे कर्म कांहीं घडेना। घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना." या श्रीसमर्थ रामदासोक्तीप्रमाणें आपणाकडून नवरात्रीचें व्रत घडेना, नवमीसह दशमी, श्रवण नक्षत्र, सायंकाळचा समय, आपले इष्टमैत्र अथवा नोकरचाकर यांच्या सह शमी पूजन ही नीट होईना तर जय यावा कसा? उपाध्यायाकडून घट स्थापना–उपाध्याकडून पूजा अर्चा, उपाध्यायाकडून व्रत वैकल्यें करावयाची तर परपरमेश्वर ह्मणतो तुझे राष्ट्राचा कारभार, तुझे संसाराचा कारभार, तुझे आयुष्याचा कारभार उपाध्येच करीत आहेत हेंच ठीक आहे! आणि तूं शुद्धीवर न येशील तर उपाध्येच सारे अवरतील ! तूं असाच पशूवत् जन्म मरणाच्या फेऱ्या घालीत ऐस ! ! आज आपण करतो ही खरी विजया दशमी नव्हे, तिची नक्कल नव्हे, नक्कलेच्या नक्कलेची नक्कलही नव्हे तर ही आपल्या पूर्वजांची थट्टा व आपल्या आकलेची नक्कल आहे. ह्मणूनच आपल्या देशाच्या आब्रूची नक्कल सर्व जगांत झाली आहे. ती न होऊं देण्याकरतां एक निष्ठेनें ईश सेवा करून विजय संपादला पाहिजे हें निराळें सांगणें नलगे.

प्रीय वाचक हो, आपल्या पूर्वजांनीं केलेलेंच करा. सर्व उरकत नसल्यास थोडेंच करा पण तें स्वतः करा, यथा सांग करा. भक्तीनें करा. निश्चयानें करा, तुह्मी करावयाचें कार्यांत भट घालूं नका, तुमचें काम तुह्मी करा, त्यांचें काम त्यांना करूंद्या ह्मणजे तुह्मी सर्वत्र विजयी व्हाल. हा अशिर्वाद सिमोल्लंघनाचें सोनें ह्मणून दिला आहे. हें सोनें आपण ग्रहणकराल अशी आशा आहे.

# जाहिरात.

**विजय**—छापखान्यांत काम कोणत्या प्रकारें निघतें हें सांगण्याची गरज नाहीं. प्रस्तुत पुस्तक हें एक त्या पैकीं किरकोळशी साक्ष आहे. या छापखान्यांत जसें मराठी काम निघतें तसेंच इंग्रजी व गुजराथीही काम निघतें याचा प्रत्यय याच छापखान्यांत निघणारें पंचांग देतच आहे. काम चांगलें निघण्या करितां जशी काळजी घेतली जाते तशीच तें वेळच्या वेळीं तयार करण्याकडे ही लक्ष्य दिलें जातें याचा अनुभव पहाण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं अनुभव घेऊन पहावा.

**विसावें शतक**

या नांवाचें मासिक पुस्तक ही याच छापखान्यांत येत्या कार्तिक शुद्ध १ ( दिवाळी ) पासून निघावयाचें आहे यासंबंधाची विशेष हकीकत हस्तपत्रकावरून समजेल.

**म्यानेजर.**

**विजय छापखाना.**

**पांजरापोळ पहिली गल्ली पोष्ट गिरगांव.**

बक्षीस! मिळवा!! बक्षीस!!!

# बालोपदेशक गोष्टी.

समचरण सरोजं सांद्र नीलांबुधाभं ॥
जघन निहित पाणि मंडनं मंडणानां ।
तरुण तुलशी माला कंधरं कंजनेत्रं ।
सदय धवल हासं विठ्ठलं चिंतयामि ॥ १ ॥




प्रसिद्ध करणार

लोकमित्र कर्ते,

पोष्ट—खानापूर, जिल्हा—बेळगांव.

'धनंजय' छापखान्यांत छा०

सन १८९७

किंमत अर्धा आणा.

# बालोपदेशक गोष्टी.

## स्वदेश प्रीति.

**शिकंदर** बादशहा आणि ग्रीक लोक यांचें एकदां युद्ध चाललें होतें; त्या वेळीं ग्रीकच्या वतीचा सेनापति **फोशिअन** हा होता. त्याचा अतुल पराक्रम आणि दृढ निश्चय पाहून **शिकंदर** बादशहाला फारच आश्चर्य वाटलें आणि त्यानें **फोशिअन** यास सांगून पाठविलें कीं, " तुह्माला अमक्या अमक्या प्रांताचा राजा करितों; तुह्मी आमच्या वतीचे व्हा." **फोशिअन** हा खरा सूज्ञ होता. तो कर्तव्यकर्मास विसरला नाहीं, त्यानें शिकंदरास उत्तर पाठविलें कीं, " तुह्मी माझ्यावर जर कृपा करूं इच्छितां, तर तुमचें राज्य तुमच्याजवळ ठेवा; आणि माझी अब्रू माझ्याजवळ ठेवा, ह्मणजे झालें. स्वदेश स्वातंत्र्यापेक्षां मला राज्याधिकार अधिक प्रिय नाहीं."

**स्वदेशहित करण्याची संधि आल्यास ती दवडूं नये.**

## थट्टा करणें.

**सुल्ला** ह्मणून एक रोमन सरदार होता. तो दिसण्यांत **कुरूप** दिसत असे. तो एकदां आथेन्स येथें कांहीं कारणानिमित्य गेला असतां तेथील एका मनुष्यानें त्याला सहज थट्टेनें माकडतोंड्या असें ह्मटलें. त्या थट्टेचा परिणाम असा झाला कीं, त्या रोमन सरदारास त्याचा अतिशयित राग येऊन त्या रागाच्या आवेशांत त्यानें सूड उगविण्या-

करितां सगळ्या आथेन्स शहराचा विध्वंस करून टाकिला.

**थट्टा करूं नये. कां कीं, त्याचा परिणाम वाईट आहे.**

---

## खोल उत्तर.

**पटवर्धनाच्या** कुळांतले थोर व प्रख्यात पुरुष **चिंतामणराव अप्पासाहेब** हे मोठे सूज्ञ होते. हे एके दिवशीं दरबारांत बसले असतां तेथें एल्फिन्स्टन साहेब आले. अप्पासाहेबांस रात्रीचें जागरण झालें होतें, ह्मणून त्यांस दरबारांत जराशी डुलकी आली. तेव्हां त्यांस एल्फिन्स्टन साहेब ह्मणाले "आपणास झोंप येत आहे." त्यावर अप्पासाहेब ह्मणाले "आह्मास झोंप येत आहे ह्मणून अशी दशा प्राप्त झाली आहे!"

**आह्मास झोंप येत आहे खरी; पण ती आह्मी घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.**

---

## वेळेवर काम करणें.

इंग्लंद देशाचा राजा सहावा **जेम्स** यानें एकदां **थामिस हामिल्तन** ह्याजला विचारिलें "तुमच्याजवळ जी संपत्ति आहे, ती तुह्मीं कशी संपादिली?" त्यावर त्यानें उत्तर केलें "महाराज, जें काम मला आज करितां येईल अशी माझी खात्री आहे, तें मी कधीं उद्यांवर टाकीत नसतों; आणि जें मला स्वतः करितां येण्यासारखें आहे, तें मी दुसऱ्याला करण्यास सांगत नाहीं; हें मला संपत्ति प्राप्त होण्यास मुख्य साधन कारणीभूत झालें आहे."

**आपलीं कामें वेळच्या वेळीं करावीं; त्यांत कल्याण आहे.**

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं० ... आर्य भवन

## उद्योगी राष्ट्र अजिंक्य होय.

**फ्रान्स** देशाच्या हुशार आणि राज्यकारस्थानी राजा चवदावा **लुई** ह्यानें **हालंद** देश जिंकण्याकरितां पुष्कळ दिवसपर्यंत परिश्रम केले; तरी तो देश त्याला जिंकतां येईना. तेव्हां त्यानें आपल्या प्रधानास विचारिलें 'मी एवढ्या थोरल्या **फ्रान्स** देशाचा राजा असून माझ्यानें यःकश्चित **हालंद** देश जिंकवत नाहीं, याचें कारण काय?' प्रधानानें सांगितलें 'महाराज, देश मोठा असला ह्मणजे तो बलवान असतो असें नाहीं; ज्या देशांतले लोक उद्योगी तो देश अजिंक्य होय. उद्योगानें **हालंदाचे** लोक तुह्मांस अजिंक्य झाले आहेत.'

**उद्योग करावा ह्मणजे श्रेष्ठता येईलच.**

## मी कर्तव्य कर्म केलें.

**त्राफलगार** येथें **इंग्लिश** आणि **फ्रेंच** यांची जी लढाई झाली, त्यांत इंग्लिशकडचा मुख्य सरदार **लॉर्ड नेल्सन** हा होता. त्यास लढाईच्या वेळीं गोळी लागून तो फार व्याकुळ झाला होता व त्याच्या अंगांतून खळखळ रक्त वाहत होतें; तरी त्याचें लक्ष लढाईच्या परिणामाकडे होतेंच. शेवटीं आपल्या पक्षास जय मिळाला असें त्यानें ऐकिलें, तेव्हां तो अत्यानंदानें डोळे वर करून ह्मणाला 'मी माझें कर्तव्य केलें आहे; व तें करण्याचें परमेश्वरानें मला सामर्थ्य दिलें. परमेश्वरा! हा तुझा प्रसाद होय.'

**आपण आपलें कर्तव्य केलें ह्मणजे जन्माचें सार्थक झालें, असें जन मानितात; ह्मणून कर्तव्य करण्यास विसरूं नये.**

## विश्वास.

इंग्लंडांतला प्रसिद्ध वक्ता फाक्स ह्यानें एका सावकाराचे बरेच पैसे देणें होतें. एका वेळीं तो सावकार दस्तऐवज बरोबर घेऊन **फाक्स** याचे घरीं आला. तेव्हां **फाक्स** हा पैसे मोजीत होता; तें पाहून सावकारानें त्यास ह्मटलें 'माझे पैसे देणें आहेत ते ह्या पैशांतले द्या.' त्यावर **फाक्स** ह्मणाला हे पैसे मला **शेरिअन** ह्यास दिले पाहिजेत कां कीं, त्याचें कर्ज हातावरचें आहे माझें बरेंवाईट झालें तर त्याजवळ पुरावा कांहीं नाहीं. हें ऐकून सावकारानें ह्मटलें 'असें आहे तर मी माझें कर्ज हातावरचें करितों.' असें ह्मणून लगेच त्यानें तो दस्तऐवज फाडून टाकिला. हें पाहून **फाक्स** यास फार आश्चर्य वाटलें आणि त्याचे त्यानें लगेच पैसे देऊन टाकिले.

**सभ्य लोकांशीं विश्वासानें वागावें.**

---

## नवे शोध कसे लागतात.

**इंग्लडांत सर ऐझाकन न्यूटन** ह्मणून तत्ववेत्ता होऊन गेला. ह्यानें नानाप्रकरचे मोठमोठे नवीन शोध लाविले होते. एका वेळीं त्याला कोणी विचारिलें 'आपणास नवे मोठमोठे शोध कसे लागतात?' त्याला त्या थोर पुरुषानें मर्यादेनें आणि शांतपणानें उत्तर केलें 'अहो, त्याविषयीं मी नेहमीं एकसारखें मनन करीत असतों त्यामुळें त्यांतलें थोडें कांहीं मला कळतें.

**मनन करणें हें नवे शोध लागण्याचें खरें साधन आहे**

---

## ग्रंथाचें सामर्थ्य.

ग्रीक देशांत थ्युसिदिदिस् ह्या नांवाचा नामांकित

इतिहासकार होऊन गेला. ह्याची एक गोष्ट अशी सांगतात कीं, याच्यापूर्वीं होऊन गेलेला विद्वान इतिहासकार **हिरोडोटस** याचा इतिहास कोणी एकानें वाचला व तो **थ्युसिदिदिस्** ह्यानें ऐकला; त्या वेळीं त्याच्या डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या. त्या ग्रंथाच्या ऐकण्यानें तो इतका मोहित झाला कीं, त्या वेळापासून ल्याहावा तर असा ग्रंथ ल्याहावा असें त्यास वाटलें, व ह्याचमुळें तो पुढें जगविख्यात इतिहासकार झाला.

**ग्रंथाचें सामर्थ्य एवढें आहे कीं, रंकाचा राजा होईल आणि अज्ञानाचा ज्ञानी होईल.**

---

## राजास दरिद्रावस्था.

**जर्मन** देशाचा बादशहा चवथा **हेनरी** ह्याला त्याच्या मुलानें गादीवरून कैदेंत घातलें आणि आपण गादीवर बसला, तेव्हां तो चवथा **हेनरी** महाप्रयत्नांनीं सुटून **स्पायर** येथें गेला. तेथें त्याचा उदरनिर्वाह चालेना ह्मणून तो तेथच्या धर्मोपदेशकास भेटून त्यास अत्यंत नम्रतेनें ह्मणाला "महाराज, आपण कृपा करून मला ठेवून घेऊन पोटाला घालाल तर मोठे उपकार होतील." हें दीनपणाचें त्याचें बोलणें ऐकून धर्मोपदेशकास फार कळवळा वाटला व त्यानें त्यास ठेवण्याचें कबूल केलें. पुढें कांहीं दिवसांनीं हा हतभागी बादशहा तेथें मरण पावला; तेव्हां त्याचें प्रेत कांहीं कारणावरून पांच वर्षेपर्यंत तेथेंच रखडत होतें.

**द्रव्य हें शाश्वत नाहीं हें लक्षांत ठेवून वागावें.**

---

## दृढ निश्चय.

**प्रातेस्तंत** मताचा प्रवर्तक **लूथर** हा विलक्षण दृढ-

निश्चयी होता. बादशहानें कांहीं कारणानिमित्त त्याजवर दोषारोप ठेवून त्याला वर्म्स शहरीं बोलाविलें; तेव्हां त्याला लोक न जाण्याविषयीं सांगूं लागले, तें ऐकून तो ह्मणाला "तेथें जरी अगणीत भुतें असलीं तरी मी जाईन" ड्युकजार्ज ह्मणून एक गृहस्थ त्याचा वैरी होता, तो तिकडे आहे असें त्याला लोकांनीं सांगितलें, तेव्हां त्यानें ह्मटलें "नऊ दिवस पर्यंत एकसारखा जरी तेथें ड्युकजार्जांचा पाऊस पडला, तरी जाईन" पुढें तूं आपलीं मतें जर सोडिलीं नाहींस, तर तुझा शिरच्छेद करूं असें त्याला शत्रूंनीं भय घातलें; तेव्हां तो ह्मणाला मला "पांचशें डोकीं असलीं, आणि तीं सगळीं गेलीं, तरी मी आपलीं मतें सोडणार नाहीं."

**दृढनिश्चयानें उद्योग करावा. ह्मणजे यश प्राप्त व्हावयाचेंच.**

---

## खरें समाधान.

प्राचीनकाळचा महासाधु **साक्रेटीस** हा एके दिवशीं बाजारांतून चालला होता, त्या वेळीं दुकानांतल्या नानाविध वस्तु पाहून त्यानें ह्मटलें 'ह्या दुकानांत किती प्रकारच्या वस्तु भरल्या आहेत! ह्यांतली एकही वस्तु मला मुळींच लागावयाची नाहीं." आणखी एका वेळीं तो ह्मणाला मनुष्यास ह्या लोकींच्या जितक्या वस्तु कमी लागतात, ह्मणजे ज्याची फार थोड्या वस्तूंनीं गरज भागते, तितक्या मानानें तो मनुष्य सुखी होय."

**मनुष्यास सुखी होण्यास हा उपाय उत्तम आहे.**

---

## निस्पृहता.

नारायणराव पेशवे मारले गेल्यावर हें कृत्य कोणी केलें असावें याचा रामशास्त्री यांनीं शोध लाविला. त्यांत रघुनाथरावाचें अंग असावें, असा त्यांस संशय आला. तेव्हां त्यांनीं राघोबाची समक्ष भेट घेऊन वधाची हकिकत विचारिली. त्या वेळीं 'नारायणरावास धरावें' असें मी पत्र दिल्यानें रघुनाथरावानें सांगितलें व झालेल्या कृत्यास प्रायःश्चित्त सांगा असें ह्मणाले. त्या वेळीं रामशास्त्र्यांनीं ' ह्यास देहान्त प्रायःश्चित पाहिजे ' असें निस्पृहतेनें सांगितलें; आणि ' तुह्मी पुण्यांत जोंपर्यंत राज्य करीत आहां, तोंपर्यंत मी येथें पाऊल देखील ठेवणार नाहीं ' असें ह्मणून ते पुण्याहून निघून वांईस जाऊन राहिले.

**निस्पृहता हा सद्गुण आहे. तो अंगीं धरावा.**

---

## वाचनापासून फायदा.

ह्यू नांवाचा एक इंग्लिश मनुष्य होता. हा लहानपणीं अतिशय उनाड असे. पण त्याची जेव्हां आई वारली, तेव्हा त्याचे डोळे उघडले. तो मोठ्या झपाट्यानें विद्या शिकला, आणि फार चांगला मनुष्य झाला. एका वेळीं त्याच्या एका मित्रानें त्याला विचारिलें ' तूं लहान होतास तेव्हां मोठा व्रात्य होतास आणि आतां कसा सुधारलास ? ' तेव्हां ह्यू ह्यानें मर्यादेनें उत्तर दिलें ' मित्रा, मी जसजसें वाचीत गेलों, तसतसें माझें अज्ञानत्व मला दिसूं लागलें, आणि जसजसें माझें अज्ञानत्व मला दिसूं लागलें, तसतसें मी तें नाहींसें करण्याविषयीं झटूं लागलों. '

**वाचन हें ज्ञान प्राप्तीचें उत्तम साधन आहे. त्याचा अ-**

भ्यास आपण करावा, ह्मणजे आपलें अज्ञान नाहींसें होईल.

## न्यायबुद्धि.

एका वेळीं इंग्लिश आणि फ्रेंच यांची लढाई होत असतां इंग्लिशखाडीच्या तिरावर कांहीं इंग्लिश लोक दीपस्तंभ बांधीत होते; इतक्यांत एक फ्रेंच लढाऊ जहाज त्या खाडींत आलें, आणि त्यावरच्या लोकांनीं त्या किनाऱ्यावरच्या लोकांवर हल्ला केला व त्यांचा पराभव करून त्यांस धरून आपल्या देशांत घेऊन गेले. पुढें ही गोष्ट फ्रान्स देशाचा राजा चवदावा लुई ह्यानें जेव्हां ए-कली, तेव्हां त्यानें न्यायबुद्धीनें त्यांस सोडून देण्याचा हुकूम केला; आणि तो ह्मणाला ' फक्त इंग्लंडच्या राजा-बरोबर लढाई चालली आहे, ती कांहीं इंग्लंडच्या एकंदर मनुष्यांबरोबर चालली नाहीं.'

**जगांत आपण न्यायानें वर्तावें हें आपणांस योग्य होय.**

## काम शेवटास कसें न्यावें ?

इंग्लंदांत जान हंतर ह्मणून एक विद्वान पुरुष होऊन गेला. त्याला एकानें विचारिलें ' आपण जीं कामें आरं-भितां, तीं शेवटास जातात याचें कारण काय आहे बरें ?' तें ऐकून जान हंतर त्याला ह्मणाला ' बाबारे, याचें कार-ण असें आहे कीं, मी कोणतेंही काम आरंभण्यापूर्वीं तें माझ्यानें होईल किंवा नाहीं ह्याचा विचार करून पाहतों. जें काम माझ्यानें व्हावयाचें नाहीं, असें मला वाटतें, तें मी करीत नाहीं. जें काम माझ्यानें होईल अशी माझी खात्री आहे, त्या कामाला मी हात घालतों; परंतु हात घालण्या-

पूर्वी त्याचीं साधनें मिळवितों, आणि मग काम आरंभितों व तें काम पुरें झाल्याशिवाय त्याचा पिच्छा सोडीत नाहीं असा माझा नियम आहे; ह्मणूनच मला आरंभिलेलीं कामें साधतात.

**हातीं घेतलेल्या कामास यश येण्यास जान हंतर यानें सांगितलेला उपाय आहे. त्याप्रमाणें वागावें.**

---

## निर्लोभता.

**डायिओनस** ह्या नांवाचा एक साधु एके दिवशीं सकाळच्या वेळीं पिपांत बसून ऊन शेकीत होता; इतक्यांत **मासिदोन** देशाचा पराक्रमी बादशहा **शिकंदर** हा सहजगत्या फिरत फिरत तेथें आला आणि **डायिओनस** याच्याजवळ उभा राहून त्यास ह्मणाला ‘ आपणास काय पाहिजे तें सांगा ह्मणजे मी तें देईन ’ तें ऐकून **डायिओनस** ह्मणाला ‘ आपली सावली माझ्यावर पडली आहे तेवढी एकीकडे व्हा आणि काढा, ह्मणजे पुरे; आणखी मला दुसऱ्या कोणात्याही वस्तूची इच्छा नाहीं.’

**निर्लोभता हा गुण साधूंच्या गुणांत मुख्य मानितात.**

---

## थोरपणा.

**फ्रान्स** देशांत जी राजक्रांती झाली होती, त्या राजक्रांतीनंतर तेथील राजा सोळावा **लुई** ह्याचा आठ वर्षांचा मुलगा तेथच्या अधिकाऱ्यांनीं एका चांभाराच्या स्वाधीन केला, आणि त्यास त्या मुलास पाहिजे त्या तऱ्हेनें टार मारण्याविषयीं सांगितलें. तव्हां तो त्यास घरीं घेऊन गेला; आणि त्याला आपल्या घरीं काम करण्यास ठेविलें. तो चांभार त्याला अतिशयीत वाईट रीतीनें वागवीत असे.

पुरतें खावयास अन्न व नेसावयास वस्त्रही देत नसे. अशी स्थिति असल्यामुळें तो मुलगा फार त्रासला होता. तरी तो मोठ्या शांतपणानें वागत असे. एके दिवशीं त्याला त्या चांभारानें विचारिलें " कायरे पोऱ्या, तुला तुझ्या बापाची गादी परत मिळाली, तर तूं माझें काय करशीलरे?" तें ऐकून मुलानें उत्तर केलें " मी तुझ्या सर्व अपराधांची तुला क्षमा करीन.

**थोरपणानें वागणें हें आपणास भूषणावह होय.**

## वक्तृत्वाचें सामर्थ्य.

**हिंदुस्थानचा** पाहिला गव्हरनर जनरल **वारनहेस्टिंग्ज** यानें या देशांतील राजेरजवाड्यांवर जे जुलूम केले होते, त्याची चौकशी **पार्लमेंटसभेपुढें** झाली. त्या वेळीं त्यावर दोषारोप ठेवण्याकरितां केवळ न्यायबुद्धीनें **हिंदुस्थानच्या** वतीनें **इंग्लंदांतला** प्रसिद्ध वक्ता आणि तत्ववेत्ता **एडमंडबर्क** ह्यानें भाषण करून त्यावर एकवीस दोषारोप ठेवले. त्या वेळीं कांहीं वेळपर्यंत सगळी सभा चित्राप्रमाणें स्तब्ध झाली, आणि स्वतः **वारनहेस्टिंग्ज** ह्याच्या डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या, व त्याचा कंठ दाटून आला आणि तो म्हणाला ' ह्या अप्रतिम वक्त्याचें भाषण ऐकतां ऐकतां मला वाटूं लागलें कीं, मजसारखा पापकर्मी ह्या पृथ्वीवर एकदेखील दुसरा मिळावयाचा नाहीं.

**वक्तृत्व हें फार मोठी कला आहे, ती आपल्या अंगीं आणण्याचा प्रयत्न करावा.**

---

## संवय.

**पांतसाचा** राजा **मित्रिदेतस** ह्यानें महापरीश्रम

करून कोणत्याही प्रकारचें कां विष असेना तें आपणास खाल्ल्यावर पचून जावें ह्मणून तें जिरण्याची आपणास इतकी संवय लावून घेतली कीं, ज्या वेळीं त्या राजाचा पराभव पांपीनें केला, त्या वेळीं त्याला आत्महत्या करून घेण्याचा प्रसंग आला. तेव्हां कोणत्याही प्रकारचें विष त्याला उपयोगी पडेनासें झालें. कां कीं, तीं सर्व जिरण्याची त्याला संवय होती, ह्मणून त्यानें दुसऱ्या माणसाकडून आपलें शिर तोडविलें आणि प्राण सोडला.

**ज्याप्रमाणें आपण आपल्यास संवई लावून घेऊं, त्याप्रमाणें आपला स्वभाव होतो; ह्मणून चांगल्या संवई लावून घ्याव्या ह्मणजे आपला स्वभाव चांगला होईल.**

---

## सभ्यता.

**सिसली** आणि **नेपल्स** या देशाचा राजा **आल्फान्सो** यानें एकदां **सिसली** बेटांत युद्ध चालविलें असतां शत्रु त्याला नदी उतरूं देईनात. तेव्हां त्याच नदीच्या तीरीं त्यानें आपल्या फौजेसुद्धां मुक्काम केला. तेथें अन्नाशिवाय सैन्यास व राजास सर्व दिवस रहावें लागलें. संध्याकाळचे वेळीं एका शिपायानें राजाला कांहीं पदार्थ खाण्यास आणून दिले. राजा भुकेनें अगदीं व्याकूळ झाला होता, पण त्यानें त्या भेटीचा अंगिकार न करितां शिपायास ह्मटलें " शिपाईबहादूर, मी तुझा फार आभारी आहें. येथें माझ्यासारखे भले आणि शूर असे पुष्कळ लोक उपोषण काढीत आहेत; ह्मणून माझ्या एकल्याच्यानें मेजवानी घेववत नाहीं.

**चार चौघांत असतां आपण एकट्यानेंच खाऊं नये.**

---

## खोटें बोलणें.

एका प्रसिद्ध गृहस्थानें तत्ववेत्ता आरिस्टाटल यास प्रश्न केला कीं, 'जे लोक खोटें बोलतात त्यांना त्यापासून काय मिळतें?' त्यावर आरिस्टाटल यानें उत्तर केलें 'त्यांना त्यापासून कांहीं न मिळतां उलट ते जरी खरें बोलले असले तरी त्यावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं; हा मात्र त्यांना मोठा लाभ होतो.

खोटें बोलूं नये, सदासर्वकाळ खरें बोलावें. हें आपलें कर्तव्यकर्म होय.

---

## उद्धट भाषण.

चौदावा लुई हा उद्धट भाषण कधीं करीत नसे, व आपल्या कुटुंबांतल्या माणसांसही करण्यास देत नसे. तो म्हणे कीं 'उद्धट भाषण हें वज्रप्राय आहे.' 'एक दिवशीं त्या राजाची सून त्यास ऐकूं येई इतक्या मोठ्यानें एका माणसाविषयीं म्हणाली 'त्याच्यासारखा अत्यंत कुरूप प्राणी म्या कधीं पाहिला नाहीं.' तें ऐकून राजा मोठ्या नेटानें म्हणाला 'माझ्या राज्यांत अत्यंत सुस्वरूप मनुष्य तो हाच असें मी समजतों. जे माझे सर्वोत्कृष्ट सरदार त्यांतला हा एक आहे. त्वां त्याला उद्धट बोलून त्याची अवज्ञा केलीस हा अपराध केलास या करितां त्याजवळ क्षमा माग.

दुसऱ्यास मारण्यास जसा आपणास अधिकार नाहीं, तसा दुसऱ्यास उद्धट बोलण्यास अधिकार नाहीं.

---